नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका

र्भ साहित्य संघाचे मुखपत्र


युगवाणी

ाहित्य संमेलन
विशेषांक

डिसेंबर १९६४

★

ूल्य १ रुपया



प्रा. वा. कृ. चोरघडे, संमेलनाध्यक्ष
२५ वे विदर्भ साहित्य संमेलन, पुसद

संपादकः—प्रा. श्री. मा. कुलकर्णी

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र–

:: संपादक मंडळ ::
भा. श्री. परांजपे
व. कृ. वऱ्हाडपांडे

युगवाणी

संपादकः—श्री. मा. कुलकर्णी

वर्ष १९] डिसेंबर १९६४ [अंक ८

अनुक्रमणिका

संपादकीय

मराठीचे अध्यापन

पुसद येथे २५ ते २८ डिसेंबर १९६४ या तारखांना रौप्य महोत्सवी वि. सा. सम्मेलन भरावयाचे आहे. त्या प्रसंगी जे विविध साहित्यिक कार्यक्रम योजिले आहेत त्यात 'मराठीचे अध्यापन' या विषयावरील चर्चासत्र हा एक महत्वपूर्ण कार्यक्रम आहे. त्यात अनेक नामांकित प्राध्यापक भाग घेणार आहेत. एकंदर चर्चा गंभीरपणाने होईल व तिच्यातून कांही मार्गदर्शक निष्कर्ष बाहेर पडतील अशी आशा आहे. या चर्चासत्राच्या निमित्ताने कांही मुद्यासंबंधी येथे सूत्ररूपाने विचार मांडावेत असा मानस आहे.

विषयाची व्याप्ति व विभाग

हा विषय अत्यंत व्यापक असून अआई पासून एम्. ए. पर्यंतचे शिक्षण त्यात समाविष्ट आहे. तेव्हां स्थूल मानाने त्याचे प्राथमिक, माध्यमिक व उच्च असे शिक्षण-विभाग पडतात. प्राथमिक विभागात शुद्धलेखन व शुद्ध वाचन यांवर विशेष भर पाहिजे. पाठांतर देखील या विभागात बऱ्याच प्रमाणात व्हायला पाहिजे. या साठी या विभागात मराठी हा विषय शिकविणाऱ्या शिक्षकाला शुद्ध लिहिता-वाचता येणे व त्यासंबंधी आस्था वाटणे अत्यंत आवश्यक आहे. दुर्दैवाने आज या गोष्टी अभावाने अगर अपवादात्मकच आढळतात. याच वयात लेखना-वाचनाचा पाया घातला जाणे जरूर आहे ही गोष्ट लक्षात घेऊन प्राथमिक शाळेत मराठीचा शिक्षक नेमताना त्याचे मराठी वाचन व लेखन विचारात घेतले जावे. मुलांची वाणी शुद्ध होईल अशी कोणतीच योजना आज दिसत नाही. त्यासाठी संस्कृत-मराठी श्लोकांच्या पाठांतरावर भर देणे अगत्याचे आहे. आज प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना वरेच विषय शिकविले जातात. ते या वयात न शिकले तरी कांही विघडणार नाही. ते कमी करून भाषेच्या शुद्ध लेखना-वाचनाकडे अधिक लक्ष पुरविण्याची गरज आहे.

माध्यमिक विभागात व्याकरणाचा पाया पक्का करण्याची आवश्यकता आहे. सबंध शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात व्याकरण हा विषय कोठे, किती व कसा शिकविला जातो याचे संशोधन होणे जरूर आहे. माध्यमिक विभागातील वरच्या वर्गात काव्य, कादंबरी, नाटच या वाङ्मयप्रकारांचा स्थूल अभ्यास, विद्यार्थ्यांना वाङ्मयाची गोडी लागेल अशा रीतीने करवून घ्यावयास पाहिजे. निबंधलेखन, पत्रलेखन, कवितांचा अन्वय व अर्थ या गोष्टीवरहि या विभागात भर द्यायला पाहिजे.

अनुक्रमणिका

उच्च अथवा महाविद्यालयीन विभागात या विषयाचा अधिक व्यापक व सखोल अभ्यास व्हायला हवा. येथे या विषयाचे भाषा व साहित्य असे दोन भाग आजहि केले जातात. ते रास्तच आहे. या दोन्ही भागांचा, विशिष्ट ध्येय–धोरण-ठरवून, अभ्यासक्रम आखला पाहिजे व अध्ययन–अध्यापनहि त्याच ध्येयधोरणा-नुसार झाले पाहिजे.

ध्येय–धोरण

कोणताहि विषय शिकविताना तो आपण का शिकवितो याची शिकविणाऱ्याला व तो शिकताना आपण का शिकतो याची शिकणाऱ्याला स्पष्ट कल्पना असावयास पाहिजे. एका परीने अशी कल्पना आज दोघांनाहि आहे—'परीक्षेकरिता' असं दोघेहि मानतात. विशेषतः शिकणारा. पण हे कोणत्याहि विषयाच्या अध्ययनाध्यापनाचे ध्येय होऊ शकत नाही. मराठी भाषा का शिकावयाची व शिकवावयाची ?

भाषा ही अेक सामाजिक संस्था आहे. समाजाचे सर्व प्रकारचे व्यवहार तर तिच्या द्वारा चालतातच पण समाजाच्या ज्ञानरूप व अनुभवरूप कमाईची साठवण, तिचे संरक्षण व संवर्धनहि भाषेमुळेच शक्य होते. भाषा मानवी संस्कृतीचा अेक आवश्यक, अपरिहार्य व महत्वाचा घटक आहे. भाषेच्या अभ्यासकाने भाषेचे कार्य व तिचे महत्व ध्यानात घ्यावे.

भाषेचा व संस्कृतीचा अविभाज्य संबंध आहे. मराठी संस्कृतीवर मराठी भाषा पोसली गेली आहे. मराठीच्या आरंभीच्या काळातच संतसाहित्याचे लेणे तिला लाभले. आणि ती संतांच्या हृदयाप्रमाणेच मेणाहून मऊ व वज्राहून कठोर अशी बनली. संतांनी तिला मराठा विवेक शिकविला. पंडितांनी तिला तर्ककुशल व प्रौढगंभीर केले, भक्तांनी तिला भोळा भाव अर्पण केला. शाहिरांनी तिला डफावरील थाप व पैंजणातील नाद बहाल केला. अनेक शतके अशी मराठीची जडण–घडण होत गेली. मध्यंतरी तिचे तेज जरा दृष्टिआड झाले. पण पुढे मराठीच्या शिवाजीने तिला वाघिणीचे दूध पाजून नवा जोम आणला. आधुनिक काळातहि अनेकांनी तिला अनेक वैशिष्ट्ये प्रदान केली व तिचे सौंदर्य आणि सामर्थ्य वाढविले.

मराठी भाषेच्या अभ्यासकाने–महाविद्यालयीन अभ्यासकाने–ही सर्व जडण-घडण ध्यानात घ्यावी व मराठी संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर तिचा अभ्यास करावा.

मराठी भाषा ही आता उच्चशिक्षणाचे माध्यम बनली आहे, राज्यकार-भाराची भाषा म्हणूनहि ती आता वापरली जाणार आहे. म्हणजे तिचं क्षेत्र वाढणार आहे. आणि या सर्व क्षेत्रात तिचा वापर करणारे उद्याचे नागरिक मरा-

विद्यालयातूनच तिचा अभ्यास करून बाहेर पडणार आहेत. हे ध्यानात घेतलं म्हणजे भाषेचे अध्यापन या पुढे किती काळजीपूर्धक व जबाबदारीने व्हायला पाहिजे आहे याची कल्पना येईल. तेव्हां या दृष्टीने अभ्यासक्रम आखण्यापासून तो शिकविण्यापर्यंत व त्याच्या परीक्षेपर्यंतहि या धोरणाने कार्य झाले पाहिजे.

भाषेकडून साहित्याकडे वळले तर त्याच्याहि अध्ययनाध्यापनात आज अनेक उणीवा जाणवतात.

ललित साहित्याचे सामर्थ्य लक्षात घेऊन ते लक्षात आणून देण्याच्या दृष्टीने ललित साहित्याचे अध्यापन करायला पाहिजे. स्वार्थाच्या, वैयक्तिक सुखदु:खाच्या व हेव्या—दाव्यांच्या संकुचित जगातून वर उचलून स्वार्थरहित, व्यक्तिनिरपेक्ष, आनंदमय, सर्वांभूती सहानुभूति वाटणाऱ्या अशा उन्नत व उदात्त जगात मनुष्याला नेण्याचे सामर्थ्य वाङमयात असते. वाङमयाचे हे सामर्थ्य ओळखून त्याचा अधिकाधिक जाणीवेने व रसिकतेने आस्वाद घेतला गेला पाहिजे. वाङमयाभ्यासकातून रसिक कसा निर्माण होईल हे वाङमयाचे अध्यापन करताना अध्यापकाने नजरेसमोर ठेवले पाहिजे.

मराठी वाङमयाचा पाया संतांनी घातला आहे. संतवाङमय हे लोकद्वाराच्या तळमळीतून निर्माण झालेले आहे. त्याला व्यापक सामाजिक बैठक आहे. त्या वाङमयाचे स्वरूप त्याच्या सर्व वैशिष्टयांसह समजावून देणे हे अध्यापनाचे उद्दिष्ट असले पाहिजे.

वाङमयात त्या त्या समाजाचा, त्या त्या काळाचा सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक इतिहास दडलेला असतो. भिन्नभिन्न परंपरांवर ते वाङमय पोसलेले असते. याची जाणीव ठेवून व ती अभ्यासकाला करून देण्याच्या दृष्टीने वाङमयाचे अध्यापन झाले पाहिजे.

आणखी अनेक मुद्दे यासंबंधी मांडता येण्यासारखे आहेत. परंतु स्थलाभावी येथेच हा विषय मी सोडतो. आणि पुसद येथील चर्चासत्रात या विषयाची सर्वांगीण चर्चा होईल अशी अपेक्षा करतो.

सुप्रसिद्ध कथाकार प्रा. वामन कृष्ण चोरघडे यांच्या प्रांजळ व प्रभावी नेतृत्वाने हे संमेलन यशस्वी होईल असा आम्हाला विश्वास वाटतो.

—श्री. मा. कुलकर्णी

दि २२–१२–६४

अनुक्रमणिका

चंद्रशेखर
(उत्तरार्ध)

-प्रा. भ. श्री. पंडित

[या लेखाचा पूर्वार्ध युगवाणीच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर १९६४ च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाला आहे. -संपादक]

कविवर्य दत्त १८९८ मध्ये बी. ए. झाल्यावर नोकरीच्या शोधार्थ वडोद्याला गेले होते. तेथे त्यांचा समवयस्क व समशील चंद्रशेखरांशी स्नेहसंबंध जुळला. परंतु चंद्रशेखरांना दत्तांचा सहवास एक वर्षाहून अधिक काळ लाभला नाही. दत्ताना प्लेग झाला व त्यातच १३ मार्च १८९९ रोजी त्यांचा अंत झाला. दत्तांच्या निधनावर चंद्रशेखरांनी 'दत्त वियोग' ही विलापिका आळवली आहे. दत्तांच्या कवितासंग्रहाला चंद्रशेखरांनी आपले 'हृद्गत' जोडलेले आहे, त्यात ते म्हणतातः-"यांतील कविहृदय वाचून मला आनंद होतो. या यशोदेहाने माझा कविसखा भूलोकीं-मजपाशी-आहे, असे मी मानतो. त्याचा जीवात्मा परमात्म्याशी मिळून तो येथे सर्वत्र भरून राहिला आहे, हा वेदान्त मला ठाऊक आहे. 'व्यर्थ भूतानि शोचन्ति नष्ट आत्मेति शंकया' हा वसिष्ठांचा स्पष्ट बोधहि मला कळतो. तरी पुन्हा प्रिय दत्त! आपण मला सोडून गेलात असे हळहळून मी रडतोच आहे!" दत्तांनी 'अर्वाचीन कविते'ची सिद्धता चालविली होती. तिची सांगता चंद्रशेखरांनी केली; आणि ती दत्तांच्या स्मृतीला अर्पण करून आपल्या मित्राचे आनृण्य जोडले. दत्तांच्या पश्चात् त्यांचे चिरंजीव विठ्ठलराव घाटे यांनी चंद्रशेखरांना पितृव्याचा मान दिला; आणि चंद्रशेखरांनीहि आपल्या या पुतण्याला स्वतःच्या पुत्राप्रमाणे-भास्कराप्रमाणे मानले. इतकेच नाही तर प्रत्यक्ष मित्रच म्हणजे 'दत्त' मानले. एकवेळ कांही अपसमज निर्माण झाल्यामुळे चंद्रशेखर विठ्ठलरावांवर किंचित् रुष्ट झाले होते. परंतु पुन्हा आकाश निवळले व पहिल्यासारखे पांढरे स्वच्छ झाले. तेव्हां ते विठ्ठलरावांची 'समजूत' घालताना म्हणाले; -

कुमारा! राग नको आणूं
लडिवाळा तूं प्रियतर कैसा?
किंबहुना हा 'भास्कर' जैसा

अनुक्रमणिका

तूंहि मला जो दुखविल ऐसा
भेद नको जाणूं
दत्तमनाचा घेउनि शेला
ये भेटाया या आशेला
ती ममता दे या ममतेला
दत्त तुला मानूं.

ज्याप्रमाणे दत्तांच्या निधनावर चंद्रशेखरांनी विलापिका आळविली आहे; त्याचप्रमाणे, मोगरे व सौ. काटदरे यांच्या निधनांवरहि त्यांनी शोकगीते गाइली आहेत. मोगऱ्यांचा आणि चंद्रशेखरांचा साक्षात् परिचय नव्हता. पण मोगऱ्यांची कविता चंद्रशेखरांना मोगऱ्यांच्या फुलांइतकीच प्रिय होती. 'अर्वाचीन कविते'त ते मोगऱ्याची माहिती देतात;—"ह्यांस कविता करण्याचा नाद लहानपणी मराठी शाळेत असतांनाच लागला व त्या नादानुसंधाने जातां जातां हे कवि केवळ स्वप्रयत्नाने महाराष्ट्र भाषेंतील अर्वाचीन कवींमध्ये अग्रस्थानीं आहेत." त्याना 'अश्रुकरभार' अर्पण करताना ते अवघ्या दोन ओळीत त्यांच्या कवितेचे वैशिष्टय वर्णन करतात;—

साधी प्रसन्न सुमधुर तव भाषेची अनन्य ती शैली
गंगाधरा ! विराजे धवलगिरीतुल्य कीर्तिच्या शैली

मोगऱ्यांच्या कवितालेखनशैलीप्रमाणेच चंद्रशेखरांना लेंभ्यांची लेखनशैली प्रिय होती. लेंभ्यांच्या हयातीतच त्यांनी त्यांच्या कवितेची अंतःकरणपूर्वक प्रशंसा केली होती. लेंभ्यांनी पत्नीच्या चिरविरहावर 'शोकावर्त' हे वैलापिक काव्य रचले आहे. चंद्रशेखरांचे ते अत्यंत आवडते काव्य होते. लेंभ्याप्रमाणे चंद्रशेखरांचीहि प्रथमपत्नी ऐन तारुण्यात निधन पावली होती. 'नासिक–पंचवटी' या 'गोदागौरवां'तील उताऱ्यात त्यांनी या दुःखद घटनेचा टीपेसह निर्देश केला आहे;—

दूरवरी त्या मालवदेशी कालीसिंद न सिंधु अहो !
तिच्या प्रवाहीं रत्न करांतुनि गेलें शोक अनावर हो
सीतेसाठीं रामहि रडला, वाहुनि गोदावरि तुजला,
सीता त्यातें फिरुनि मिळाली; परि ती प्राप्त न हो मजला !

चंद्रशेखर टीपेत लिहितात;—"माळव्यांत कालीसिंद नदीच्या तीरी सारंगपुरास हातांतील रत्न मुद्रिका प्रवाहांत पडून हरवली; आणि तेथील जहागिरदार दीक्षित यांची रुपवती नात व माझी प्रथम पत्नी ही मृत्युमुखी पडली ! ह्या दोन्ही गोष्टींस उद्देशून या ओळी आहेत." पुन्हा लेंभ्यांना ज्याप्रमाणे 'पृथ्वी'वृत्त प्रिय होते, त्याचप्रमाणे ते वृत्त चंद्रशेखरांना प्रिय होते. शिवाय लेंभ्यांचे हे वैलापिक काव्य

आर्ततेने व आर्द्रतेने ओतप्रोत आहे. त्यांच्या रचनेची स्तुति करताना चंद्रशेखर अत्यानंदाने उद्गारतात;—

हंसाचे गतिचित्र दाविति, किती नामी पदन्यास हे !
भाषेची सरणी रसज्ञ कविला साधे न अन्यास हे
सारी सुंदर, सौम्य, गोड रचना देते प्रसादासवें
प्रेमानंद मनी भरोनि, नयनीं ही वाहवी आसवें;
माझा मित्र असो नसो मम तया सप्रेम ही वंदने,
तो दीर्घायु असो सुखात विलसो सन्नंदिनीनंदने;
अर्वाचीन कवींत मान मिळवो अग्रेसराचा सदा,
त्याला नित्य असो प्रसन्न कविता, कीर्ती तशी संपदा

चंद्रशेखरांचे या कवितेतील सौहार्द व औदार्य अपूर्व आहे ! चंद्रशेखरांची व लेंभ्यांची ओळखपाळख नव्हती. केवळ मासिकातून ते परस्परांच्या कविता वाचत होते. पण दोघांच्या ठिकाणी एकमेकांचे गुण ओळखण्याची माणुसकी होती. मानवतावादावरील शुष्क व रुक्ष प्रवचनपर कवितांपेक्षा मनुष्याच्या दिलदारपणातून व उदारपणातून उत्स्फूर्त झालेली असली काव्ये कुणाहि सहृदयाच्या हृदयास स्पर्श केल्याशिवाय राहणार नाहीत. चंद्रशेखरांच्या ह्या अनाहुत व अभावित स्तुतीने लेंभे भारावून गेले. त्यांनी चंद्रशेखरांना उद्देशून लिहिले;—

आर्य, प्रेमळ चंद्रशेखर, तुम्ही लीलाभराल्हादिनी
केली धारण कौतुकें, सुकविता गंगारसस्यंदिनी
हें वस्तुस्थलवैभव, प्रियजनप्रेमें मला लावलें
माझें दैव, जयें स्वयें, सहृदयाल्हादा पुढें आणिलें
वाणी वाणकवीश्वर प्रवचनीं झाली जगन्मोहिनी
जेथें श्रीकवि कालिदास रसता लीलामनोहारिणी
जेथे श्री भवभूति कल्पतरुची पुष्पें जणो हांसती
तेथें काय रडेल? हाय ! बुध हो, या पामराची मती
(नवयुग डिसें. १९१६)

'चंद्रिके'त 'हलवा', 'विलंबीनाम संवत्सर', 'नववर्ष', 'कवीची दिवाळी' इत्यादि उत्सवविषयक कविता आहेत. त्याचप्रमाणे 'सुविचार समागम', 'नव-युगाचें स्वागत' यासारख्या नियतकालिकांच्या प्रशंसापर कांही प्रासंगिक कविता आहेत. चंद्रशेखरांची राजनिष्ठा जाज्वल्य होती. ते प्रथम संस्थानी कर्मचारी होते. पण सेवानिवृत्तीनंतर त्यांना राजकविपद मिळाले होते. तेव्हां राजकुलातील

सभासमारंभाप्रीत्यर्थ त्यांनी कांही 'नैमित्तिक' कविता लिहिल्या आहेत. एखाद्याने कवितेची मागणी केल्यास चंद्रशेखरांना नकार देववत नसे. ते शालीन होते. अशा मागणीची पुरविणी केल्याखेरीज ते राहात नसत. इंदूरच्या महाराष्ट्र साहित्य सभेने 'मालव साहित्य' या आपल्या त्रैमासिकाचा पांचव्या वर्षाचा पहिला अंक–भाद्रपद शके १८५५–'विशेष' म्हणून काढण्याचें ठरविले; आणि कविते-करिता चंद्रशेखरांकडे विनंतीपत्र पाठविले. चंद्रशेखरांनी त्या विनंतीपत्राचा सत्कार व स्वीकार केला. सतारीच्या तारांना नखीचा स्पर्श होतांच ज्याप्रमाणे तिचे झंकार उमटतात त्याचप्रमाणे चंद्रशेखरांची काव्यस्फूर्ति उसळी घेई. त्यांनी ह्या प्रसंगी 'प्यारे इन्दोर!' ही कविता लिहिली. ती वाचल्यावर ती भावोत्स्फूर्त नाही असे कोण म्हणेल?—

भेटावयास मनोजवें दवडलों इन्दोर ! प्यारे तुला
जीवात्मा मम नाचतो बघुनिया 'इन्दोर' प्यारे तुला
'या हो !' शब्द करोनिया गुणिजनां बोलाविती मोर हे
हिंदाचें अरविंदसें हृदय हें, प्यारेंच इन्दोर हें !
तेजाच्या वलया मधोनि झुकुनी देवी अहल्याच ते
तीचें राजकुटुंबसे नगर हें स्वर्गातुनी पाहतें;
ती साध्वी निज माउली जरि अतां स्वर्गस्थ आहे, तरी
हें इंदूर न, लाडके हृदय हें राहे तिचें भूवरी !

त्याचप्रमाणे जानेवारी १९३६ मध्ये सयाजीराव महाराजांच्या हीरकमहोत्सवात चंद्रशेखरांची ईमानाला शाबूत राहाणारी राजनिष्ठ प्रतिभा सहजगत्या उद्गारली;—

तारा एकचि शुक्र हा झळकतो संपूर्ण तारांगणी
सृष्टी एकचि चंद्रमा धवलितो ताऱ्यांतला अग्रणी
तेजाने दिपवी अशेष भुवनें तेजोनिधी एक हा
राजांच्या वलयांत एक तळपे राजा सयाजी पहा!

'कविता' ही चंद्रशेखरांची आराध्य देवता होती. 'कवितारतीं'तील

तुझ्यास्तव हुजूरचा जरि गुलाम झालों स्वतां

ह्या चरणात त्यांनी 'कविते'च्या उपासनेसाठी आपण बडोद्याची चाकरी पत्करली असा कबुली जबाब दिला आहे. निष्ठा कुणाच्याहि संबंधीं असो, ती प्रामाणिक व प्रांजल पाहिजे. तेव्हां राजनिष्ठ चंद्रशेखरांना 'युवराजांचा प्रतिहारी', 'युवराजवियोग', 'सुवर्ण महोत्सव', 'शुभमंगल सावधान' इत्यादि कविता स्फुराव्या हे स्वाभाविक होते. त्यांचा पिंड राजनिष्ठेचा होता.

चंद्रशेखरांच्या नैमित्तिक व प्रासंगिक कविताहि हृदयंगम आहेत. त्यात ओढून ताणून आणलेले चंद्रबळ नाही. त्या अगदी स्वाभाविक वाटतात. ह्याचे

कारण चंद्रशेखर मनाने निर्मळ, निर्मत्सर व निरहंकारी होते. त्यांनी मोगरे व लेंभे यांना प्रत्यक्ष कवीच पाहिले नव्हते. पण त्यांच्या कवितांवर त्यांची अव्यभिचारिणी भक्ति होती. आरंभी नाही, तरी पुढे सयाजीरावांनी आपल्या कृतीची परीक्षा केली याबद्दल ते महाराजांचे कृतज्ञ होते. आणि आधी करमणूक, मासिक मनोरंजन, सुविचार समागम, काव्यरत्नावलि या मासिकांनी आपल्या कवितालेखनाला प्रोत्साहन दिले आणि पुढे रत्नाकर, यशवंत, ज्योत्स्ना या मासिकांनी आपल्या कृतीचा आदर केला ह्याबद्दल त्यांना अभिमान वाटत होता. चंद्रशेखरांना मी पाहिले नव्हते. पण माझे इंदूरचे स्नेही रामचंद्र अनंत काळेले सांगत होते;—"पंडित! एकोणिसशे चौतीसच्या बडोदे येथे भरलेल्या साहित्य संमेलनात मी व बोरकर सर्व कवीत लहान होतो. चंद्रशेखर आम्हांस वडिलांप्रमाणे होते. ते आमच्या जवळ आले. आणि आमच्या खांद्याला स्पर्श करून म्हणाले, 'उद्या आपण माझ्याकडे चहापानासाठी यावयाचे.' त्यांच्या त्या विनम्रवृत्तीने आम्ही अगदी भारावून गेलो."

एकोणिसशे सतरा ते एकोणिसशे सत्तावीस हा दहा वर्षाचा काळ चंद्रशेखरांच्या जीवनात कांहीसा अस्वस्थतेचा व संत्रस्ततेचा गेला. विठ्ठलराव घाटे सांगतात,— "(बडोद्याचे) घर चंद्रशेखरांच्या वडील बंधूंचे होते. नानासाहेब मोठे अंमलदार होते. निवृत्त झाल्यावर नर्मदेच्या काठी स्नानसंध्या करून होते. चंद्रशेखरांना त्यांचे सर्वतोपरी साहाय्य मिळत असे. परंतु कांही कारणांमुळे नानासाहेबांची बुद्धि फिरली. चंद्रशेखरांच्याविषयी मनात तेढ उत्पन्न झाली. एके दिवशी बडोद्यास येऊन नानासाहेबांनी चंद्रशेखरांना घराबाहेर काढले. पितृतुल्य वडील बंधूकडून झालेली ही संभावना त्यांच्या हळव्या मनास झेपली नाही." [दिवस असे होते. पृ. १५८] तेव्हां या कालखंडात चंद्रशेखरांनी 'उत्कंठिता' आणि 'वनवासाची सुखें' या दोनच अपवादात्मक कविता लिहिल्या. त्यांना इंग्रजीचा आधार आहे. पण त्यात चंद्रशेखरांच्या तत्कालीन मनःस्थितीची आवडनिवड दिसते.

चंद्रशेखरांच्या कवितालेखनाचा पूर्वार्ध येथे संपला. यानंतर दहा वर्षांनी त्यांच्या प्रतिभेला पुन्हा नवी पालवी फुटली आणि टवटवी आली. कवितालेखनाच्या पूर्वार्धात चंद्रशेखरांनी आपल्या पूर्वगामी कवीप्रमाणे काठेवाडातील प्रभासपाटण येथील सोमनाथावर महाकाव्य रचण्याचा प्रयत्न केला. परंतु तो "वास्तुदर्शन' व 'विभूतिवर्णन' या दोन सर्गांच्या पलिकडे गेला नाही. उदासीनतेच्या काळात चंद्रशेखरांनी आपल्या कवितांच्या वह्या फाडून टाकल्या होत्या. त्यात हे सर्गहि नष्ट झाले होते. पण दुसऱ्या सर्गाच्या मसुद्याचा कांही भाग सुदैवाने शिल्लक उरला होता. तो 'चंद्रिके'त समाविष्ट करण्यात आला

आहे. चंद्रशेखरांच्या स्फुट कविता मराठवाड्यातले त्यांचे एक अहेतुक चाहते राजेश्वर यादव मुळावेकर यांनी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयामधील करमणूक, मनोरंजन, नवयुग इत्यादि मासिकांच्या जुन्या फायली शोधून नकलून ठेवल्या होत्या त्यामुळे त्या एकत्र उपलब्ध होऊ शकल्या. हे मुळावेकर नांदेडला असतात. ते मुंबईला रुग्णशय्येवर असताना चंद्रशेखर मुद्दाम त्यांच्या शुश्रूषेसाठी तेथे जाऊन दहाबारा दिवस राहिले होते. खरे प्रेम लाभालोभाकडे पाहात नाही हेच खरे.

महाकाव्याप्रमाणेच या कालावधीत चंद्रशेखरांनी टिळक, केशवसुत, विनायक आदि स्वकालीन मित्रांच्या कवितांच्या घाटणीवर वैणिके लिहिण्याचा उपक्रम केला. इंग्रजी 'लिरिक'च्या घाटणीवर वैणिके गाणाऱ्या दत्तांचा त्यांना वर्षभर साक्षात् सहवास लाभला होता; आणि त्या गायनवादनप्रेमी कविमित्राच्या मुखाने त्यांनी त्याची वैणिके ऐकलीहि होती. परंतु चंद्रशेखरांना वीणाकाव्यांच्या लेखनात यश आले नाही. 'कारंजे' आणि 'कालार्णव' ही स्फुटित, त्रुटित व सुटसुटीत वीणाकाव्ये त्यांनी अनुक्रमे James Russel Lowel ह्याच्या Fountain आणि Lord Byron ह्याच्या The Ocean ह्या वैणिकांच्या आधारे लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी त्यांची रचना मात्रिक जातीत केली आहे. परंतू या दोन्ही वीणाकाव्यांतील मूळ अंतःसत्त्व (Spirit) त्यांना आपल्या मराठी रचनेत कोंडता आले नाही.

भाषेवर असाधारण प्रभुत्व असताना आणि वेगवेगळी वृत्ते हाताळण्यात हातखंडा असताना चंद्रशेखरांना महाकाव्याच्या रचनेत आणि भावकवितेच्या लेखनात अपयश कां आले हा एक विचारणीय प्रश्न आहे. प्रदीर्घ खंडकाव्ये यशस्वितेने लिहिणाऱ्या चंद्रशेखरांना महाकाव्य रचण्यासाठी लागणारी सवड नव्हती किंवा आखीव व रेखीव रचना करण्यात त्यांचा बहुतेक काळ खर्ची पडत होता येवढे सांगितल्याने चिकित्सक जिज्ञासूचे समाधान होणार नाही. महाकाव्यात वर्णनांना भरपूर अवसर असतो. चंद्रशेखरांना हुबेहूब चित्रमय वर्णने सुंदर साधत याविषयी वाद नाही. मग त्यांच्याकडून एखादे महाकाव्य निर्माण कां झाले नाही ? या प्रश्नाचे उत्तर असे की, महाकाव्याच्या निर्मितीसाठी सर्जनशीलता (Creative Genius) व कल्पकता (Imagination) यांची अत्यंत आवश्यकता असते. त्यांचा चंद्रशेखरांच्या ठिकाणी अभाव होता. भावगीताचे स्फुरण व्हावे ह्यासाठी कवि मूळात भावोन्मत्त किंवा विकारविवश हवा. तो मनाने कल्पनामय स्वप्नसृष्टीत संचार करणारा हवा. त्याच्या भावनेवर व्यवहाराचा, विकारावर विचाराचा आणि कल्पनेवर वास्तवाचा पगडा नको. चंद्रशेखर जात्याच संयमशील, विचारी व खाली पाहून चालणारे होते. त्यांना

त्यांना भावगीताचा आत्मा सापडला नाही. ते त्यास शोधण्यासाठी चांचपडत असताना एकदोन वेळा तो त्यांच्या हाती लागला होता. पण तो त्यांच्या हातून सुटला व पुन्हा निसटला. कविता लेखनाच्या उत्तरार्धात चंद्रशेखरांना 'शारदे' ! हे निर्दोष व नितांत रमणीय 'सुनीत' (Sonnet) स्फुरले आहे; आणि 'प्रतिभे'! व 'गृहिणीचे डोळे' ही भावगीते उत्स्फूर्त झाली आहेत. 'शारदे' या सुनीतात आठ ओळींचा पहिल्या व सहा ओळींचा दुसरा असे दोन विभाग असून पहिल्या विभागांत कवीच्या मनोरचनेचे आविष्करण आहे; आणि दुसऱ्या विभागात शारदेने कविमनाचे इप्सित पुरवावे म्हणून तिचे आराधन आहे. चंद्रशेखरांनी या सुनीतात चरणांची संख्या चौदा ठेविली आहे. परंतु यमके मात्र नेहमीच्या पद्धतीप्रमाणे साधली आहेत. 'प्रतिभे'! या भावगीतात 'कवि हा जन्मावा लागतो. तो सिद्ध करता येत नाही' हे तत्त्व आविष्कृत झाले आहे. 'प्रतिभे'ला संबोधून चंद्रशेखर विचारतात;–

कुठुनि सखे ! वद येसी ? प्रतिभे !
अज्ञेयाच्या अंध तमांतुनि ?
की तेजोमय खं–ब्रह्मांतुनि ?
चैतन्याच्या की हृदयांतुनि ?
संभवुनी स्फुरतेसी ? प्रतिभे !
तूं जादूची अद्‌भुत करणी ?
की सोन्याची मोहक हरणी ?
किति हरले गे तुझिया हरणीं !
तरि झटती मृगयेसी ? प्रतिभे !

'गृहिणीच्या डोळ्यां'वर चंद्रशेखरांची मखलाशी आहे;–['कोणी एक रसिक गृहिणीच्या डोळ्यांशी एकतानता झाली तेव्हां म्हणतात';–]

मधुर मधुर हेच झरे प्रेम–जीवनाचे
बघुनि यांस हर्षभरें रसिक जीव नाचे !
पुष्करिणी ? की हरिणी ?
गुरुशुक्रान्वित रजनी ?
नृत्य असें नित्य मनीं
होय कल्पनांचें.
हें विनयें खालवले
अमृतभरें वा लवले
बघुनि यांस आठवले
पुंज नव घनांचे.

यांचे मृदु विभ्रम ते
किति सुललित ! मन रमतें
हेंच मला सुख गमतें
नंदना वनाचें.

चंद्रशेखरांची ही भावगीते किंचित् लांबली आहेत गृहिणीचे डोळे' हे गीत आत्मपर नाही, नाटयात्मक आहे. असे वागावे म्हणून चंद्रशेखरांनी त्यावर स्पष्टीकरणार्थ टीप दिली आहे. चंद्रशेखर नेहमीचा मार्ग सोडून मधून मधून नव्या मार्गाकडे वळत. पण आपला मार्ग जुना आहे ह्याची त्यांना सतत जाणीव असे.

माधवराव आळतेकर सांगतात;—"चंद्रशेखरांची कविता त्यांच्याच मुखावाटे ऐकण्यांत विशेष मौज होती. त्यांना गाण्याचें अंग नव्हतें. पण त्यांची वाणी शुद्ध व मधुर होती. आणि त्यांचें कविता पठण कानाला फार मधुर लागे. कविता वाचतांना त्यांतील सौंदर्यस्थळाची फोड ते करून सांगत.', [महाराष्ट्र शारदा, एप्रिल १९३७]. 'कवि' या भूमिकेच्या जोडीला 'व्यासंगी विद्वान' ही चंद्रशेखरांची आणखी एक भूमिका होती.* कविता साधार असो की स्वतंत्र असो तिच्या शिरोलेखाखाली ते विषयानुरूप एखादे संस्कृत किंवा इंग्रजी अवतरण देत. कवितेच्याखाली ते अर्थनिर्णायक व विवरणात्मक तळटीपा देत. आपल्या कवितेत पुराणकथांचे व ऐतिहासिक आख्यायिकांचे संदर्भ देण्याची त्यांना फार हौस होती. या मूळ कथा व आख्यायिका ते कवितेखाली सविस्तर देत.

आधुनिक कवितेतील खंडकाव्याच्या क्षेत्रात चंद्रशेखरांनी केलेला विक्रम विशेष आहे; आणि विजय अपूर्व आहे. चंद्रशेखरांची कथनशैली अवीट आहे. त्यांना महाकाव्याकरिता कथानक गुंफता आले नसले, तरी खंडकाव्यातील कथा कथन करण्याचे त्यांचे कसब अवर्णनीय आहे. चंद्रशेखरांची प्रतिभा संस्कृत साहित्यशास्त्रात सुस्नात झालेली होती. रस, अलंकार, गुण, रीति, ध्वनि-औचित्य इत्यादि सिद्धांतांचा सम्यक् व समुचित उपयोग करून कथा चित्ता-कर्षक करण्यात ते निपुण होते. 'काय हो चमत्कार!' 'उगूड गुपित' आणि 'किस्मतपूरचा जमीनदार' ही त्यांची तीन खंडकाव्ये वरील विधानांची साक्ष देतील. ही तीन खंडकाव्ये चंद्रशेखरांनी सहेतुक रचली आहेत. या तीन्ही खंडकाव्यांतील पात्रांची निवड चंद्रशेखरांनी मुद्दामच खेड्यापाड्यातून केली आहे. पण त्या कथांच्या द्वारे त्यांनी पांढरपेशांच्या समाजामधील विवाहपूर्व

*निद्रा, अमरत्व, एकी, अतिरेक, सौजन्य आदि कविता या विधानाचा पाठपुरावा करतील.

प्रेम, प्रियाराधन, वल्लभानुनय, कुलीनतेचा अवास्तव अभिमान, आर्थिक विषमता, रूढिवर्चस्व इत्यादि समस्या उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. या समस्या 'काय हो चमत्कारां'त आहेत, तर 'उगूड गुपित'मध्ये विधवा विवाहाचा प्रश्न आहे. तो म्होतुराच्या दाखल्याने सोडवला आहे. 'किस्मतपूरच्या' जमीनदारां'त ग्रामोद्धाराच्या योजनेचे (Village Uplift Scheme) दिग्दर्शन आहे, आणि आन्तर्प्रांतीय विवाहाचे चित्रण आहे.

चंद्रशेखरांनी खंडकाव्याच्या क्षेत्रात केलेल्या विक्रमाची ओळख व्हावी यासाठी 'काय हो चमत्कार!' ह्या काव्याचा थोडक्यात परामर्श घेतला तरी पुरे होईल.* काव्यनायिका 'जिऊ' आणि नायक 'शिवबा' ह्यांची शब्दांच्या रंगांनी रंगवलेली ही चालती बोलती चित्रे पहा;--

गोधूमवर्ण तीचा हरणाच्या पाडसापरी डोळे,
स्नेहाळ वदन नामी, प्रसन्न विधुबिंब जेंवि वाटोळें,
तो केशपाश काळा, भाळावरि लांब आडवे कुंकू,
जणुं म्हणति शब्द तीचे आम्ही कोकिलरवासहि जिंकूं
ग्रामस्थ तरुणकर्षक, उपनावे म्हणति ज्यास 'घायाळ'
त्यास जिऊने केले अपांग बाणे क्षणांत घायाळ !
प्रथम विकाराची ती प्रथमचि ये त्याचियामना भरती;
थरथर कांपूं लागे, आले रोमांचही वपूवरती;
रसना शुष्क जहाली, शब्द निघेना मुखांतुनी नीट,
लागे हृदय उडाया, घाबरला तो असून ही धीट,
दर्शन, सहवास, पुढे भाषण, अनुनय तयांमधे चाले;
प्रेमाचें परिपोषण अशा क्रमे परिचयासवे झाले,
एके दिनीं सकाळीं शेतांतील लोक पांगले गेले,
हे पाहुनि शिववांनी प्रेमाचें मागणें तिला केलें,
किन्नर मिथुनासम ती द्राक्षीच्या रम्य मंडपाखाली
कांही गुंजन करितां अदृश्य तेथेंच् दृष्टिला झाली!

चंद्रशेखरांनी या आर्यांत किती थोडक्यात 'प्रथम दर्शनी प्रेम' व 'प्रियाराधन' यांना सजीव केले आहे. शेवटच्या आर्येतील 'ध्वनि' विलक्षण काव्यमय आहे. 'मिथुन', 'द्राक्ष', 'मंडप', 'गुंजन' या 'समागमा'च्या, 'यौवनोन्मादा'च्या, 'विवाहा'च्या व 'प्रेमालापा'च्या, सूचक प्रतिमा आहेत. त्या दोघांचे प्रेम 'जिऊ'चा

---

* या काव्याचे मूळ Suffolk Miracle हे Percy च्या Reliques मध्ये असावे असे वाटत होते. पण तेथे ते नाही.

पिता 'धनाजी' याला मान्य नव्हते. 'धनाजी श्रीमंत होता. 'शिवबा' त्याचा गरीब नौकर होता. त्याने पाळत ठेवून त्या दोघांच्या प्रेमचेष्टा पाहिल्या. त्यावर भाष्य करताना 'परि–क्षिति' या शब्दावर सहजश्लेष साधून चंद्रशेखर म्हणतात; —

हे प्रेम मद्यपी हो ! स्वपिता–संगोपिताच जो दिसला
त्याचा रूपविपर्यय नेणुनि धुंदीमधे तुम्ही फसलां
शिवबा ! प्रमदवनांतिल बोराचा जाहलास भक्षक ना ?

तो बघ तुजला डसला, बसला होता तयांत तक्षक ना !
ह्याची परि क्षिति–तुज–भान कसें रे न राहिले राया !
पण भवितव्य न येते ज्ञानी पुरुषासही निवाराया

शेवटचा 'अर्थान्तरन्यास' लक्ष्यात घेण्यासारखा आहे. पुढे शिवबाची निराशा झाली व वेड लागले; आणि त्यातच तो मरण पावला. या धक्क्याने जिऊचाहि अंत झाला अशी ही दोन प्रेमी जिवांची विलासिका व विलापिका आहे.

चंद्रशेखरांचे 'गोदागौरव' हे खंडकाव्य कथाकाव्य नाही. ते अपूर्ण आहे. त्यांत गोदावरीच्या परिसराशी संबद्ध अशा चंद्रशेखरांच्या स्मृति आहेत. त्या सलग नाहीत. कवीला ज्यावेळी ज्या प्रसंगाची स्मृति झाली, त्यावेळी, ती स्मृति शब्दांकित झाली आहे. ह्या स्मृति स्वच्छंद असल्यामुळे आणि त्यांतील कांही स्मृति 'अयिमधुरे ! मधुमोद विलासिनी' या आचार्यांच्या यमुनाष्टकाच्या छंदात असल्यामुळे भावमधुर झाल्या आहेत.

आयुष्याच्या उत्तरार्धात चंद्रशेखरांचे मन आध्यात्मवादाकडे वळले होते. त्यांनी रामतीर्थ, विवेकानंद व निवेदिता यांच्या स्तोत्रांचे व भावगीतांचे अनुवाद केले आहेत. आणि सयाजीराव महाराजांच्या इच्छेप्रमाणे इंद्र, अग्नि, वरुण इत्यादिकांच्या वैदिक स्तोत्रांचे मराठी पाठ रचले आहेत. चंद्रशेखरांचे हे साहित्य जितके उच्च तितकेच उदात्त आहे.

चंद्रशेखर रीतिवादी आहेत. त्यांच्या काव्याचे प्रामुख्याने डोळ्यात भरणारे दोन गुण म्हणजे भाषेचे सौष्ठव व रचनेचे शिल्प. चंद्रशेखरांची भाषा प्रगल्भ असली, तरी प्रवाही, प्रासादिक व प्रसन्न आहे. त्यांच्या कवितेतला शब्द थेट मराठी असो किंवा शुद्ध संस्कृत असो त्यात अर्थ (Sense) व नाद (Sound) यांचा एकजीव झालेला असतो. त्यांची भाषा कमावलेली आहे, पण कृत्रिम नाही. भावनेची अभिव्यक्ति करण्यास ती समर्पक व समर्थ आहे.

चंद्रशेखरांची पदरचना मोठी डौलदार आणि ऐटबाज आहे. तिच्या विन्या-सांत विलास व उल्हास आहे. चंद्रशेखरांना प्रास, अनुप्रास आणि यमके अनायास

साधतात. त्यासाठी त्यांना कष्ट पडत नाहीत. चंद्रशेखरांची बहुतेक कविता वृत्तबद्ध असली, तरी वृत्ताची निवड करण्यात ते चोखंदळ आहेत. एकोणिसशे अकराच्या मासिक मनोरंजनाच्या दिल्ली दरबारच्या खास अंकासाठी त्यांनी 'राजनीति गीतिका' ही कविता रचली होती. तिच्यासाठी त्यांनी 'चारुचामर गीतिका' हे सताल वृत्त योजले आहे. त्या कवितेतील ह्या कांही ओळी पहा;—

तव मांडलीक नृपाल हे, अधिकार धारक हे पहा !
बहुतारकावलयांत या जणुं चंद्रमंडल तूं महा !
क्षिति मंडलांतुनि लोटिलीं अधिराज ! हीं अभिनंदने
करितो पुरातन जाणता तुज हिंद हीं अभिवंदनें

ह्या ओळी तालासुरावर म्हणताना जणूं कांहीं एखाद्या सम्राटाच्या शिरावर मोठी झोकदार व झाप टाकणारी चवरी हस्तकौशल्याने ढळत आहे असा भास होतो !

वयाच्या ६६ व्या वर्षी चंद्रशेखरांचा अंत झाला. कवितादेवी प्रसन्न व्हावी यासाठी त्यांनी आजन्म शारीरिक व मानसिक श्रम सहन केले. वयाची साठी उलटल्यावर त्यांचा 'चन्द्रिका' हा कविता संग्रह प्रसिद्ध झाला; आणि सयाजीराव महाराजांनी त्यांना राजकवीचे पद बहाल करून त्यांचा सन्मान केला. 'चंद्रिके'वर चंद्रशेखरांनी सेम्युएल टेलर कोलरिजच्या Youth And Age या कवितेतील कांही ओळी दिल्या आहेत. त्या त्यांना त्याकाळी वाटलेल्या केवलानंदाच्या द्योतक आहेत;—

Verse, a breeze amid blossoms straying,
Where Hope clung feeding, like a bee–
Both were mine ! Life went a-maying
With Nature, Hope and Poesy
When I was young !
Flowers are lovely; love is flowerlike;
Friendship is a sheltering tree;
O ! the joys that came down shower-like
Of Friendship, Love and Liberty,
Ere I was old !

मराठीची बदलती रूपे

३–पेशवे कालीन मराठी

श्री. शं. खानबेलकर

मराठी भाषेचा अभ्यास करताना, व्याकरण आणि रचना यांच्या अभ्यासाबरोबर भाषेच्या कालिक आणि प्रांतिक भेदांचा अभ्यास करणं आवश्यक असतं. त्या दृष्टीनं मराठी भाषेचे, यादवकालीन, शिवकालीन, पेशवेकालीन, अव्वल इंग्रजीकालीन आणि अर्वाचीन असे स्थूल भेद पाडलेले दिसतात. त्यापैकी पेशवेकालीन मराठीचे स्वरूप आज पहावयाचे आहे.

ज्ञानेश्वरादि संतांनी आणि महानुभव कवींनी, यादवराजांनी, यादव कालात मराठी भाषा संपन्न केली. नंतरच्या काळात, परकी अंमलामुळे मराठीवर फारसी–अरबीचा फार मोठा परिणाम झाला. शिवछत्रपतीच्या प्रयत्नानं मराठी भाषेला पुन्हा सोज्ज्वळ रूप आलं असं वाटायला लागलं तोच पेशवेकालात शिवशाहीच्या वेळचं वातावरण आणि परिस्थिति एकदम बदलली. पेशवेकालीन मराठी भाषेचा कालखंड स्थूलमानाने इ. स. १७०० ते १८५० पर्यंतच्या दीडशे वर्षांचा धरतात. पेशव्यांच्या उदयास्ताच्या काळाबरोबर हा कालखंड तंतोतंत बसत नाही खरा, पण भाषेचा विचार करीत असताना संपूर्ण अठरावं शतक आणि एकोणिसाव्या शतकाचा काही भाग जमेस धरला तर ही कालमर्यादा वावगी वाटण्यासारखी नाही.

शिवशाहीच्या काळात मराठ्यांच्या हाडीमाशी परक्यासंबंधी शत्रुत्वाची भावना उसळत होती. शंभुछत्रपतीच्या अमानुष वधामुळे आणि शाहूच्या कैदेमुळे ह्या भावनेनं सूडाचं उग्र स्वरूप घेतलं होतं. शाहूच्या सुटकेनं ही सारी परिस्थिति एकदम बदलली. राज्ययंत्र चालवण्याच्या कल्पनेत बदल झाला. स्वार्जित स्वराज्याचा जागता अभिमान ओसरला आणि दिल्लीच्या सिंहासनाबद्दल काहीसा आपलेपणाहि वाटू लागला. साम्राज्याच्या सीमा वाढवीत असताना दिल्लीच्या सम्राटाला मुळीच दुखवू नये अशी शाहूची आज्ञा बाजीराव, चिमाजी यांना जारी झाली. राजकारणापेक्षाहि भाषेवर ह्या परिस्थितीचा फार परिणाम झाला. मराठ्यांचे भीमथडी घोडे गंगेत न्हाले. बारगीरांना, सैनिकांना, राउतांना मराठी भाषेपेक्षा फारसीचा डौल अधिक वाटायला लागला आणि फारसीची मगरमिठी पेशवेकालात जास्त जखडून आवळली गेली.

पेशव्यांच्या स्त्रिया मराठीबरोबर फारसी उत्तम जाणत, पेशवेकालातले पत्र-व्यवहार करणारे लेखक ब्राह्मण, प्रभु, सारस्वत ह्यापैकी कलमबहाद्दर होते. मुलुखगिरी, मर्दुमकी, युद्धे, वसुली या ना त्या कारणानं मराठ्यांची फौज मारखी फिरत होती. उत्तरेस जसा फारशीचा अमल होता तसाच निजाम आणि टिपू यांच्या राज्यामुळे दक्षिणेतही फारसीचा प्रभाव होताच. त्यामुळे आज प्रसिद्ध झालेल्या लक्षावधि पत्र, सनदा, हकीकती, बखरी यामधून मराठीवर फारसीचा परिणाम झालेला स्पष्ट दिसतो. ह्या खाजगी आणि राजकीय पत्र-व्यवहाराची गोष्ट सोडून दिली तरी आणखी दोन महत्त्वाचे प्रवाह तत्कालीन मराठीभाषातरंगिणीत आले होते. पंडिती काव्य आणि साहित्याच्या बाबतीत भाषा पुष्कळच सोज्वळ राहिली. वामन, कचेश्वर, निरंजन माधव, शामराज, कृष्णदयार्णव, श्रीधर, महिपती, मोरोपंत यांनी मराठी भाषा संपन्न केली. काव्यालंकारांनी तिला शोभा आणली. ती सुसंस्कृत केली. पंडिती काव्या-बरोबरच बहुजनसमाजाला अत्यंत प्रिय असलेला शाहिरी काव्याचा तिसरा प्रवाह गुणांनी सकस होता सुंदर रचना, उत्कृष्ट चाली, शृंगार, वीर, करुण, अद्भुत आणि क्वचित भक्ति ह्या रसांचा आविष्कार हे ह्या प्रवाहाचे विशेष होते. दर्जेदार, आणि नांवाजलेल्या शाहीरांपैकी प्रभाकर, अनंतफंदी, रामजोशी हे ब्राह्मण होते, सगनभाऊ मुसलमान होता, परशराम शिंपी होता तर होनाजीबाळा गवळी होता. सैनिकांच्या व बहुजनसमाजाच्या अस्सल मराठमोळ्या मनाचं रेखीव प्रतिबिंब शाहीरी काव्यात पडलेलं आपल्याला आढळतं.

संस्कृत, फारसी ह्या दोन्ही भाषांतले शब्द, रचनाविशेष आणि लेखन प्रकार घेऊन मराठी भाषा त्यावेळी अत्यंत संपन्न आणि डौलदार, उमदी झाली होती आणि आजहि ती आपल्या वेगळेपणानं मराठी साहित्यात उठून दिसत आहे.

व्याकरण, शब्द, प्रयोग, म्हणी, वाक्प्रचार ह्या दृष्टीनं त्या काळातल्या भाषेत अभ्यासकांना अनेक विशेष सांपडतात. स्वर आणि व्यंजने ह्यांच्या प्रक्रिया, नामविभक्ति, क्रियाविभक्ति, चमत्कारिक सामान्यरूपे, अव्यये, विशेष प्रकारचे वाक्प्रचार, आणि शब्दविशेष यांचा अभ्यास करणं अत्यंत मनोरंजक आहे. फारशी भाषेत व्यंजनान्त स्वर नेहमी स्वरान्त उच्चारतात. निभृत तोकडा अ उच्चारण्याची ही संवय त्यावेळी आपण उचलली. गवत, गवत्, नवल, नवल्, असे मूळचे स्वरान्त स्वर आपण व्यंजनान्त उच्चारू लागलो. मुळातला स्वरान्त उच्चार अजूनहि कोल्हापुरी बोलीत संबोधनाच्या वेळी वापरतात. अशोक असा उच्चार त्या बोलीत आपण ऐकतो. त्याचप्रमाणे कांही निभृत स्वर आपण पूर्णहि उच्चारू लागलो. सर्कार, दर्बार, जर्तार ह्यांच्या ऐवजी आम्ही सरकार,

जरतार, दरबार असे म्हणू लागलो. त्यावेळच्या काही वर्ण व स्वर प्रक्रिया आणि काळाची रूपे पहाण्यासारखी आहेत.

माहाभारत, सवशय, सप्तरिसि, द्रुष्टि, येश, राजकारण, पुण्याचवळ, काहाडणे, अशी वर्णप्रक्रिया सहज होत असे. तृण शब्द त्रृण, तृण, त्रुण, त्रण इतक्या प्रकारानं लिहिलेला आढळतो. वर्णसंभ्रम कितीतरी होत असत. अदमासे-अजमासे, नुकसान-लुकसान, नजर-नदर, तावडतोब-तावडतोड, असे संभ्रम नित्य आढळतात.

पुणियास, नवाबासी, श्रीमंताही, सातारां, हत्तीची लढाइमंधी, कारखानेयांत मुरारराव सोंदुरावर आहेची खबर आली, असे त्रिभक्तिप्रत्यय पेशवाइतील भाषेत सर्वत्र आढळतात. क्रियापदे आणि अव्यये यांच्या बाबतीत विशेष निराळे-पणा आढळतो. (आम्ही) ऐकतोत (ते) बोलताती, (आम्ही) जाउन, (ते) म्हणतो, ठेवले न पाहिजे, अशी क्रियापदे होती तर अविलंबेच, उपरांतिक, वरचेवरी, जात्येसमजि, क्षणक्षण, होयेस्तवर, तुम्हासांगाते अशी अव्यये वापरीत असत. कानडीच्या संसर्गाने येची, यँसीजे, यँवजा, येथान्याय, वोषध, असे उच्चार, म्हणजे अे, अै, ओ, औ हे शब्दाच्या प्रारंभी येणारे स्वर ये, यँ, वो, वौ असे उच्चारावयाची प्रथा या काळात आढळते. त्याचप्रमाणे अि आणि अु, हे स्वर अंती आल्यास त्यांच्या अैवजी अ, उच्चारणाची लकब दिसून येते. संतति-संतत, भाऊ-भाव, अग्नि-अग्न, मृत्यु-मृत्य. व्यंजनाचे द्वित्व कित्येक ठिकाणी गाळलेले आढळते. हल्ली-हली. अठठावीस-अठावीस शुद्ध-शुध. न अैवजी ण, ष, श, अैवजी स, ज्यांच्या प्रक्रियेची संगति लावता येत नाही अशी चमत्कारिक रूपेहि आढळतात. प्रजन्यकाल, आयके. नामाच्या पुढे विशेषण ठेवण्याची फारशी भाषेतली पद्धतहि बहुत करुन आढळते. अनानासे शंकर ग्रंथ श्री शंकर-भगवत्पूज्यपादकृत.

त्याचप्रमाणे त्या काळातले काही शब्दविशेष, वाक्प्रचार, आणि शैलीचे नमुनेहि पाहण्यासारखे आहेत. सुटसुटीत लहान लहान वाक्ये, रूपक उपमादि योग्य अलंकारांची खुलावट, अंतरंगाला सहज भिडणारी प्रसादयुक्त, रसाळ पण भडक जडणीघडणीची भाषा हे तत्कालीन भाषेचे विशेष आहेत. त्या काळा-तले काही विशेष शब्द, वाक्प्रचार, म्हणी आणि काही उतारे अभ्यसनीय आहेत. त्यामुळे पेशवेकालीन भाषेची खरी कल्पना येईल. भाषा तरंगिणीतल्या ह्या तीनहि प्रवाहातले काही घोट घेण्यासारखे आहेत. हे काही गमतीदार शब्द पहा. उभा मार्ग-जकात. उपरोविक कमीअधिक उचापत-उधारी. कुष्टपिष्ट-खायेमखा-नक्की. ढालढकल त्यादारभ्य, परिछिन्न, पायउतारा, वालाग्र, रूबरू, हर्षामर्ष, ह्या शब्दांप्रमाणेच म्हणी आणि प्रयोगविशेष आहेत. धुळीचे दिवे खात जाल.

अनुक्रमणिका

तुपाचे घागरीवर उंदराचे पिटकुले—लहान माणसाचे पंक्तीस बसावे लागते हाच मृत्यु आहे. घोडा स्वाधीन नसल्यास बसणारा काय करील. जितके फितुरांत होते त्याचे शीड उभारले. आपण ज्या पाण्यात बुडा म्हणिजेल त्या पाण्यात बुडावयास सिध आहो. पैंजार खाउन दंतभंग जाला. शुस्क वृक्षास पलव फुटून पुस्पित फळित होतो तद्वत. सुने रान सांपडल्यावर स्वापदाची प्रबलता होते. श्रीमंताचा आमचा स्नेह चिखलपाण्यासारखा आहे, चिखल पाण्यास सोडीत नाही व पाणी चिखलास सोडीत नाही, त्या चिखलमातीने आपण अिमारत बांधू. कल्पवृक्षाखाली झोलीस गांठी द्याव्या हे अपूर्व. सखारामपंत केवळ कोशकीटका-प्रमाणे कैद झाले. लढाअिचा दंगा पुरवतो, उपासाचा दंगा पुरवत नाही. सूज्ञेष्वलमतिपल्लवितेन अंगुठ्याचा दशाशीर करून दाखवितात. सुटले केस पाठीस शरण.

काही उतारेहि पाहण्यासारखे आहेत. गोविंदपंत (खेर) बुंदेल्याने उत्तर हिंदुस्थानात काय कामगिरी केली याचे रसभरित वर्णन असलेल्या १७५५ मधल्या ह्या पत्रातला काही भाग पहा—

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी—

विनंती सेवक गोविंद बल्लाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता. आश्विन वद्य ३० पावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे. विशेष

इकडील वर्तमान एकदोन पत्री सेवेशी लिहिले आहे. इकडील नवा मजकूर राजश्री जयाजी शिंदे यास मारवाडकरांनी दगा केला. हे वर्तमान जमिदारांस कळताच मनमाने त्याप्रमाणे लबाडीस आले. सकुराबाद, अिटावे यांजकडे जमिदाराशी झुंज मातबर आम्हाशी जाले. पंधरासोळा घोडी पडली. भले माणूस ठार जाले. स्वामीचे प्रतापे गवार (बंडखोर) मारुन कहाडिले. मी चाकर बारगीर स्वामीचा आहे. मजला मोठी उमेद आहे, स्वामीची चाकरी उमदेपणाने करावी, आणीक जागा, मुलूख स्वामीचे घरी फार आणून घालावा हे आहे. जर काही दगाबाजी करू तर ईश्वर आम्हास शिक्षा करील. आम्हास एक स्वामीची कृपा. हिमायत (आधार) म्हणावी तर, वशिला पगा म्हणावा तर, स्वामी खेरीज आमची गोष्ट वरी, सांगेसारखा कोणी नाही. आम्ही कान धरली शेळी आहे, हुकमी आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

नाना फडणीसाचे आत्मचरित्र पेशवेकालीन कागदपत्रांत फार प्रसिद्ध आहे. पानपतचा हाहाःकार झाल्या नंतर त्यांची मनस्थिति अशी होती—

अंतःकरणापासून होते की, श्रीकाशीस जाउन नेहमी वास करावा. प्रपंचातील विषय—मानी दुःख हे पुरते समजले. परंतु देहप्रारब्ध बळवंत. तेथे आलियावर सर्वांनी निषेध केला. लष्करावरोबर येउ लागलो. पुढे श्रीमंत

नानासाहेब यांचे दर्शन बराणपुरावर जाले. पाहतो तो शरीर फार क्षीण जाहले आहे. मर्जी वेतरहा जाली आहे. बहुतांच्या अश्रु क्षणाक्षणा जातात.

भाऊसाहेबांच्या बखरीतला हा उतारा पहा—बखरगद्याचा नमुना म्हणून पाहण्यासारखा आहे—

मग नारो शंकर, जनकोजी शिंदे एकत्र होउन दताजी शिंदे यांजकडे आले. आणि साफ जाबसाल केला की, तुम्ही मरावयास सिद्ध जाला. परंतु मुले–लेकरांनी काय पाप केलें आहे ? म्हणोन अैकताच दत्ताजी शिंदे यास विषाद येउन बोलते जाले की, नाना, तुम्ही काय समजून हा अर्थ बोलिला. आम्हासही पुरतेपणी समजले की, आमचे आयुष्याचा अंत जाला. मग मुले माणसे जगून काय करावी. कोणी आप तरावे आणि जगा तारावे, कोणी आप बुडावे व जग बुडवावे. मुले माणसांची शाका (तुकडे) करून हत्तीस अंदू घालून मारता मारता मरावे. मरणाहून अपेश वोखटे.

शाहीरांचा राजा प्रभाकर, यांची जडणघडण मोठी मनोवेधक आहे. एका सुंदरीचं हे वर्णन पहा––

रूंद छातिवर वुंद गेंद जणू गुलाब वहारा मधी फुलती। वसंत काळी कळे कोवळे तसे ग तुझे जोवन खुलती। श्रवणफुले श्रवणांत अमोलिक स्वच्छ हिऱ्यांची झळझळती । चंद्र विजेचा जसा तसा ग तव मुक्त लडा बाजुस रुळती। सरळ केश चोचीच मिन्याचे, मयूर फाशांमधी मिळती। वेणी विलोकुन सर्प भयाभित, होऊन वनांतरी । किती पळती। बाळया बुगडया घोस पाचुचे पाहुन वनी भुंगे पळती । शुद्ध घांट राखडीस भवते, मंगळ मृगु वसले न कळती। सुरांगना रूप पाहुन वर त्या, इंद्रसभेसी हळहळती । नेत्र बघुन ते इन्दुरथीचे कुरंग सहसाही न चलती.

श्रीधराच्या शिवलीलामृतातील भाषा अत्यंत सोज्वळ आहे. पेशवे- कालातल्या ह्या लोकप्रिय कवीच्या काही ओव्या पाहिल्या की पेशवेकालीन भाषेची कल्पना आपल्याला पूर्णपणे येईल.

मागुती नागराज झाला बोलता। तुम्ही कोण्या दैवतासी भजता। यावरी शिवमहिमा तत्वता। झाला वर्णिता चित्रांगद ।। प्रकृति पुरूष दोघे जणे। निर्मिली इच्छा मात्रे जेणे। अनंत ब्रह्मांडे प्रीतीने। रचियेली एळामात्रे।। इच्छा परतता जाण। अनंत ब्रह्मांडे टाकी मोडून। प्रकृति पुरुषात होती लीन पंचभूते तत्वासहित ।। मग दोघे एक प्रीती। आदिपुरुषामाजी सामावती। तो सदाशिव निश्चिती। आम्ही भजतो तयाते।

पेशवे कालीन मराठीचं रूप हे असं होतं.

[नागपूर आकाशवाणीच्या सौजन्याने]

अनुक्रमणिका

मराठी शारदेचं इंग्रजी मंदिर

[पूर्वार्ध *]

–प्रा. सुरेश म. डोळके

(१)

इ. स. १८१८ साली पुण्याच्या शनिवार वाड्यावरलं मराठ्यांचं वैभवशाली निशाण जाऊन तिथं इंग्रजांचा यूनियन जॅक डौलानं फडकू लागला. महाराष्ट्राचं स्वराज्य गेलं, मराठ्यांची संस्कृति नामशेष झाली, महाराष्ट्राची वैचारिकता लोपली आणि थोड्याच काळापूर्वी अटकेपार झेंडे नाचविणाऱ्या मराठा वीरांच्या भाल्याची चमक स्मृतिशेष झाली–असंच जणु तो तांबडा ध्वज नेतृत्वाच्या दिमाखानं जगाला फडफडून सांगत होता. महाराष्ट्राच्या क्षितिजावर रेंगाळत असलेला स्वराज्य–सूर्याचा रम्योदास संधिप्रकाश मावळला ! इंग्रजांनी महाराष्ट्राचं राजकीय क्षितिजच पादाक्रान्त केलं असं नव्हे, तर त्याच्या सांस्कृतिक आणि वैचारिक पृथगात्मतेवरही आघात करुन तिला जमीनदोस्त करण्याचा चंग बांधला होता.

–आणि म्हणूनच, 'एक राज्यक्रान्ति' एवढंच केवळ म्हणून इंग्रजांच्या या जेतृत्वाचं वर्णन करता येणार नाही; तर त्यावरोवरच, 'एक सांस्कृतिक आणि वैचारिक आक्रमण' असंही त्याचं मूल्यमापन केलं पाहिजे.

या आक्रमणाचं स्वरूपही इतकं अभिनव, सर्वंकष, मूलगामी आणि जलद होतं, की अमोघ अशा वज्र–प्रहाराचीच उपमा त्याला खरोखरी शोभावी !— कारण, हे परिवर्तन केवळ राजकीयच नव्हतं, तर सांस्कृतिक आणि वैचारिकही होतं. महाराष्ट्राच्या इतिहासात तोवर अनेक राज्यक्रान्त्या झाल्या होत्या. राष्ट्रकूट, चालुक्य, यादव इत्यादि पराक्रमी सम्राटांच्या राजवटी आल्या, गेल्या, अनेक विजिगीषु सम्राटांच्या स्वराज्यांचे आणि साम्राज्यांचे उदय आणि अस्त महाराष्ट्रानं उघड्या डोळ्यांनी पाहिले. या राजवटींनी महाराष्ट्राचं राजकारणही मळासकट ढवळून काढलं. पण, त्याच्या संस्कृतीत मात्र त्यांना क्रान्ति घडविता आली नाही. जणु सह्याद्रीच्या बेलाग कड्याप्रमाणं महाराष्ट्राची संस्कृति व वैचारिकताही कणखर, कडवी होती. मुसलमानी रियासतीचं महाराष्ट्रावर

---

* नभोवाणीवरील 'अव्वल इंग्रजी कालीन मराठी' या भाषणाची वाढविलेली आवृत्तिः नागपूर नभोवाणीच्या सौजन्याने.

अनुक्रमणिका

आक्रमण झालं तेव्हा महाराष्ट्रात राज्यक्रान्ति झाली असेल, धार्मिक उच्छेदही झाले असतील, आचारांची थोडीफार देवघेवही झाली असेल—पण महाराष्ट्राच्या संस्कृतीत व विचारसरणीत मात्र मूलगामी असा फरक तेव्हाही पडला नाही, स्वतःच्या अस्मितेवरचा महाराष्ट्राचा विश्वास तेव्हाही ढासळला नाही. 'पदरी पडले अन् पवित्र झाले' या न्यायानुसार महाराष्ट्रानं तेव्हा परकीय विचारसरणी आत्मसात् केली व तिचं हिन्दवीकरण किंवा महाराष्ट्रीकरण केलं. त्यामुळं, पूर्वीच्या राज्यक्रान्त्यांत महाराष्ट्र हा जरी राजकीय दृष्टया परतंत्र झाला, तरी त्या क्रान्त्या महाराष्ट्राला विचारसरणीच्या दृष्टीनं भोवल्या नाहीत, त्यांनी महाराष्ट्राचं महाराष्ट्रपण लोपलं नाही, त्यांची मराठी मनोवृत्ति हरपली नाही.

पण, पाश्चात्यांच्या आक्रमणामुळं महाराष्ट्रात जी राज्यक्रान्ति झाली, ती इतकी अपूर्व, इतकी सर्वंगामी होती, की महाराष्ट्राच्या संस्कृतीचं व वैचारिक जीवनाचं प्रायः एकही अंग तिच्या सर्वंकष कवेतून सुटू शकलं नाही. शिवाय, तिचं कार्य इतकं त्वरित घडलं की महाराष्ट्रातल्या बुद्धिवन्तांना व विचारवन्तांना तिचं स्वरूप आकळण्यासही वेळ मिळाला नाही. अमावास्येच्या कराळ काळोखात चांगल्या वाटसरूचीही मति कुंठित व्हावी, त्यालाही दिङ्मोह व्हावा आणि हताश होऊन त्यानं तिथंच बैठक मारावी—असाच प्रकार अव्वल इंग्रजी अमदानीत महाराष्ट्रातल्या मोठमोठ्या विचारवन्तांचाही झाला. त्यांची विचारशक्ति जणु पंगू झाली; पंख तुटल्यामुळं लोळागोळा होऊन पडलेल्या संपातीसारखी त्यांची बुद्धि खुरटून गेली. सदाशिव काशीनाथ छत्रे, हरि केशवजी, बापूशास्त्री शुक्ल, गोविंद नारायण माडगांवकर दादोबा पांडुरंग—इ. त्या काळातली महाराष्ट्रीय मंडळी काही कमी बुद्धिवान् नव्हती; पण, इंग्रजी संस्कृतीच्या आक्रमक दडपणामुळं त्यांच्या बुद्धीतलं स्वतंत्रतेचं तेज जणु लोपलं होतं ! नवल नाही, की लोकहितवादींसारख्या लोकजागृतीचं कंकण हातात बांधलेल्या विचारवंतानंही "हिंदु लोकांमध्ये मूर्खपणा वाढला, तो दूर होण्याकरिताच हे गुरु दूर देशातून इकडे ईश्वराने पाठविले आहेत....इंग्रजांनी यथान्याय वर्तणुकीने राज्य घेतले आणि ईश्वराने त्यांस हे राज्य अशा प्रकाराने दिले की, त्यांस कोणी दोष ठेवणार नाही..."[१] असे पराभूत मनोवृत्तीचे उद्गार काढावे आणि न्यायमूर्ति रानडे यांच्यासारख्या द्रष्टया महापुरुषानंही इंग्रजी राज्य हे 'ईश्वरी वरदान' असल्याचा गौरव वर्षानुवर्ष कंठरवानं करावा !

बरं, महाराष्ट्राचं क्षात्रतेज लोपलं होतं म्हणावं तर जळून गेलेल्या विशाल नगरीच्या राखेतूनही अग्नीचे लोळ मधूनच उचंबळून यावे, तसे मराठ्यांच्या

१ 'शतपत्रें' पत्र नं. ४६

क्षात्रतेजाचे उमाळे, इंग्रजांच्या राजकीय आक्रमणानंतरही, अधून मधून उफाळताना आढळतात. शिवाजीच्या साहसी वीरचरित्रापासून स्फूर्ति घेऊन महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याकरिता बंड करणाऱ्या वासुदेव बळवंत फडक्यांचं उदाहरण १८५० नंतरचं म्हणून बाजूला ठेवलं, तरी प्रतापसिंहानं केलेले स्वराज्यांच्या उठावणीचे प्रयत्न मात्र याच काळातले. मॉन्सन्‌ला मध्यहिंदुस्थानात पिछेहाट करायला लावणारा यशवंतराव होळकरांसारखा धडाडीचा सेनानी याच काळात निर्माण झाला व इंग्रजांच्या सैन्याची दमछाट करून स्टीव्हन्सन्‌ला सारी रात्र कोरेगावात कोंडून ठेवणारा बापू गोखल्यांसारखा शूर सेनापतीही याच काळातला. यशवंतराव शिर्के व रंगो बापूजी ह्यांचे स्वराज्याकरिता पार्लमेंटकडे दाद मागण्याचे प्रयत्नही याच काळातले.

(२)

कालाचं प्रतिबिंब वाङ्मयात पडत असतं, या न्यायानं अव्वल इंग्रजीतल्या मराठी वाङ्मयातही स्वत्वाच्या तेजस्वी शलाका अधून मधून चमकताना आढळतात. मोल्स्वर्थ, विल्सन्, कूपर मिचेल, स्टीव्हन्सन्, नेस्बिट प्रभृतींचं ख्रिस्ती आन्दोलन सुरू असतानाच मल्हार रामराव चिटणीस हा आपल्या बखरी 'सजवीत' होता व मराठी गद्याचा अस्सल मराठी वारसा पुढं चालवीत होता. मराठी राज्य इ. स. १८१८ मध्ये संपुष्टात आलेलं असलं तरी साताऱ्याच्या गादीत मात्र स्वतंत्रतेची धुगधुगी इ. स. १८४८ पर्यंत कायम होती. "एखाद्या तरण्या कलेक्टराप्रमाणे टेबलाशी बसून ते ऐटीने कारभार करीत" असं ज्यांचं वर्णन एल्फिन्स्टन्‌नं केलं आहे, ते प्रतापसिंहमहाराज यावेळी साताऱ्याच्या गादीवर होते. या छत्राखाली काही मराठी लेखक प्रसन्न चित्तानं लेखन करून मराठी गद्याची प्राचीन परंपरा उज्वलतेनं पुढं चालवीत होते. अशा लेखकांपैकी एक श्री. माधवराव मुनशी यांनी, इ. स. १८१८ ते १८३९ या कालावधीत, "श्रीमन्महाराज क्षत्रियकुलावतंस राजश्री छत्रपति स्वामी यांणी आज्ञा केल्यावरून", **सभारंजनी** नावाचा एक ग्रंथ लिहिला. अद्‌भुत व इतिहास यांचं या 'सभारंजनी'त पुष्कळ संमिश्रण झालेलं असलं, तरी इंग्रजी अमलात आणि इंग्रजी संस्कृतीच्या झगझगाटातही, मराठी गद्याची मराठी परंपरा टिकवून धरणारा ग्रंथ या दृष्टीनं याचं मूल्य फार मोठं आहे. **सभानीति** या नावाचा राजनीतिविषयक एक प्रबंधही श्री. मुनशी यांनी इ स. १८२७ मध्ये लिहिला आहे. या दोनही ग्रंथांत जुन्या बखरींतील राज-कारणी भाषेचं कमावलेलं स्वरूप दृष्टीला पडतं आणि मराठी गद्याच्या प्राचीन परंपरेचा स्वरूप-संबंधही अधिक टवटवीत होऊन आपल्या डोळ्यापुढं विलास करू लागतो. विद्युद्दीपांच्या लखलखाटात समयीतल्या ज्योतीकडे कुणाचं लक्ष्य जात नाही हे खरं. पण, देवघरात मात्र नंदादीपालाच स्थान असतं हेही विसरता

अनुक्रमणिका

यायचं नाही. मराठी शारदेच्या इंग्रजी मंदिरात चिटणिशी बखरींचं, हनुमंत-स्वामींच्या बखरीच्या आधुनिक परिष्करणाचं किंवा माधवराव मुनशी यांच्या ग्रंथाचंही तेच स्थान आहे.

इंग्रजी अमदानीतल्या मराठी गद्याच्या सरितेत प्राचीन परंपरेच्या वळणानं वाहत आलेला हा प्रवाह विदुस्रावी असला तरी उपेक्षणीय खचित नाही.

(३)

वरील प्रवाहाचा अपवाद सोडला तर त्यावेळच्या मराठी वाङ्मयात काय प्रत्ययास येतं ?—युद्धकारणात ज्याप्रमाणे सेनानींचं व राजकारणात ज्याप्रमाणे मुत्सद्याचं महाराष्ट्रीयत्व लोपलेलं दिसतं, तसंच वाङ्मयकारणातही प्रतिभावन्ताचं व प्रज्ञावन्तांचं स्वत्व नाहीसं झालेलं दिसतं. रामजोशी, होनाजी बाळा, प्रभाकर प्रभृति शाहीरांच्या 'मराठी काव्याची प्रभात' दर्शविणाऱ्या अस्सल मराठमोळ्या कवनांचे सूर हवेत विरले ते कायमचेच ! शाहिरी वाङ्मयाला अच्युतराव कोल्हटकरांनी 'मराठी काव्याची प्रभात' म्हटलं आहे. पण, सूर्योदय होण्यापूर्वीच हा 'प्रभातकाळ' मावळला ! कृष्णाजी शामराव, रघुनाथ यादव, कृष्णाजी विनायक इत्यादि गद्यसूरींनी मराठा छत्रपति व त्यांचे कर्तबगार पेशवे यांचे पराक्रम ज्या आत्मीयतेनं व मराठी बाण्यानं वर्णन केले होते ती आत्मीयता, वाङ्मयाचं ते मराठमोळं स्वरूप कायमचं लुप्त झालं आणि साऱ्याच मराठी वाङ्मयावर गुलामी मनोवृत्तीची अवकळा पसरली ! मराठीला जणु उज्ज्वल इतिहास नव्हताच. इंग्रजांच्या नेतृत्वाखाली शालोपयोगी व इंग्रजीच्या नेतृत्वाखाली बालोपयोगी वाङ्मय निर्माण करूनच मराठीचं संगोपन व संवर्धन केलं पाहिजे अशीच त्या काळातल्या मोठमोठ्या विद्वान पंडितांचीही भावना होती. नागपूरकर भोसल्यांचा वॉरन् हेस्टिंग्जच्या दरबारातील वकील वेणीराम पंडित यांच्या आश्रयानं राहणाऱ्या वैजनाथ पंडितानं डॉ. कॅरे याला कधी मराठी भाषेचं व्याकरण लिहिण्यात तर कधी 'सिंहासन बत्तिशी', 'पंचतंत्र', 'हितोपदेश', 'बायबल', 'संट मॅथ्यू', 'न्यू टेस्टॅमेंट' इ. ग्रंथांची भाषांतरं करण्यात मदत केली, दुसऱ्या काही पंडितांनी कोश–रचनेच्या कार्यांत मोल्स्वर्थ–कॅन्डी यांचं अनुयायित्व पत्करलं तर कुणी 'इसापनीति', 'बाळमित्र', वेताळपचविशी', अशा शालेय पुस्तकांची भाषान्तरं करण्यात व 'लघु हितोपदेश', 'नवीन लघु हितोपपेश', 'नीतिदर्पण', 'नीतिकथा', 'नीतिबोधकथा', 'बालोपदेशकथा', 'मनोबोधकथा', 'सदाचरणाच्या गोष्टी'– अशा बालोपयोगी पुस्तकांची रचना करण्यात कृतकृत्यता मानली. या विद्वान पंडितांच्या ग्रंथांत राष्ट्रीय पुनर्निर्माणाची तळमळ नव्हती, स्वभाषेच्या उज्ज्वलतेची कळकळ नव्हती किंवा स्वसंस्कृतीच्या अभिमानाची उद्दाम जाणीवही

नव्हती. रात्रीच्या काळोखात दूर कुठेतरी लुकलुकणाऱ्या पणत्यांनी त्या काळोखाची भेसूरता अधिक वाढवावी तसाच काहीसा प्रकार या काळातल्या स्वत्वशून्य व परप्रत्ययनेय वाङमयाचा होता असं म्हटल्यास त्यात यत्किंचितही अतिशयोक्ति व्हायची नाही.

असं कां व्हावं ?—या काळातल्या पंडितांजवळ बुद्धिमत्ता नव्हती असं नाही. त्यांच्यापैकी काहींची बुद्धिमत्ता तर अगदी अव्वल दर्जाची होती. त्यांची विचारशक्तीही उज्ज्वल होती. पण तरीही या पंडितांच्या बुद्धिमत्तेचं तेज व विचारशक्तीची प्रभा लुप्त झाली होती. कारण, इंग्रजी संस्कृतीनं त्यांचे डोळे दिपले होते, त्यांना दिङमोह झाला होता. इंग्रजांचं सर्वच काही चांगलं–त्यांचं राज्य चांगलं, त्यांचं शिक्षण चांगलं, त्यांचा धर्म चांगला, त्यांच्या चालीरीती चांगल्या–ही भावना त्याकाळी महाराष्ट्रीय मनोवृत्तीत दृढमूल झाली होती. इंग्रजांचं सर्वच चांगलं ठरल्यावर ओघानंच आपलं सर्व वाईट ठरावं यात नवल नाही. या स्वत्वशून्यतेच्या भावनेनं, या पराभूत मनोवृत्तीनं या काळातलं मराठी वाङमय काळवंडलेलं आहे. मराठी मनोवृत्तीवर इंग्रजी संस्कृतीचं कलम करूनच महाराष्ट्रीय पंडितांनी या काळातलं वाङमय निर्माण केलं आहे. साहित्यनिर्मितीला जी अहंवृत्ति, जो आत्मप्रत्यय अवश्य लागतो तोच या कालखंडात समूळ नष्ट झाला होता. मराठी अस्मितेचे आणि व्यक्तित्वाचे सारे आविष्कार, मराठी प्रतिभेचा आणि विचाराचा सारा फुलोरा–इंग्रजी राजवटीच्या उन्हानं करपून गेला होता . .

—अशा परतंत्र, पराभूत मनोवृत्तीतून–अशा हीनगंडातून–निर्माण झालेलं वाङमय–ते जातिवन्त कसं राहील ? या काळातलं मराठी वाङ्मय आईच्या दुधावर पोसलेलं नाही, इंग्रज दाईच्या भाडोत्री दुधावरच त्याची वाढ झाली. जॉन विल्सन् यांनी, इ. स. १८१८ या वर्षाला आधुनिक मराठीचं प्रारंभ–वर्ष मानलेलं आहे. मोल्स्वर्थ–कोशाच्या दुसऱ्या आवृत्तीला जोडलेल्या 'Notes on the Constituent Elements, the Diffusion, and the Application of the Marathi Language' या प्रास्ताविक–निबंधात डॉ. विल्सन म्हणतात, "With the establishment of the English Government in the Dakhan and Konkan, on tne fall of the Peshwah's Government in 1818, a new era in Marathi' literature Commenced."[2]

---

[2] Molesworth–Dictionary: Second Edition (1857), P. xxix

पण, विल्सन्‌साहेबांचं हे निदान सपशेल चुकलं आहे. इ. स. १८१८ हे आधुनिक मराठीचं प्रारंभ–वर्ष नाही; ते प्राचीन मराठीचं शेवटलं वर्ष आहे. त्यावर्षी मराठी वाङ्मयाचं जुनं, ऐश्वर्यशाली युग अस्ताला गेलं. मराठा वीरांच्या वारुबरोबरच मराठी वाङ्मयाचाही पराक्रम त्या दिवशी संपला, मराठ्यांच्या युयुत्सु वृत्तीबरोबरच मराठी वाङ्मयातले नवनवीन उन्मेषही त्या दिवशी निमाले, मराठ्यांच्या राज्यलक्ष्मीबरोबरच मराठी वाङ्मयातली प्रफुल्ल रमणीयताही त्या दिवशी लयाला गेली–मराठी वाङ्मयाच्या प्रांतात नवीन युग सुरू झालं ते इ. स. १८१८ साली नव्हे, तर इ. स. १८७४ साली–विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेच्या रूपानं !

(४)

आधुनिक मराठीत ग्रंथरचनेला प्रारंभ करण्याचा मान युरोप व अमेरिकेतील ख्रिस्ती मिशन-यांनाच दिला पाहिजे. अर्वाचीन महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक व वाङ्मयीन इतिहासात मिशनऱ्यांच्या चळवळीचं स्थान अत्यंत महत्त्वाचं आहे. एतद्देशीयांत आपल्या धर्माचा प्रसार सुलभतेनं करता यावा म्हणून या धर्मोपदेशकांनी खेड्यापाड्यांतून शाळा काढल्या, चौकाचौकात उभं राहून व्याख्यानं दिली, देशी भाषांचा अभ्यास केला व एतद्देशीयांच्या मातृभाषांतून–कधी स्वतंत्रपणे तर कधी तत्कालीन शास्त्रीपंडितांना हाताशी धरून, कधी शास्त्रीपंडितांनी निर्माण केलेल्या वाङ्मयावर स्वतःचं नाव घालून तर कधी शास्त्रीपंडितांच्या नावावर प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांचं कर्तृत्व स्वतःकडे घेऊन–ग्रंथरचनाही केली. आधुनिक मराठीतलं प्रारंभीचं वाङ्मय या मिशनऱ्यांनीच निर्माण केलं आहे. अर्वाचीन मराठीवरचं त्यांचं हे ऋण मान्य केलंच पाहिजे. पण याचा अर्थ, मिशनऱ्यांनी केलेली ही मराठीची सेवा मराठी भाषेवरच्या किंवा मराठी लोकांवरच्या प्रेमानं किंवा जिव्हाळ्यानं केली, असा मुळीच नाही. एतद्देशीयांत स्वधर्मप्रचार करण्याचं एक सुलभ साधन म्हणूनच केवळ ते मराठी भाषा शिकले व त्यांनी मराठीत ग्रंथरचनाही केली. अर्थात, "It (Marathi Literature) numbers among its producers not only the natives of the Maratha country, but its devoted friends from distant lands, with whom **in fact it originated**"[3] हे विल्सन्‌काकाचं विधान तारतम्यानंच स्वीकारलं पाहिजे.

---

[3] Molesworth–Dictionary: Second Edition (1857), P. xxix

डॉ. कॅरे यांनी वैजनाथ पंडिताच्या* साह्यानं लिहिलेली व श्रीरामपूर-मिशननं प्रसिद्ध केलेली पुस्तकं महाराष्ट्राच्या बाहेरची म्हणून सोडून दिली, तर होरॅशिओ मार्डवेल या (?) अमेरिकन मिशनऱ्यानं इ.स. १८१७ साली मुंबईला प्रसिद्ध केलेलं 'मात्थीउक्त शुभ वर्तमान' हेच मुंबई इथं मुद्रित झालेलं बहुधा पहिलं मराठी पुस्तक असावं. इ. स. १८१८ ते १८२८ या दहा वर्षांत रे. गार्डन हॉल, सॅम्युएल न्यूवेल, होरॅशिओ बार्डवेल, जॉन निकोल्स या अमेरिकन आणि जेम्स मिचेल, डॉ. स्टीव्हन्सन्, रे. मिचेल या स्कॉटिश मिशनऱ्यांनी प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांनीच आधुनिक मराठीची प्रारंभिक पायाभरणी केली, असं म्हटलं पाहिजे. या मिशनऱ्यांनी छापलेल्या पुस्तकांत 'शुभवर्तमान' [इ. स. १८१७, १८१८], 'प्रश्नोत्तरावळी' [१८१९], 'यिशु ख्रिस्त याचे अवतारकृत्याची बखर' ['History of Our Lord', १८२०], 'अन्य देवांची परीक्षा' 'Trial of False Gods', १८२०], 'देवाच्या दहा आज्ञा' [१८२५], 'Parables of our Lord']१८२०], 'Miracles of our Lord' [१८२०], Gospel of Mathew [१८२५] इ. ख्रिस्ती धर्मविषयक

---

* 'वैजनाथ पंडित', 'वैजनाथ शर्मा' व 'विद्यानाथ पंडित' हे एकच की निरनिराळे? श्रीरामपूर-मिशननं इ. स. १८१४ मध्ये प्रसिद्ध केलेल्या 'सिंहासन-बत्तिशी'च्या मुखपृष्ठावर "सिंहासनबत्तिशी-महाराष्ट्र भाषेत संग्रह-वैजनाथ शर्मा क्रीयते। श्रीरामपुरीं छापा झाली" असे मोडीत छापले असून, इ. स. १८१५ मध्ये प्रसिद्ध केलेल्या 'हितोपदेशा'च्या मुखपृष्ठावर—

महाराष्ट्री भाषेंत् तर्जमा वैजनाथ पंडिताने केला.

श्रीरामपुरीं छापा झाली ॥१८१५॥

असा उल्लेख आहे. इ. स. १८०५ साली डॉ. कॅरे यांचं 'A Grammar of the Mahratta Language, to which are added Dialogues on Familiar Subjects' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्यासंबंधी "A Grammar of the Mahratta Lanjuage by **Vydyunath,** Mahratta **Pundit,** in conjunction with Mr. William Carey, teacher of the Sanscrit and Bengalee languanges" असा उल्लेख फोर्ट विल्यम् कॉलेजच्या दि. २० सप्टेंबर १८०४ च्या वृत्तान्तात आढळतो. इ.स. १८१० मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'A Dictionary of the Mahratta Language' या ग्रंथातही, हा शब्दकोश तयार करतांना आपल्याला विद्यानाथ या प्रमुख पंडिताची मदत झाल्याचा उल्लेख कॅरेनं केला आहे. या सर्व उल्लेखांवरून, ही निरनिराळी नावे एकाच पंडिताची आहेत की ते वेगवेगळे होते याचा निश्चित निर्णय लागत नाही. तर्काने मात्र, ही नावे एकाच पंडिताची असावीत व उच्चारातील फरकांमुळे कधी 'वैजनाथ' तर कधी 'विद्यानाथ' असे नामान्तर झाले असावे, असे वाटते. 'शर्मा' हा शब्द 'पंडित' या अर्थी वापरण्यात आला असावा.

व येशू ख्रिस्तविषयक पुस्तकांचाच भरणा होता हे पाहिलं म्हणजे मिशनऱ्यांनी मराठीची सेवा कोणत्या उद्देशानं केली, याविषयी संशयाला जागा राहत नाही. वर उल्लेखिलेल्या मिशनऱ्यांप्रमाणेच स्टीव्हन्सन्, बॅलेन्टाईन, बर्जेस प्रभृति धर्मोपदेशकांनी व जर्व्हिस, मॅकलेनन, ड्रमंड, ह्चिन्सन, केनेडी, मोल्स्वर्थ, कँडी प्रभृति इंग्रज अधिकाऱ्यांनी गणित, बीजगणित, भूमिति, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, कोश, व्याकरण इत्यादि विषयावर ग्रंथरचना करून आधुनिक मराठी वाङ्मयाच्या पायाभरणीचं किचकट व शास्त्रीय कार्य जे इतक्या ईर्ष्येनं व आस्थेनं वर्षानुवर्षं केलं त्याच्या मुळाशी 'शुभवर्तमानाच्या प्रसाराला हातभार लावण्याची जबरदस्त लालसा' हीच प्रेरणा प्रमुख आणि प्रभावी होती. खुद्द मोल्सवर्थ यांनी सहा वर्षं अविश्रांत परिश्रम करून आणि अनेक अडचणीवर व संकटावर मात करून जो शब्दकोश तयार केला व रॉबर्ट कॉटन् मनी, डॉ. विल्सन्, रे. स्टीव्हन्सन्, स्कॉट प्रभृति प्राच्य विद्यापंडितांनी ज्याचा मुक्तकंठानं गौरव केला त्या शब्दकोशालाही, त्याची धर्मप्रसाराची लालसाच कारणीभूत होती हे त्यानं काढलेल्या "It was undertaken, not from a thirst after honour or emolument, but from a humble desire of promoting the propagation of the Glorious Gospel"[५] या उद्गारावरून स्पष्ट होतं.

(५)

मुंबईचा पहिला गव्हर्नर एल्फिन्स्टन यानंहि प्रथम मिशनऱ्यांच्या मदतीनं शिक्षणप्रसाराचा उपक्रम करण्याचा प्रयत्न केला व १८२० साली त्यानं 'दि बॉम्बे एज्युकेशन सोसायटी'च्या विद्यमाने 'दि नेटिव्ह स्कूल अँड स्कूल बुक कमिटी' स्थापन केली. तसं पाहिलं तर 'दि बॉम्बे एज्युकेशन सोसायटी' ही शाखा ज्या मूळ संस्थेपासून निघाली, ती 'The Society for Promoting the Education of the Poor within the Government of Bombay' या नावाची संस्था आर्चबिशप बार्नेस यानं केवळ धार्मिक हेतूनंच इ. स. १८१५ साली मुंबईला स्थापन केली होती. एल्फिन्स्टन्नंहि तोच धागा उचलला व त्यानंही मिशनऱ्यांच्या मदतीनंच सुरुवातीला तरी, विद्याप्रसाराच्या कार्याला प्रारंभ केला. पण, मिशनऱ्यांच्या मदतीनं आरंभिलेल्या या शिक्षण-कार्यात मिशनऱ्यांनी धर्मप्रसाराची लालसा आड येते व तिचा एतद्देशीयांच्या

[५] G. T. Molesworth: A Dictionary Marathi & English: 1st Edition (1831), Preface, P. xviii.

शिक्षणावर प्रतिकूल परिणाम होतो हे लक्ष्यात येताच एल्फिन्स्टननं मुंबईतील एतद्देशीय थोर नागरिकांच्या सल्ल्यानं २१ ऑगस्ट १८२२ रोजी[६] 'दि बॉम्बे नेटिव्ह स्कूल बुक अँड स्कूल सोसायटी' [मुंबईची हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी] या स्वतंत्र संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. या सोसायटीचे मुख्य युरोपियन सेक्रेटरी कॅप्टन जॉर्ज जव्हिस आणि सहाय्यक नेटिव्ह सेक्रेटरी व्यंकोबा सदाशिव नाईक हे होते. सदाशिव काशीनाथ छत्रे हे 'हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी'चे पहिले नेटिव्ह सेक्रेटरी होते असं मानण्यात येतं, पण, 'मंडळी'च्या तत्कालीन कागदपत्रांवरून,[7] व्यंकोबा सदाशिव नाईक (Venckoba Sadasheo Naik) हेच या संस्थेचे पहिले नेटिव्ह सेक्रेटरी होते हे स्पष्ट दिसतं. 'दि बॉम्बे नेटिव्ह स्कूल बुक अँड स्कूल सोसायटी' या संस्थेची नामान्तरं व रूपान्तरं होत होत इ.स. १८४२ मध्ये 'बोर्ड ऑफ एज्युकेशन'ची स्थापना झाली...'हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी'ची होत गेलेली नामान्तरं व रूपान्तरं ही मुंबई प्रांतातील शिक्षणपद्धतीची प्रगति आणि परिणती यांच्याप्रमाणंच तत्कालीन मराठी वाङमयातले प्रवाह आणि परिवर्तनं यांचीही निदर्शक आहेत.

'हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी'नं एतद्देशीयांच्या शिक्षणाकरिता देशी भाषेत पाठ्यपुस्तकं व मुलांना उपयुक्त होतील अशी भाषान्तरात्मक पुस्तकं तयार करण्यासाठी एक 'प्रसिद्धिपत्रक' जाहीर केलं आणि अशा पुस्तकांना सरकारी आश्रयाचं व पुस्तककर्त्यांना बक्षिसाचं आमिषही दाखविलं. लगेच कोश, व्याकरणं आणि पाठ्यपुस्तकं निर्माण करावयाच्या 'कारखान्याला' धडाक्यानं सुरवात झाली. त्याबरोबरच एतद्देशीय विद्वानांनी, 'प्रसिद्धिपत्रकात'ली सूत्रं डोळ्यापुढं ठेवून, भाषान्तरात्मक व नवीन नवीन भौतिक विद्यावर लहानमोठे बालबोध ग्रंथ लिहिण्याचा सपाटाही मोठ्या ईर्ष्येनं सुरू केला.

इ. स. १८२० साली 'बॉम्बे एज्युकेशन सोसायटी' अस्तित्वात आल्यापासून तो १८४० साली 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' स्थापन होईपर्यंत जो वीस वर्षांचा कालखंड होऊन गेला, त्यात जर्व्हिस, मोल्स्वर्थ, कँडीबंधू, केनेडी, मेनवॉरिंग, मॅक्लेनन प्रभृति पाश्चात्य व रामचंद्रशास्त्री जन्हवेकर, जगन्नाथशास्त्री क्रमवंत, बाळशास्त्री घगवे, सदाशिव काशिनाथ छत्रे, गंगाधरशास्त्री फडके, हरि केशवजी, बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, विष्णुशास्त्री बापट, नाना

---

६ दादोबा हे वर्ष १८२३ असं देतात. [पहाः दादोकृत, 'महाराष्ट्र भाषेचे व्याकरण' (आ. ३ री, १८५७) पृ. ९]

7 The first Report of the Bombay Native School book and School Society, 1824, P. 5

नारायण प्रभृति महाराष्ट्रीय लेखकांनी सर्व प्रकारचं शालोपयोगी वाङ्मय निर्माण करून महाराष्ट्रातील शिक्षण पद्धतीचा व बालोपयोगी वाङ्मय निर्माण करून महाराष्ट्रातील तत्कालीन बालकांच्या मनोविकासाचा व विचार पद्धतीचाही पाया घातला. "शालोपयोगी व बालोपयोगी वाङ्मयाचा कालखंड" असंच याचं वर्णन केलं पाहिजे. शालोपयोगी व बालोपयोगी वाङ्मय निर्माण करण्याच्या या कार्यात अनेक एतद्देशीय पंडितांनी अहमहमिकेनं भाग घेतलेला असला तरी बापू छत्रे, हरि केशवजी, बाळशास्त्री जांभेकर आणि दादोबा पांडुरंग हेच या कालावधीतील चार अग्रगण्य लेखक म्हणता येतील.

बर्विवनच्या Children's friend या ग्रंथाचं 'बाळमित्र' हे मराठी रूपान्तर करणारे सदाशिव काशिनाथ उर्फ बापू छत्रे यांना आधुनिक मराठी गद्याचे जनक मानलं पाहिजे Aesop's fables या पुस्तकाचंही 'इसपनीतिकथा' या नावाचं भाषान्तर, छत्रे यांनी केलं आहे. पण टॉमस वेस्ट जर्व्हिस हा दि. ३ फेब्रुवारी १८४७ रोजी लिहिलेल्या एका पत्रात म्हणतो— "In regard to Aesop's fables, translated by the lamented and estimable **Venkoba Sadasiva Naik,** there is great room for improvement..."[9] जर्व्हिसच्या या उद्गारांवरून, 'इसापनीतिकथा' हे भाषान्तरात्मक पुस्तक व्यंकोबा सदाशिव नाइक यांनी भाषान्तरिलेल्या 'इसपनीतिकथे'चं जे काम व्यंकोबांच्या अकालमृत्यूमुळं अपुरं राहिलं होतं ते, सेक्रेटरी म्हणून त्यांच्या जागी आलेल्या सदाशिव काशीनाथ छत्रे यांनी पुरं केलं की काय अशी शंका मनात येते.[१०] "महाराष्ट्र भाषेंत शुद्ध रीतीनें वाक्ययोजना करून रसभरित असे पहिले ग्रंथ सदाशिव काशीनाथ छत्र्ये यांनी रचिले: ह्मणोन त्यांस गद्यात्मक ग्रंथांचे जनक ह्मटल्यासहि साजेल" असं दादोबा आपल्या 'महाराष्ट्र भाषेच्या व्याकरणा'त[११] लिहितात. छत्रे यांच्या पुस्तकांविषयी दादोबांनी आपल्या 'आत्मचरित्रा'तही "हे दोन्ही ग्रंथ फार सुरस झाले होते. तीं भाषांतरें असें त्या वेळेस कोणास वाटत नसे. मराठींत सरस रीतीने फकीकेंत लिहिणारे हेच पहिले. त्यांच्या मागून आम्हीं सर्व लिहिणारे झालों""[१२] असे गौरवोद्गार काढले आहेत. बापू छत्र्ये यांची कोंकणीच्या धर्तीवर असलेली या पुस्तकातली भाषा चमत्कारिक वाटते व 'अगो, अगोतल्या, ओंड,

---

9 W. P. Jervis; Thomas Best Jervis, A Centenary Tribute, 1898, P. 193.

१० डॉ. कृ. भि. कुळकर्णी 'आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांति', पृ. २५ पहा.

११ तिसरी आवृत्ति (इ. स. १८५७), 'प्रस्तावना', पृ. ९

१२ दादोबांचे 'आत्मचरित्र' [संपा.—अ. का. प्रियोळकर], पृ. ६०

मातक्यान्' वगैरे त्यातले शब्दही आजच्या शिष्ट मराठीत आढळत नाहीत; तरीही 'दिव्याउजेडी, जेवणघर, नेसूपंचा, पाखरेविक्या' इ. जोड-शब्द सुटसुटीत, गोड व अर्थगर्भ वाटतात. इंग्रजी भाषा व विचारसरणी आत्मसात करून तिला मराठी लेणं बेमालूमपणानं चढविणारे बापू छत्रे हेच आधुनिक मराठीतले पहिले लेखक होत.

याच सुमारास हरी केशवजी यांनी मिसेस मार्सेटच्या Conversations of Natural Philosophy' या ग्रंथाचं 'सिद्धपदार्थविज्ञानशास्त्र-विषयक संवाद' हे व Conversations on Chemistry या ग्रंथाचं 'रसायन-शास्त्र-विषयक संवाद' या नावाचं भाषान्तर केलं होतं. "हे दोन ग्रंथ हरि केशवजीच्या हातून फार सरस झाले" या शब्दात[13] दादोबांनी हरिजींच्या या ग्रंथांचा गौरव केला आहे. 'चेंबर्सकृत शालोपयोगी नीतिग्रंथ' [Chamber's Moral Class-book] हा हरी केशवजींचा ग्रंथ त्याकाळी फार लोकप्रिय होता. इ. स. १८४६ च्या शिळाप्रेसवरील 'नीतिग्रंथा'त जी लेखनपद्धति आहे, तिचे पुढील विशेष दिसतात—(१) तृतीयेच्या (ने, नी) विभक्तिप्रत्ययांवर अनुस्वार नाही. (२) दीर्घ-ऊ-'उ' वर रफार देऊन (=उँ) काढतात. (३) उकार (ु) अक्षराच्या थेट खाली न देता अक्षराच्या पुढे खालच्या बाजूला दिलेला आढळतो. ['सु' असा न काढता 'स ु' असा काढलेला आहे.] (४) ओळीच्या शेवटी शब्द अपुरा राहिल्यास रेघ (-) आढळत नाही.

'यात्रिक क्रमण' [Pilgrim's Progress] हा हरी केशवजींचा प्रसिद्ध असलेला आणखी एक भाषान्तरात्मक ग्रंथ. 'Pilgrim's Progress' हा ग्रंथ बनयननं मूळातच अत्यंत रसाळपणानं व भाविकपणानं लिहिला आहे. हरी केशवजी यांनीही खिस्ताळलेल्या मनानं व समरसतेच्या भावनेनं या रूपका-त्मक व आध्यात्मिक ग्रंथाचं मराठी रूपान्तर केलं. . .'देशव्यवहार व्यवस्था' या नावाचा मराठीतला पहिला अर्थशास्त्रविषयक ग्रंथही हरिजींनीच लिहिला आहे. हरी केशवजी यांनी स्वतंत्र ग्रंथ लिहिले नाहीत हे खरं; पण भौतिक शास्त्राचंही विवेचन मराठीत सुबोध रीतीनं करण्याचा पायंडा, शास्त्रीय परिभाषेचा मागमूसही नसलेल्या इंग्रजी अमदानीच्या पहिल्या प्रहरात त्यांनी पाडला व कोणतीही साधनं नसताना त्यांनी जी शास्त्रीय परिभाषा पहिल्यान्दा तयार केली, तिचं मूल्य मराठीतील शास्त्रीय वाङ्मयाच्या दृष्टीनं फार मोठं आहे. पदार्थविज्ञान, रसायन-शास्त्र व अर्थशास्त्र या भौतिक शास्त्रांवर ग्रंथरचना करणारे हरी केशवजी हेच मराठीतील पहिले ग्रंथकार होत.

---

१३ दादोबांचे 'आत्मचरित्र', पृ. ५७

* * *

इ. स. १८२० ते १८४० या कालखंडात निर्माण झालेल्या मराठी वाङमयातील सर्वात महत्त्वाचा ग्रंथ जर कोणता असेल, तर तो 'महाराष्ट्र भाषेचा कोश' हा होय. मुंबईला शिक्षा-मंडळीची स्थापना झाल्यानंतर तिनं लवकरच कोश-रचनेचं काम हाती घेतलं व जगन्नाथशास्त्री क्रमवंत, बाळशास्त्री घगवे, गंगाधर-शास्त्री फडके, रामचंद्रशास्त्री जन्हवेकर, सखारामशास्त्री जोशी, दाजीशास्त्री शुक्ल व परशुरामपंत गोडबोले या पंडितांची यासाठी नियुक्ति करण्यात आली. कोशाच्या प्रस्तावनेत 'शिक्षामंडळीचे आज्ञांकित पंडित' म्हणून फक्त पाचच पंडितांचा निर्देश आढळतो. पण, कोशाच्या इंग्रजी आणि मराठी अशा दोनही मुख-पृष्ठांवर जगन्नाथशास्त्री क्रमवंत यांचे नांव पहिले दिलेले असून, रामचंद्रशास्त्री जन्हवेकर यांचे नाव चवथे दिलेले आहे. त्यावरून, कोशरचनेच्या कार्यात, इतर पांच पंडितांप्रमाणेच, या दोघा पंडितांनीही भाग घेतला होता हे उघड आहे. मग त्यांचा निर्देश प्रस्तावनेत कां करण्यात आला नाही, कुणास ठाऊक !

या पंडितांनी मोठ्या परिश्रमानं तयार केलेला हा कोश दोन भागांत इ. स. १८२९ साली प्रसिद्ध झाला आणि १८३१ मध्ये या कोशाची 'पुरवणी' बाहेर पडली. या कोशाच्या प्रस्तावनेत मराठी भाषेची व्याख्या, 'कोश' या शब्दाचा अर्थ, मराठी भाषेच्या कोशाची आवश्यकता, कोशात उपयोगिलेल्या शब्दांची व्याप्ति इ. मुद्यांची चर्चा पंडित मंडळानं मोठ्या आस्थेनं व आत्मीयतेनं केलेली आढळते. "हें मोठें अद्भुत कृत्य मराठी भाषेंत त्या वेळेस झालें"[१४] अशा शब्दात दादोबांनी आपल्या आत्मचरित्रात या कोशाचा गौरव केलेला आहे.

या कोशात शब्दांचे अर्थ व्याख्यारूपानं व पंडिती भाषेत दिलेले असल्या-मुळे मूळ शब्दांपेक्षाही ते कठीण झाले आहेत. पुढील दोन उदाहरणावरून हे सहज लक्षात येईल—

(१) संगतीं– एकाकी नुसता अशारूपें करून क्रियेचा ठायीं जो अन्वितपणा होत असतो तो न व्हावयास कारणीभूत जें कोणेकाचें सहितत्त्व त्यातें आश्रयून.

(२) सहन– प्रतिकूलत्वें करून संबद्ध होणार जो दुःख, संकट, शीत, उष्ण, अन्यकृत अपराध, भार इ. कांही एक अर्थ त्यांचे संबंधाने होणारी जी क्षोभभंगादि विक्रिया तिला आत्मप्रभावाने न होऊं देतां किं. झाली असतां न गणितां त्या अर्थाचें जे आत्मसंबंधांत धारण ते.

---

१४ दादोबांचे 'आत्मचरित्र', पृ. ५४

या कोशाची रचना करताना पंडितमंडळानं गोदावरीच्या उत्तरेकडील नर्मदेपर्यंतचा पूर्व महाराष्ट्र अजिबात लक्षात घेतला नव्हता हे पाहिलं, तर 'महाराष्ट्र भाषेच्या' दृष्टीनं त्याचं कार्य किती संकुचित होतं हे ध्यानात येतं. पण, पंडितमंडळानं केलेली महाराष्ट्रदेशाची व्याख्या व त्यानं कोशात उपयोगिलेल्या शब्दांची व्याप्ति कितीहि मर्यादित असली, तरी मराठी शब्दांच्या शास्त्रीय अर्थनिर्णयाला प्रारंभ करण्याचं प्रज्ञा–प्रधान कार्य महाराष्ट्रभाषेच्या या कोशानंच केलं, यात शंका नाही. आधुनिक मराठीचा जन्म जरी मुंबईला झाला, तरी तिला 'पुणेरी वळण' लावण्याचं कार्यही 'पंडित'मंडळाच्या या कोशानंच केलं, असं म्हटलं पाहिजे.

'महाराष्ट्र भाषेच्या कोशा'ची 'पुरवणी' ज्या वर्षी बाहेर पडली त्याच वर्षी, म्हणजे इ. स. १८३१ साली, मोल्स्वर्थ–कँडी यांचा सुप्रसिद्ध मराठी–इंग्रजी कोश प्रसिद्ध झाला. 'महाराष्ट्रभाषेचा कोश' पंडितमंडळाच्या नावावर प्रसिद्ध झालेला असला, तरी त्याचं कर्तृत्व आपलंच आहे असं मोल्स्वर्थनं तत्कालीन गव्हर्नर क्लेअर याला ३१ मे १८३१ रोजी एक पत्र लिहून कळविलं आहे[१५] 'महाराष्ट्र भाषेचा कोश' पंडितमंडळाच्या नावावर चुकीनं प्रसिद्ध झाला असं मोल्स्वर्थ म्हणतो. "This Kosh (Marathi dictionary in the Marathi language) was compiled, from the first word to the last, in our own house, under the never-intermitted direction and management of our own selves, and by three Pandits"[१६] या त्याच्या उद्‌गारातही हाच अभिप्राय आहे. पण, "मागल्या ग्रंथकाराचे नाव व त्याची कृति यास बहुतकरून बुडविण्याच्या बुद्धीस इतक्यातच आरंभ झाला. तसेच Captain Molesworth आणि Lieut. Thomas Candy यांच्या हाताखाली पंडित होते त्यानी दोन मोठ्या पुस्तकांत मराठी कोश तयार केला. आणि तो सुंदर शिळाछापावर छापिला. त्यावरून त्या साहेबांनी इंग्लिशांत मराठी कोश तयार केला तो प्रसिद्ध आहेच; परंतु पंडितांचा कोश कोठे दिसेनासा झाला." हे दादोबांचं विधान[१७] लक्षात घेतलं, तर मोल्स्वर्थच्या दाव्यात विशेष अर्थ उरत नाही.

---

[१५] G. D. Vol. 237, 1831, pp. 55-56.

[१६] J. T. Molesworth: 'Dictionary Marathi & English': Second Ed. (1857) 'Preface', P. xxi. तळटीप.

[१७] दादोबांचे 'आत्मचरित्र', पृ. ५३–५४.

हस्तलिखितांच्या शोधार्थ

प्रा. के. रा. जोशी

श्री नीलकंठ दीक्षित दक्षिण भारतात ज्या स्थळी राहिले तेथे श्री नीलकंठ दीक्षिताविषयी अधिक माहिती मिळेल अशी आशा होती. संस्कृत साहित्या-विषयी मॅक्डोनल, कीथ, डे, कृष्णम्माचारियर् प्रभृतींनी अनेक इतिहास ग्रंथ लिहिले आहेत. त्यापैकी मॅक्डोनल, कीथ आदींच्या ग्रंथात तर त्यांच्याविषयी विशेष उल्लेख नाहीत. परंतु, अत्याधुनिक श्री. डे, कृष्णम्माचारियर्, श्रीबलदेव उपाध्याय, पांडे प्रभृतींच्याहि ग्रंथातील माहिती फारच त्रोटक आढळून आली. यास्तव दक्षिणेत जाऊन शोध करावा ही इच्छा होती. विद्यापीठ–अनुदान–आयोगाच्या योजनेमुळे १९६४ च्या उन्हाळ्याच्या सुटीत हा योग जुळून आला हे कृतज्ञतेने नमूद करणे आवश्यक आहे. विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनी प्रवास-खर्चाची मागणी मान्य झाल्याचे कळविताच सिद्धता केली व २६ एप्रिल १९६४ला नागपूर सोडले. तिरुपतीच्या श्रीवेंकटेश युनिव्हर्सिटीचे नांव कानावर होते. तेथील केंद्रीय संस्कृत सस्था व विश्वविद्यालयाचे ग्रंथालय बघावे असा हेतु धरून प्रारंभी तिरुपतीला गेलो. श्रीवेंकटेश आमचे कुलदैवत. त्यांचे दर्शन घेऊन कामास सुरूवात केली. गिरीवरून खाली उतरताच आता विद्यापीठात जावे व तेथे शोध करावा असा विचार केला. पूर्वी नागपूरचे डॉ. बारलिंगे तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून येथे असत. त्यांचा पत्ता मिळाल्यास इतर काम सुकर होईल असे वाटले. पोषाखामुळे कार्यालयात प्रवेश मिळाला. परंतु तेथील सर्व कार-कून विश्वविद्यालयाविषयी अनभिज्ञ दिसले. त्यातल्या त्यात एक गृहस्थ–बहुधा मुख्य कारकून असावे–त्यांना तेथून फोनने चौकशी नाही का करता येणार असे विचारले. त्यांना माझे म्हणणे पटले. फोनवरून चौकशी करता डॉ. बारलिंगे ते स्थळ सोडून दिल्ली विद्यापीठात गेल्याचे, व संस्कृत विभागाचे प्रमुख डॉ. कृष्ण शर्मा हे विद्यापीठात उपस्थित असल्याचे कळाले. त्या गृहस्थाचे आभार मानून निघालो. दुपारी चारचा सुमार असेल. उन्ह रखरखीत होते. इतक्यात एक रिक्शावाला गाठला. विद्यापीठाच्या क्षेत्रात जाऊन शोध केला. विद्यापीठाची इमारत प्रेक्षणीय होती. बऱ्याच इमारतीचे बांधकाम चालू होते. चौकशी करता समजले की डॉ. शर्मा हे नुकतेच घरी गेले. डॉ. शर्मा

विद्यापीठाच्या क्षेत्रातील प्राध्यापक-निवासात राहत असत. तिथून अंतर अर्धा मैल होते. पुन्हा रिक्शा करून त्यांच्या निवासात गेलो. पण ते घरी नव्हते. घरात त्यांची पत्नी, मुले, व एक पाहुणा भाचा अशी मंडळी होती. आरंभी त्यांनी डॉक्टर शर्मा घरी नाहीत म्हणून निरोप दिला. पण त्या मुलाला काय वाटले न कळे, 'बहुधा, डॉक्टर अर्ध्या तासात येतील. आपण थांबू शकता' असे तो म्हणाला. मीहि संधीचा लाभ घेऊन थांबावयाचे ठरविले. हा तरूण यंदाच्या वर्षी केरळमधून मॅट्रिकला बसला होता. उन्हाळयाच्या सुटीत मामाकडे त्याचा मुक्काम होता. संस्कृत त्याची कुलविद्या. हिंदीचे शिक्षण झाले होते. दोन्ही भाषा थोडया फार बोलायचा. इंग्रजी छान बोलत असे. मनाने व तोंडाने सारखाच मोकळा असलेला, नम्र व आतिथ्यकुशल असा तो तरुण मुलगा स्वतःच्या वर्तनाने, सुसंस्कृत घरातून राहिला असल्याचे सूचित करीत होता. वेदाभ्यास त्याचा झाला होता. तैत्तिरीयोपनिषद् त्याला मुखोद्गत होते. त्याच्याशी बोलत वाट बघत होतो. अर्धा तास संपला, एक तास झाला, दोन झाले पण डॉक्टर आलेच नाहीत. शेवटी भेटीचा योग नाही असे वाटून पत्र लिहिले. जवळच एक हिंदीचे प्राध्यापक राहत होते. त्यांना भेटून परत जाताना एकवार डॉ. शर्माकडे डोकवावे असा विचार केला. पाहतो तो डॉक्टर नुकतेच येऊन आराम खुर्चीत बसले होते. आत गेलो. स्वतःची माहिती सांगितली. व श्री नीलकंठ दीक्षिताविषयी विद्यापीठाच्या ग्रंथालयात कांही पुस्तके आहेत किंवा काय याची चौकशी केली. डॉ. शर्मा हस्तलिखित विभागाचे सुद्धा प्रमुख होते. त्यांच्या माहितीत तशी पुस्तके नव्हती. पुन्हा प्रत्यक्ष पाहून कळवीन असे त्यांनी आश्वासन दिले. पलीकडच्या कामाविषयी बोलणे चालले असताना मद्रासला डॉ. राघवन् यांची भेट घेण्याचा विचार मी त्यांना सांगितला. डॉ. राघवन् अमेरिकेत गेल्याचे मला प्रथम त्यांच्याकडून कळाले. त्यामुळे मद्रासमधले एक माहिती केंद्रच मला सापडणार नव्हते. पुढे काय करावे हे सुचेना. तेव्हा डॉ. शर्मा यांनी मद्रासच्या विद्यापीठातील रीडर डॉ. कुंजिनी राजा यांची माहिती व पत्ता सांगितला. ते डॉ. शर्माचे मित्र. दोघेहि केरळमधून आलेले. Contribution of Keral to Sanskrit Litrature हा एक जाडा ग्रंथ त्यांनी लिहिला आहे. त्यामुळे ते मार्गदर्शन करू शकतील असे डॉ. शर्मांचे म्हणणे होते. त्यांचा निरोप घेतला. रात्र झाली होती. एकहि वाहन उपलब्ध नव्हते. हा भाग शहराबाहेर असल्यामुळे आता मैल दीड मैल अंतर पायीच जायची पाळी आली. शेवटी तेवढे अंतर चालून गेलो. ८। चा सुमार होता. तिरुपतीच्या गोविंदराजाचे फार प्रचंड मंदिर येथे आहे. शहरात येताच रिक्शा सापडला. त्यातून मंदिरात गेलो व दर्शन घेतले

अनुक्रमणिका

बस स्टँडवर परत आलो. सामान काढले. मोटारने रेनिगुंठा स्टेशनवर गेलो. द्रासाठी रात्री ३ ला गाडी मिळाली. सकाळी ७।। चे सुमारास मद्रास–सेंट्रल स्टेशनवर उतरलो. जवळच एका धर्मशाळेत सामान ठेवले व स्नान करून १०।। वाजता मद्रास विश्वविद्यालयातील संस्कृत विभागात पोहोचलो.

मद्रास मधील ग्रंथालये

तो दिवस ३० एप्रिल म्हणजे ६३–६४ च्या शैक्षणिक सत्राचा अंतिम दिवस होता. अकराच्या सुमारास विश्वविद्यालयाचे कांही संशोधन करणारे विद्यार्थी आले. त्यात पुरुष विद्यार्थी एक व दोन मुली होत्या. हे तिघेहि संस्कृत विभागात आपापल्या विषयावर पूर्ण वेळ संशोधन करणारे विद्यार्थी फेलो होते. त्यांना विश्वविद्यालयाकडून विद्यावेतन मिळत असे. इतक्यात त्यांचे एक प्राध्यापक श्री. सुंदरम् आले. त्यांच्याशी मी ओळख करून घेतली. थोड्या वेळानंतर डॉ. कुंजिनी राजा हे आले. संशोधन विभागातल्या विद्यार्थ्यांनी त्यांची ओळख करून दिली. विद्यापीठात प्रत्येक प्राध्यापकाला स्वतंत्र खोली दिली आहे. डॉ. कुंजिनी राजा हे सुमारे ४५ वयाचे गंभीर प्रवृत्तीचे गृहस्थ वाटले. त्यांनी मोठ्या आस्थेने विचार-पूस केली. त्यांच्या स्वतःच्या प्रबंधातून अनेक नीलकंठांचा उल्लेख होता. पण प्रस्तुत नीलकंठा विषयी विशेष उल्लेख आढळला नाही. श्री. कृष्णम्मा चारियर यांनी लिहिलेला History of Sanskrit Literature हा ग्रंथ तेथे मिळाला. त्यात कांही माहिती सापडली. शेजारच्या खोलीत संस्कृत विभागातील दुसरे रीडर डॉ. सुब्रह्मण्यम् होते. त्यांची ओळख डॉ. कुंजिनी राजा यांनी करून दिली. त्यांच्याशीहि बोलणे झाले. दोघांच्याहि बोलण्यात श्री. पी. एस्. शास्त्री व श्री. य. महालिंग शास्त्री या गृहस्थांचा उल्लेख आला. कारण, या दोघांनीहि श्री. नीळकंठ दीक्षितांच्या ग्रंथांचा आस्थेने अभ्यास केलेला व दोघेहि स्वतःस दीक्षित वंशातले म्हणवत. त्यापैकी पहिले गृहस्थ स्वर्गवासी झालेले व दुसऱ्यांचा नक्की पत्ता त्यांना माहीत नव्हता. श्री. अप्पय्य दीक्षित व श्री. नीलकंठ दीक्षित यांचे वंशज म्हणविणारे तसे पुष्कळच गृहस्थ मोठमोठ्या अधिकार पदावर असल्याचे कळले. पण त्यांची नावे व पत्ते समजेनात. तेव्हा प्रथम हस्तलिखितांच्या शासकीय ग्रंथालयात नीलकंठ दीक्षितांच्या समग्र ग्रंथांची चौकशी करू या असा विचार केला. डॉ. कुंजिनी राजा यांनी अड्यार ग्रंथालयाच्या अधिकाऱ्यां-साठी एक पत्र दिले व तेथेहि शोध करण्याची सूचना केली. उभयता विद्वानांचा निरोप घेऊन ग्रंथालयाच्या इमारतीकडे वळलो. विश्वविद्यालयाचे भव्य ग्रंथालय जवळच्याच इमारतीत आहे. त्यात शिरल्यानंतरच हस्तलिखितांच्या ग्रंथालयात जाता येते. हस्तलिखितांचे असे ग्रंथालय आजपावेतो मी पाहिलेच नव्हते. आत जाऊन ग्रंथपालाशी भेटलो. येण्याचा उद्देश सांगितला. त्यांनी हस्तलिखिते

अनुक्रमणिका

ग

पाहण्यासाठी एक अर्ज लिहवून घेतला; व अनुमति दिली. सारी हस्तलिखिते कडच्या कुलुपात बंद होती. हस्त लिखितांच्या याद्या छापून तयार होत्या. सविस्तर सूचिपत्रे होती; परंतु सुरुवातीला एकूण व्यवस्थेची कल्पना नसल्यामुळे ग्रंथालयातील संस्कृत विभागाचे प्रमुख पं. विश्वनाथ शास्त्री यांना भेटलो. गृहस्थ स्वभावाने चांगले वाटले. त्यांनी याद्या दाखविल्या. विवरणपर सूचीपत्रांची माहिती मिळविली. या याद्यातून कांही घोटाळे आढळले. नीळकंठ दीक्षित हे अनेक होऊन गेल्यामुळे एकाचे ग्रंथ दुसऱ्याचे नावावर अशी गल्लत झालेली आढळली. त्याचप्रमाणे दुसऱ्याचे ग्रंथ नीलकंठाचे नांवावर हाहि प्रकार होता. (चित्रमीमांसा दोषधिक्कार हा अतिराजयज्व्याचा ग्रंथ नीलकंठाच्या नांवावर यादीत होता. बहुधा श्रीकृष्णम्माचारियर यांनी याच्याच आधारावर आपल्या ग्रंथांत त्याचे कर्तृत्व नीलकंठांना बहाल केले असावे !) आतापर्यंत अनुपलब्ध अशा दोन पुस्तकांच्या प्रती—कैय्यट प्रदीप प्रकाश व मुकुंदविलास येथे आढळल्या.

पं. विश्वनाथ शास्त्रींनी श्री. महालिंग शास्त्री कुंभकोणम् जवळ राहत असल्याची माहिती सांगितली. त्याचप्रमाणे श्री. पी. एस्. कृष्णन् यांनी नीलकंठ दीक्षितावर एक पुस्तक लिहिल्याचेहि त्यांनी सांगितले. स्वतःला नीलकंठाचे वंशज म्हणविणारे श्री. सुब्रह्मण्य हे डंकन डंकली या विख्यात कंपनीचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर आहेत. त्यांच्याकडून इतर कांही माहिती मिळण्याचा संभव आहे असे ते म्हणाले. दुसरे दिवशी डिरेक्टरीतून सुब्रह्मण्य हे नाव शोधू लागलो. सुब्रह्मण्य हे नाव मद्रासी मंडळीत फार लोकप्रिय. त्यामुळे त्या कंपनीत सुद्धा या नावाची माणसे अनेक होती. अंदाज बांधून खडा टाकला पण तो चुकला. तेव्हा दुसरा प्रयत्न केला. तो यशस्वी झाला. गृहस्थ सापडले पण त्यांना बंगलोरला जायचे असल्यामुळे समक्ष भेटीसाठी वेळ नव्हता. श्री. पी. एस्. कृष्णन् यानी लिहिलेल्या पुस्तकांची एकच प्रत त्यांच्याजवळ होती. ते पुस्तक श्रीरंगमच्या वाणीविलास प्रेसमधून किंवा लेखकाजवळून मिळू शकेल असे ते बोलले. यापेक्षा अधिक माहिती त्यांच्याजवळ नव्हती.

मैलापुरचे संस्कृत महाविद्यालय

मद्रासच्या मैलापुर विभागात असणाऱ्या बालमनोरमा प्रेसने नीलकंठांची कांही पुस्तके छापली आहेत असे कळाल्यामुळे त्याचा शोध काढीत होतो. इतक्यात यदृच्छेने संस्कृत महाविद्यालयाची पाटी दिसली. उन्हाळ्याच्या सुट्या लागल्यामुळे भर ९॥ वाजता गुरुजी स्नान संध्येत व विद्यार्थी बाहेर जाण्यात गुंतले होते. ग्रंथपाल हे एक आयुर्वेदाचे अध्यापक होते. पण ते लिपिक, ग्रंथपाल आदि अनेक जबाबदाऱ्या सांभाळणारे संस्थेचे हरकामी सेवक दिसले. संस्कृतमधून बोलले. त्यांना पगारासाठी बँकेतून पगाराचे पैसे आणण्याची घाई होती

पण पाहुणा दिकाटीचा आहे असे पाहून थांबले. नीलकंठ चंपूची एक सटीक आवृत्ति तेथे सापडली. प्राचार्यांची संध्या संपल्याचे चिन्ह दिसेना. शेवटी पगारासाठी घाईत असलेल्या ग्रंथपालांचा निरोप घेतला व बालमनोरमा प्रेस मध्ये गेलो. सर्व प्रती संपल्याचे त्यांनी सांगितले.

अड्यारचे. ग्रंथालय

त्यानंतर अडयार ग्रंथालयात जायचे ठरविले. अडयार नदीचा विशाल प्रवाह ओलांडला. तिच्या काठावर मुद्दाम राखलेल्या विशाल उपवनात हे ग्रंथालय वसले आहे. दारावर पहारेकऱ्याने थांबविले पण डॉ. कुंजिनी राजाचे पत्र हे पाशुपतास्त्रासारखे प्रभावी ठरून प्रवेश मिळाला. सदस्याशिवाय इतराना ग्रंथालयाची दारे बंद आहेत. आत जाऊन अधिकाऱ्यांची भेट घेतली. आवश्यक ते शुल्क भरून सदस्य बनलो. मूळ प्रती शोधू लागलो. ताडपत्रावरचे ग्रंथ अद्यापि मी वाचले नव्हते. ते पाहिल्यावर गंमत वाटली. ताडपत्राचा उपयोग फक्त पंख्यापुरताच माहिती होता. त्यावरची ती लिपि पाहिल्यानंतर मात्र आपण अगदीच अनभिज्ञ आहोत हे बोचू लागले. ग्रंथ उघडा होता. पण काळया रेघाशिवाय कसलाच बोध नव्हता. येथल्या पुस्तकात आतापर्यंत नीलकंठाचे अज्ञात असलेले एक पुस्तक गुरुराजस्तव हे सापडले. त्यामुळे श्री नीलकंठाचे गुरु गीर्वाण योगीन्द्र यांची माहिती सापडली. मुकुंदविलासाचीहि मूळ प्रत येथली. शासकीय हस्तलिखित ग्रंथालयात येथूनच नक्कल करून नेण्यात आली. गुरुराजस्तव हे स्तोत्र फक्त येथील ग्रंथालयातच आढळले. अशासकीय ग्रंथालयात इतके व्यवस्थित ग्रंथालय विरळाच आढळेल. येथली स्वच्छता, टापटीप व शांतता नमुनेदार होती.

तंजावर

मद्रासचे काम आटोपल्यावर १ तारखेला सायंकाळी इगमोर स्टेशनवरून तंजावरला जाण्यासाठी बोटमेलने निघालो. दुसरे दिवशी पहाटे ४॥ च्या सुमारास तंजावरला उतरलो. ठिकाण अनोळखी तेव्हा रात्री स्टेशनवर प्रतीक्षालयात थांबलो. स्नानादि आटोपले. सामान अमानत घरात ठेवले. व उतरण्याचे ठिकाण शोधण्यासाठी निघालो. खिशात नागपूरच्या मोहता विज्ञान महाविद्यालयातील एक मित्र प्रा. नारायणन् यांचे पत्र होते. त्यामुळे थोडा धीर होता. त्यांचे काका श्री. राधाकृष्ण अय्यर हे तंजावरला राहत असत. घर सापडले. श्री. अय्यर हे एक सत्तरी उलटलेले वयोवृद्ध, धार्मिक वृत्तीचे व वकिलीच्या धंद्यातून निवृत्त झालेले गृहस्थ होते. त्यांना पत्र दिले. प्रारंभी त्यांनी भरपूर उलट तपासणी केली व नंतर स्वतःच्या घरातील एक खोली भाड्याने दिली

अनुक्रमणिका

जेवणाची व्यवस्था एका लॉजमध्ये करवून दिली व सरस्वती महाल ग्रंथालयातील एक मोडी लिपीचे पंडित आत्माराम राव यांचीहि गाठ घालून दिली. जेवण आटोपून लगेच सरस्वती महाल ग्रंथालयात गेलो.

सरस्वती महाल ग्रंथालय

व्यवस्थापकाच्या खुर्चीत श्री. वरदराज शर्मा हे गृहस्थ होते. त्यांची ओळख झाली. ते मूळचे केरळमधले. गृहस्थ बहुभाषी होते. संस्कृत भाषेत एम्. ए. असून वेदांत विषयात शिरोमणि पदवी त्यांनी मिळविली होती. संस्कृत भाषेतील संवादाने ते प्रसन्न झाले. त्यांनी संस्कृत विभागातील एक ज्येष्ठ पंडित देवनाथा-चार्य यांची भेट करून दिली. येथून पुढे सुमारे एक महिना वरील पंडितांचा सहवास लाभला.

संस्कृत हस्तलिखितांचा संग्रह असलेले विशाल, प्राचीन व सुव्यवस्थित ग्रंथालय जगाच्या पाठीवर दुसरे नाही असा येथील अधिकाऱ्यांचा दावा आहे. सुमारे ३० हजार संस्कृत हस्तलिखिते, नाना विषयावरची, येथे उपलब्ध आहेत. पुष्कळ ग्रंथांच्या एकमात्र असणाऱ्या प्रती या ग्रंथालयात संग्रहीत केलेल्या आहेत. संस्कृत हस्तलिखितांची जी सविवरण सूची पुस्तके (Discriptive Catalogues) आहेत त्यांचेच मुळी १९ भाग छापून प्रसिद्ध झाले आहेत. त्यातील कांही भागांची प्रत्येकी पृष्ठसंख्या सुमारे ६ शे पृष्ठे भरेल इतकी मोठी आहे. याशिवाय तेलगू, तामील, उर्दू, अरबी, मराठीहि प्राचीन हस्तलिखिते पुष्कळच आहेत. त्यांच्या याद्या व सूचीपत्रके निराळी आहेत. येथील हस्तलिखितांत ताडपत्रांची संख्या फार मोठी आहे. याशिवाय छापील निवडक पुस्तकांचाहि संग्रह येथे आहे.

तंजावरच्या चोल घराण्याच्या राज्यानंतर नायक घराण्याच्या काळी हा ग्रंथसंग्रह वाढू लागला. ग्रंथालय ज्या इमारतीत आहे ती इमारत राजमहालाचा एक भाग आहे. सारस्वताचा सांभाळ करणाऱ्या या इमारतीला सरस्वती महाल म्हणतात ते अगदी अन्वर्थक वाटते. हा भाग कदाचित् नायक घराण्याच्याहि पूर्वीपासून अगदी चोल राजाच्या काळापासून अस्तित्वात असावा असे म्हणतात. त्याची बांधणी उंच, मजबूत, भव्य व प्रशस्त आहे. नायकांच्या घराण्यानंतर भोसले घराण्याने त्यांचे विद्यारक्षणाचे काम चालू ठेवले. त्यानंतर गेल्या शतकांत श्री. सरफोजी महाराजांनी पडत्या काळात सुद्धा एकट्याने पुढाकार घेऊन पैसा व वेळ यांची चिंता न करता सुमारे चार हजारापेक्षा अधिक निवडक ग्रंथ अखिल भारतातून प्रतिलिपि लिहवून आणले एवढेच नव्हे तर जगातून वेगवेगळ्या ठिकाणाहूनहि निरनिराळ्या भाषेतील ग्रंथांच्या प्रती आणविल्या. त्यांनी केलेला

ग्रंथसंग्रह वेदापासून तो भूगोल, स्थापत्य, वैद्यक, इतिहास प्रभृति वेगवेगळ्या विषयांचा व्यापक, वेचक व बहुमोल आहे. ती निवड पाहून श्री सरफोजी महाराजांच्या विद्याप्रेमाचे व दूरदृष्टीचे कौतुक वाटते व त्यांच्याविषयी आदर वाढतो. आता हे ग्रंथालय स्वातंत्र्योत्तर काळात मद्रासच्या राज्य शासनाच्या स्वाधीन करण्यात आले आहे. हे सर्वत्र, तंजावर महाराजा सरफोजी सरस्वती महाल ग्रंथालय या नावाने ओळखले जाते. या ठिकाणी असणारी सचित्र हस्त-लिखिते, सुवर्ण शाईने लिहिलेले ग्रंथ, ऐतिहासिक चित्रसंग्रह खरोखरच नावीन्य-पूर्ण व अद्‌भुत आहेत.

पंडित वर्ग

ग्रंथालयांत निरनिराळ्या भाषांचे पंडित नेमले आहेत. निव्वळ संस्कृत विभागात ६ पंडित काम करतात. अन्य भाषांसाठी प्रत्येकी एक व मराठी विभागात तीन पंडित आहेत. बहुतेक सर्व पंडित आपापल्या विषयातील सर्वोच्च प्राच्यविद्या परीक्षेत उत्तीर्ण आहेत. त्यापैकी शिरोमणि नांवाची ही सर्वोच्च परीक्षा मद्रास विश्वविद्यालय घेत असते. बहुतेक पंडित मीमांसा व्याकरणादि विषयात ती पदवी संपादन करतात. रोज विविध हस्तलिखितांच्या व्यासंगामुळे अनेक पंडितांचे विविध विषयाचे ज्ञान ताजे, व्यापक व सूक्ष्म आहे. सर्वजण बहूभाषी असून इंग्रजीहि बोलतात. संस्कृत भाषेतून बोलू शकतात. पण तामीळ भाषेचा उपयोग सर्वत्र होतो. त्यापैकी पं. देवनाथाचार्य हे गृहस्थ शुद्ध व प्रौढ संस्कृत फार सफाईदारपणे बोलत. त्यांनी आपल्या घरी मुलाबाळातून सुद्धा संस्कृत मातृभाषेसारखे जोपासले आहे. गृहस्थ वैष्णव असल्यामुळे येणारा सांप्रदायिक आग्रहाचा भाग सोडल्यास ते विद्याप्रिय, मर्मज्ञ व रसिक आहेत. त्यांच्याशी बोलणे हा एक चांगला विद्याविनोद आहे. मीमांसा हा त्यांचा प्रमुख विषय असला तरी त्यांचे काव्य, वेद व वैष्णव वेदांत यांचे अनुशीलन चांगले आहे. कोणत्याहि मुद्यासंबंधी तैत्तिरीय संहितेतील वैदिक वचने त्यांच्या स्थळसंकेतासह ते स्पष्ट करून दाखवीत. नीलकंठ दीक्षित हे वेदांचे मर्मज्ञ व पारंगत पंडित होते. त्यामुळे वैदिक वचनाच्या आधारे वा संदर्भ देऊन वर्णन करण्यासारखा एकहि प्रसंग त्यांनी सोडला नाही. अनेक स्थळी पं. देवनाथाचार्य मार्मिकपणे खुलासा करीत. दुसरे एक तरुण पंडित श्री. अनंत सुब्रह्मण्य हे एक नवे मित्र तेथे लाभले. हे संगीत शिरोमणि असून संगीताच्या सर्वोच्च उपाधीने भूषित आहेत. संगीत शास्त्रासंबंधी त्यांचे काम चालले आहे. मंत्रशास्त्रीय ग्रंथांचे सूची पुस्तक तयार करणारे व प्रपंचसंग्रह या विशाल ग्रंथाचे संपादक श्री. सुब्रह्मण्य शास्त्री मंत्रशास्त्राचे अधि-कारी प्रवक्ते आहेत. हेहि संस्कृत बरे बोलत.

त्यांची स्थिति

ही तज्ञ मंडळी विद्यापीठातून काम करणाऱ्या प्राध्यापकाच्या दर्जाची व ग्रांथिक अभ्यासाच्या सूक्ष्मतेत तर क्वचित् त्यांच्याहूनहि सरस ठरणारी असली तरी राज्यसरकार त्यांच्याकडून तिसऱ्या दर्जाच्या कारकुनासहि शोभणार नाही अशा वेतनावर आता आतापर्यंत काम घेत असे ही मोठ्या शरमेची गोष्ट आहे स्वातंत्र्याच्या १६-१७ वर्षांच्या काळानंतर आता त्यांच्या वेतन श्रेणीत थोडी सुधारणा झाल्याचे सांगण्यात आले. त्यांचे वेतन तिसऱ्या दर्जाच्या कारकुना इतपत झाले आहे! त्यापैकी एका मराठी पंडिताचा पगार अजूनहि केवळ नव्वद असल्याचे तो सांगत होता. दुसरे दोघे प्रतिमास रु. १०० वेतनावर काम करीत असल्याचे कळाले. स्वतंत्र हिंदुस्थानातील एका प्रगतिशील व दक्ष म्हणविल्या जाणाऱ्या राज्य सरकारचे हे विद्याप्रेम पाहून कुणाचीहि मान खाली वाकल्या-शिवाय राहणार नाही. भारतातील इतरहि अनेक राज्यसरकारे प्राचीन विद्या-वंताच्या बाबतीत 'उडदामाजी काळे गोरे' या वचनाप्रमाणे वरील सरकारची सख्खी भावंडे आहेत. केंद्र सरकारचा संस्कृत विभाग याची दखल घेऊन राज्य सरकारला योग्य उपदेश करील व या कामासाठी आर्थिक उणीव असल्याची खबर ते सांगत असल्यास आपल्या थैलीचे तोंड त्यांच्या दिशेला वळवील तर स्वतंत्र भारतावरचा एक कलंक कमी केल्याचे श्रेय त्यांना मिळेल. येथील मराठी विभागातील ग्रंथसंपदेचा उपयोग करून डॉक्टरेट मिळविणारे अनेक पंडित पश्चिम महाराष्ट्रात सन्मानाने नांदत आहेत. त्यांनी मद्रास मधील मराठीची ही दुर्दशा सरकार दरबारी नोंदविल्यानंतर एका अर्थाने त्या मुक्या जीवांचे हाल थोडे तरी कमी केल्याचे श्रेय त्यांना घेता येईल.

व्यवस्था व काम

हे ग्रंथालय जनतेला पाहण्यासाठी उघडे आहे. ज्या ठिकाणी ग्रंथ संग्रह आहे तेथेच पंडित मंडळी बसतात. त्यांच्या अति साधेपणामुळे लोक त्यांच्याकडे बहुधा प्राचीन ग्रंथाचे जिवंत नमुने म्हणून पाहत असावे! जुन्या ग्रंथांच्या शुद्ध प्रती तयार करणे व त्या ग्रंथांचे संपादन करणे अशी कामे तेथे चालली असतात. पण त्यांना कुठे निवांतपणे बसण्यास जागा नाही. मधूनच हे येणारे लोक अबोधपणे अनेक प्रश्न विचारीत असतात; व त्यांची उत्तरे ते देत असतात. सरकारच्या उदासीन दृष्टिकोणाचा एकूण प्रभाव सर्व ग्रंथालयातल्या व्यवस्थेवर दिसतो. सर्व सेवकवर्ग बहुतेक संस्थानी राजवटीतला असल्यामुळे एक प्रकारचा स्वस्थ व सुस्त वाटतो. मागितलेले पुस्तक मिळण्यासाठी वाट पाहत बसावे लागते. कांही पंडित मंडळी विशेषतः मुख्य व्यवस्थापक हे त्यातल्या त्य

तत्पर आहेत ही समाधानाची जागा होय. म्हणूनच जगात अद्भुत समजल्या जाणाऱ्या या ग्रंथालयाचा उपयोग होऊ शकतो.

ताडपत्र लेखन

ताडपत्राच्या विभागाचे अधिकारी एक वेंकट सुब्रह्मण्य शास्त्री म्हणून पंडित आहेत. अजूनहि ताडपत्रावर लेखन करणारे लेखक येथे आढळतात. ताडपत्राची रुंदी १।। इंचापासून तो ३–४ इंचापर्यंत व लांबी १२ ते २४ इंचापर्यंत आढळली तालवृक्षाचे ताल, हिंताल असे अनेक प्रकार असतात. त्याप्रमाणे पानांची लांबी रुंदी कमी अधिक असते असे सांगत. निसर्गतःच ताडाच्या वाढीस उपयुक्त असलेल्या या भूमीत लेखनासाठी ताडवृक्ष विपुल प्रमाणात वाढविले जात. डौलदार छत्रीसारखी शोभणारी त्यांची पाने खाली सूर्य किरणांना येऊ देत नाहीत ताडपत्राच्या पानाचे संधि असतात तेथून लेखनासाठी पाने कापली जातात. ताडपत्रावरील हस्तलेखाची निरुंद पण लांबट पाने एकावर एक रचून ठेवली असतात. त्यांना छिद्र पाडूत बहुधा लाल रंगाचा रेशमी दोरा ओवलेला असतो. मागे पुढे आधारासाठी ताडपत्राच्या आकाराच्या लाकडी पट्ट्या ठेवल्या असतात. त्यावरून तो दोरा आवळून गुंडाळला जातो. या सोयीमुळे मोठाहि ग्रंथ हाताळणे सोपे जाते. काळाच्या प्रवाहात शे दोनशें वर्षांत कागद जीर्ण शीर्ण होतात. परंतु ५–५–६–६ शे वर्षे किंवा त्याहूनहि अधिक काळ ग्रंथ टिकवून धरण्याची ताडपत्रांची शक्ति सर्वस्वी स्पृहणीय आहे. या टिकाऊपणासाठी आता आतापर्यंत लोक ताडपत्रावर लिहिणे पसंत करीत. छापखाना व कागद यामुळे या व्यवसायावर गदा आली. आता या लेखनावर उपजीविका चालविणारे लोक विरळा झाले आहेत. ही लेखनाची पद्धत विलक्षण आहे. उत्तम प्रकारची ताडपत्रे निवडून त्यांचे योग्य त्या आकाराचे तुकडे करावयाचे व त्यावर लोखंडी लेखणी मुठीत धरून ताडपत्रे कोरली जातील असे लिहावयाचे. सध्या स्टेनसिलवर ज्याप्रमाणे लिहिले जाते तसे लिहिण्याचा हा प्रकार आहे. लेखणी बोटांच्या ऐवजी मुठीत धरण्याची रीत जरा विचित्र आहे. पण लेखक इतक्या सफाईने लिहितात की पहात राहावे. लिख् धातु लिहिणे या अर्थी आला तो बहुधा या पद्धतीवरून. ते कोरणे आटोपल्यावर भृंगराज किंवा अन्य कांही वनस्पतींचा रस त्यावर लावला जातो व ती अक्षरे काळी दिसू लागतात. ही अक्षरे सुंदर व अनेक वार इतकी सूक्ष्म काढली असतात की साध्या वाचण्यासाठीहि सूक्ष्म दर्शक (मॅग्नीफाइंग ग्लास) काचाचा उपयोग करावा लागतो. आज कित्येक ताडपत्रे काळाच्या आघातामुळे जीर्णशीर्ण व कीटदष्ट झाली आहेत. ती वाचणे फार कष्टाचे काम झाले आहे.

ग्रंथलिपीचा वापर

ही ताडपत्रे लिहिण्यासाठी ग्रंथलिपीचा वापर केला जातो. या लिपीचे वैशिष्ट्य म्हणजे या लिपींत शिरोरेषा नाहीत. त्यामुळेच देवनागरी ऐवजी ताडपत्रलेखनासाठी ही प्रचारात आली. नागरी लिपीतल्या शिरोरेषामुळे ताडपत्र पूर्ण फाटले असते. यामुळे नागरीत ताडपत्र लेखन बहुधा सापडत नाही. ग्रंथलिपीतली अक्षरे बव्हंशी तमिळलिपी प्रमाणे लिहिली जातात. तमिळ भाषेत क, च, ट, त, प, या वर्गातील सामान्यतः आदि व अंत दाखविणारी दोन व्यंजने आढळतात. उदाहरणार्थ क, ङ; च, य आदि मधले ख, ग, घ, छ, ज, झ आदि वर्ण नसतात. संस्कृत भाषा लिहिण्यासाठी तमीळ अपुरी पडते म्हणूनच त्या वर्णांचे संकेत ग्रंथलिपीत तेलगू व मल्याळम् भाषेतून स्वीकारले आहेत असे तेथल्या विद्वानांचे म्हणणे होते. पूर्वी संस्कृत ग्रंथ सुद्धा ग्रंथलिपीत छापले जात. आता मात्र नागरी लिपीचा प्रसार सुरू झाल्यामुळे तिच्यातले सौकर्य व सौंदर्य यांनी आपला प्रभाव पाडला असून आता संस्कृत ग्रंथाची छपाई नागरीतून होऊ लागली आहे. ग्रंथलिपीतल्या चक्रव्यूहाच्या तोडीच्या सर्पाकृति रेषावलयातून दक्षिणेतली संस्कृत बाहेर पडली हा संस्कृत विश्वाच्या दृष्टीने एक उपकारच म्हटला पाहिजे.

नीलकंठ दीक्षितांचे ग्रंथ

या ताडपत्रात शिवलीलार्णव, नीलकंठ विजयचंपू, गंगावतरण व इतर लघुकाव्ये यांच्या अनेक प्रती होत्या. नीलकंठ विजय चंपूच्या तर सटीक अशा तीन प्रती आढळल्या. याशिवाय शिवतत्त्वस्य, रघुवंशस्तव, चण्डीरहस्य, ही नीलकंठ दीक्षितांनी रचलेली पुस्तकेहि मिळाली. निर्णय सागरने प्रसिद्ध केलेल्या गंगावतरणाची प्रस्तावना लिहिणारे कुप्पुशास्त्री हे येथले एक पंडित होते. त्यांच्या प्रस्तावनेत उल्लेखिलेले ग्रंथ व समकालिक ग्रंथकार यांच्यासंबंधी कांही नवीन माहिती आढळली. शिवाय तंजावरचे नायक घराणे व मदुरेचे नायक घराणे यासंबंधीचे प्रामाणिक इतिहास ग्रंथ मिळाले. मद्रास रिसर्च जर्नलचे कांही भाग सापडले. त्यांतून अप्पय्य दीक्षित व कांही संबंधित कवि यावरचे अधिकृत लिखाण मिळाले. श्री. पी. एस्. शास्त्रींनी दक्षिणेतील सोळाव्या व सतराव्या शतकातील ग्रंथकारांचा विस्तृत आढावा सरस्वती महाल ग्रंथालयातील ग्रंथाच्या सूचीपत्राच्या १९ व्या भागात घेतला आहे. तो तर खूपच विस्तृत व व्यापक आहे.

डॉ. सुब्रह्मण्य शास्त्रींची भेट

तंजावरहून जवळच असलेल्या पंचनदतीर्थात अन्नमलाई विद्यापीठाचे एक सेवानिवृत्त, प्रसिद्ध व वयोवृद्ध प्राध्यापक क्षेत्रवास करीत आहेत. त्यांच्याकडून

अनुक्रमणिका

श्रीनीलकंठ दीक्षित या विषयासंबंधी कांही प्रकाश पडेल असे कळाल्यामुळे त्यांच्या भेटीस गेलो. बरोबर सरस्वती महालातले एक पंडित श्री. अनंत–सुब्रह्मण्य होते. बोलणे झाले. पण डॉ. सुब्रह्मण्य यांना नीलकंठ दीक्षित हा विषय अभ्यासासाठीच योग्य वाटत नव्हता. त्यांचे मन महाभारत, रामायण, वेद यातच रमत होते. त्यांच्या भाषणातून व्यक्त झालेले विचार ऐकून––

भ्रमन्वनान्ते मधुमंजरीषु न षट्पदो गन्धफलीमजिघ्रत्।
सा किं न रम्या स च किंनरन्ता बलीयसी केवलमीश्वरेच्छा॥

हे सुभाषित आठवले. त्यांनी दिलेला सल्ला म्हणजे लग्नाचा सल्ला विचारण्यासाठी गेलेल्या तरुणाला एखाद्या वृद्धाने संन्यास घेणे कसे फायदेशीर आहे हे समजावून सांगावे तसा वाटला. त्यांचा एकूण आविर्भाव, नीलकंठाविषयी त्यांची माहिती व विचार यांची विसंगति जाणवत होती. शेवटी विशेष लाभ नाही असा विचार करून आम्ही दोघेहि परतलो. नाही म्हणावयास कावेरीचे मार्जन, पंचनदेश्वर व श्री. त्यागराजांची समाधि यांचे दर्शन हा लाभ झाला. सरस्वती महालातले प्राथमिक काम आटोपल्यावर पुढच्या मार्गदर्शनासाठी श्री. महालिंग शास्त्रींची भेट घेण्याचे ठरविले.

श्री. य. महालिंग शास्त्रींची भेट

सरस्वती महालातील पंडितांचेहि म्हणणे तसेच होते. त्याचबरोबर चिदंबरच्या अन्नमलाई विद्यापीठातील संस्कृत विभागाचे प्रमुख डॉ. वेंकटरामन् व तिरुपतीचे प्राच्य विद्वान ताताचार्य या दोघांचीहि त्याच अर्थाची पत्रोत्तरे आली होती. त्यांचा पत्ता मिळविला. ते कुंभकोणहून १३ मैल दूर असलेल्या तिरुवालंगाडु नावाच्या खेड्यात राहत होते. हे अप्पय्य दीक्षिताचे वंशज म्हणवत असून त्यांच्या विषयीचे अधिकृत अभ्यासक म्हणून त्यांचे नाव प्रसिद्ध होते. अन्नमलाई विद्यापीठात श्री. नीलकंठ दीक्षित या विषयावर दिलेली व्याख्याने मुद्रणाची वाट पाहत विद्यापीठाच्या कार्यालयात पडली असल्याचे कळाले. संस्कृत नाटय व काव्य यांचे लेखन त्यांचे अविश्रांत चालू आहे. इंग्रजी व तमीळ भाषेतहि त्यांनी लिहिले आहे.

श्री. राधाकृष्ण अय्यर यांनी भेटीची योजना ठरवून दिली. मे च्या तिसऱ्या आठवड्यात त्यांचेकडे गेलो. कुंभकोणमहून मायावरम् (मायूरम्) कडे जाणाऱ्या रस्यावर १२ व्या मैलाजवळ हे गाव येते. तंजावर प्रदेशांची वनश्री कावेरीच्या कृपेमुळे किती प्रसन्न असते हे कुणालाहि या प्रवासात अनुभवता येईल. माझा मुक्काम मात्र तिरुवालंगाडूपासून सुमारे अर्धा ते पाऊण मैल दूर असणाऱ्या भास्करराजपुरम् हे सुरेख नाव धारण करणाऱ्या लहानशा खेड्यात होता. भर-

दुपारी जाऊन पोहोचलो. परंतु, उन्हाळा असूनहि नारळीच्या व ताडाच्या उंच झाडांची गर्द सावली सदैव रस्त्यावर असल्यामुळे ऊन्ह जाणवत नव्हते. संध्या-काळी शास्त्रीबुवांच्या भेटीस गेलो. श्रीमहालिंग शास्त्री वयाने ६० ते ६५ च्या दरम्यान असलेले, वाटत होते. ते शरीराने थोडे स्थूल, मध्यम उंचीचे व शांत वृत्तीचे आहेत. त्यांनी स्वागत चांगले केले. मद्रासी कुटुंबात सामान्यतः कॉफी देतात. पण चहा हवा काय असा प्रश्न येथे ऐकू आला. मी चहा कॉफीचा भक्त नसल्यामुळे नारळीचे शीतल पाणी व केळी माझ्या वाटचास आली. महालिंग-शास्त्रींनी विचारपूस केली. त्यांनी स्वतःविषयी माहिती सांगितली व स्वतः केलेल्या उद्योगाची व लिहिलेल्या लेखांची कल्पना दिली. त्यांनी कांही लेखांच्या प्रती दाखविल्या. त्यात त्यांनी १९२८ साली हिंदूतून प्रसिद्ध केलेले लेख होते. तसेच १९२५ च्या सुमारास मद्रास ओरिएंटल जर्नल ह्या शोध पत्रिकेतून प्रसिद्ध केलेले दीक्षित विषयक लेख होते. दुसरे दिवशी परत करण्याच्या अटीवर त्यांनी ते मला दिले. त्यातले आवश्यक ते मुद्दे रात्री व दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत मी टिपून घेतले. दुसऱ्या दिवशी ठरल्या वेळेस पुन्हा त्यांच्या भेटीस गेलो.

अप्पय्य दीक्षितांच्या कालाविषयी त्यांनी संशोधन केले असून तो १५२० ते १५९३ हा असावा असे मत त्यांनी मांडले आहे. अडयप्पलम् येथे असणाऱ्या नीलकंठेश्वर मंदिरात श्री. अप्पय्यदीक्षितांनी स्थापन केलेला शिलालेख त्यांनी अभ्यासला असून त्यांनी लाविलेला अर्थ मननीय आहे. त्यामुळे श्री. नीलकंठ दीक्षिताच्या बालपणाची माहिती मिळते. त्यासंबंधी त्यांच्याबरोबर चर्चा झाली त्यांनी अन्नमलाई विद्यापीठात दिलेल्या व्याख्यानाची प्रत मात्र प्रयत्न करूनहि मला नुसत्या वाचण्यासाठी मिळू शकली नाही.

नीलकंठाच्या ग्रंथाविषयी मला मिळालेली कांही नवी माहिती मी त्यांना सांगितली. विशेषतः कैयट तत्त्व रहस्य व मुकुंदविलास हे ग्रंथ त्यांना पाहा-वयास सापडले नव्हते. गुरुराजस्तव हे स्तोत्र त्यांच्या कानावर होते. अतिरात्र-यज्व्याने लिहिलेल्या चम्पूची एक विशिष्ट प्रत मला आढळली होती तिच्यात असलेला कालनिर्देश अप्पय्य दीक्षिताविषयी त्यांनी मांडलेल्या मताला दुजोरा देणारा होता. हा नवा पुरावा कळाल्यामुळे त्यांना आनंद झाला. त्यांचा अभ्यास विशेषतः श्री. अप्पय्य दीक्षिताविषयी होता. नीलकंठ दीक्षितांच्या विषयी काही ऐतिहासिक प्रमाणे व माहिती हवी होती वा ती कोठे शोधून मिळू शकेल याविषयी ऐकावे अशी इच्छा होती ती पूर्ण झाली नाही. निव्वळ पारंपरिक दंतकथांच्या जोरावर इतिहास लिहिण्यात होणाऱ्या प्रमादांची जाणीव त्यांना होती. अप्पय्य दीक्षिताविषयी ऐतिहासिक प्रमाणांचा त्यांनी कसून चालविलेला शोध त्यांच्या संशोधन प्रीतीची साक्ष देत होता. नीलकंठाविषयी एक दोन गोष्टींचा

अनुक्रमणिका

उल्लेख त्यांनी केला. आपल्या वंशातल्या एका महापुरुषाच्या ग्रंथांचा उत्तरेत आस्थेने अभ्यास केला जात आहे याबद्दल त्यांना आनंद वाटला. दक्षिणेत त्याविषयी आवश्यक तो प्रयत्न दिसत नाही व एकूण संस्कृत अभ्यास मरगळलेला आहे याबद्दल त्यांच्या मनात विषाद वसत होता. त्यांनी लिहिलेले अनेक संस्कृत ग्रंथ प्रकाशनाची वाट पाहत 'जीर्णमंगे सुभाषितम्' या न्यायाने हस्तलिखिताच्या स्वरूपात पडून आहेत. त्यांच्याशी झालेला संवाद काही संस्कृतात व बाकीचा इंग्रजीत झाला. शास्त्रीबुवा कसलेले संस्कृत लेखक असले तरी त्यांना इंग्रजी बोलणेच सोयीचे वाटे. त्यांच्या भेटीने एक उत्साह आला. तेथून मायूरमार्गे चिदंबरला गेलो. तेथे अप्पय्य दीक्षितांच्या आवडत्या नटराजाचे दर्शन घेतले. त्यांच्या निर्याणाची कथा आठविली. नीलकंठ दीक्षितांच्या या दिगंतकीर्ति पितामहाचे 'मारमणमुमारमणम्' हे प्रसिद्ध हरिहरस्तोत्र जेथे जन्मले ते नटराज व गोविंदराज यांचे दर्शन एकाच वेळी घडवून देणारे ते स्थळ पाहिले. नटराजाची मूर्ति दृष्ट लागेल इतकी मोहक आहे. तेथून तंजावरला परत आलो.

श्रीरंग येथील वाणीविलास प्रेस

नीलकंठ दीक्षितावरची व्याख्याने वाचावयास न मिळाली तरी नीलकंठावर लिहिलेले तामीळ पुस्तक बघू या व जमले तर लेखकाचीहि गाठ घेऊ या असा विचार करून मेच्या शेवटच्या आठवड्यात तंजावरहून निघालो. तेथून त्रिचनापल्ली हे फार दूर नाही. त्रिचनापल्लीहून श्रीरंग सुमारे ६ मैल अंतरावर आहे. नीलकंठाविषयीचे पुस्तक येथील वाणीविलास प्रेसमध्ये छापले गेले आहे. छापखान्याचे व्यवस्थापक डायरेक्टर हेहि स्वतःला नीलकंठाच्या वंशजापैकी समजतात. ते उपस्थित होते. छापखान्याचे व्यवस्थापक वेंकट रामन हेहि सुस्वभावी होते. तेथून रघुराजस्तव, चण्डीरहस्य, व नीलकंठविषयक तामिळ पुस्तकांची खरेदी केली. संस्कृत पुस्तकांच्या प्रकाशनाचा उद्योग करणारा हा छापखाना फार मोठा आहे. नीलकंठांची बहुतेक पुस्तके या छापखान्यातून शुद्ध व सुबक छापली गेली आहेत. येथे एक चांगले ग्रंथालय आहे पण त्याचे व्यवस्थापक पंडित आजारी होते. त्यांना सपाटून ताप आला होता. त्यामुळे त्यांची भेट व्हावयाची राहिली. येथे नीलकंठविषयक पुस्तकाचे लेखक श्री. पी. एस्. कृष्णन् यांचा नक्की पत्ता मिळाला. हे लाइफ इन्शुरन्स् कॉर्पोरेशनचे पदाधिकारी असून मदुरेला तिरुनगर येथे राहत असल्याचे कळाले. तेव्हा श्रीरंगहून त्रिचनापल्लीस आलो; व तेथून मदुरेला उतरलो. तेथे रामेश्वर संस्थानची एक संस्कृत पाठशाळा आहे. तिच्यांत साहित्य व्याकरणशास्त्राचे उच्च शिक्षण शिरोमणीपर्यंत दिले जाते. या संस्थेची माहिती व ओळखपत्र तंजावरचे मित्र

श्री. अनंत सुब्रह्मण्य यांनी दिले होते. प्रधानाध्यापक उपस्थित नव्हते. त्यांचा तरुण मुलगा श्रीराम हा घरी होता. संस्कृत प्रधानाध्यापकाचे हे ज्येष्ठ चिरंजीव एम्. एस्सी चे प्रथम वर्ष परीक्षेत उत्तीर्ण झाले होते. त्यांच्या सुस्वभावामुळे मदुरेचे राहणे व भ्रमण सोयीचे झाले हे नमूद करणे आवश्यक आहे. त्यांच्या सोबत तिरुमलाने बांधलेला प्रसिद्ध मृदुमण्डपं मदुरेचे विख्यात मीनाक्षी–सुंदरेश्वराचे मंदिर ही पाहिली. नीलकंठाविषयी कांही ऐतिहासिक उल्लेख देवळाच्या रेकॉर्डवर आहे किंवा काय हे पाहण्यासाठी देवस्थानच्या प्रशासक अधिकाऱ्याचे कार्यालयात व मुख्य पूजकांच्याहि घरी जाऊन आलो. येथल्या पुजाऱ्यांना वट्टर म्हणतात. त्याचप्रमाणे नीलकंठांच्या काव्याचे एक अभ्यासक व वंशज श्री. एन्. एस्. विश्वनाथ अय्यर, निवृत्त विविज्ञ यांचीहि प्रत्यक्ष भेट घेतली. नीलकंठाविषयी उल्लेख आमचेकडे आला नाही असे कार्यालयाचे अधिकारी म्हणत होते. वट्टर ऐकीव माहिती सांगत. पण त्यांचेकडेहि प्रमाण नव्हते. एका वट्टरने सुमारे ५० वर्षापूर्वी तिरुप्पणिमालइ नावाचे पुस्तक लिहिले गेले व त्यातून नीलकंठांचा उल्लेख मंदिरातील उत्सवांच्या पूजाक्रमाचे नियोजक म्हणून आला आहे असे सांगितले. पण ते पुस्तक शोधूनहि सापडले नाही. येथेच मदुरेपासून ६–७ मैलावर असलेल्या तिरुनगरात श्री. पी. एस्. कृष्णन् यांच्या भेटीसाठी गेलो. पण ते प्रशिक्षणासाठी नागपूरला गेल्याचे समजले! नीलकंठाच्या समाधिस्थानाची माहिती मला हवी होती. ते ठिकाण तिरुनेलवेल्लीच्या जवळ पाला मडइ असल्याचे कळले. पण तिरुनेलवेल्लीला कुणाकडे पत्ता लागेल हे कळत नव्हते. श्री. पी. एस्. कृष्णन् यांच्या घरी कुणीतरी तरुण मुलगी व दोन तीन मुले होती. तिरुनेलवेल्लीच्या श्री. कृष्णन् यांच्या मूळ राहत्या घराचा पत्ता मी विचारला पण ती मुलगी सांगेना. तिला काय वाटले न कळे. तो पत्ता मिळाल्याशिवाय पालामडइ हे ठिकाण कसे शोधावे ही पंचाईत होती. शेवटी तिची कशी बशी खात्री पटविली व तिने दिलेला पत्ता उतरवून घेतला.

[अपूर्ण]

वामन चोरघडे यांची कथा

लेे०–प्रा. वसंत वऱ्हाडपांडे

वामनराव चोरघडे यांच्या कथालेखनाला प्रारंभ होऊन आता जवळ जवळ अडीच तपे झाली आहेत. या दीर्घ कालावधीच्या मानाने पाहिले तर त्यांच्या कथालेखनाचा वेग तसा मंदच म्हटला पाहिजे. मराठी कथालेखन करणाऱ्या अन्य लेखकांच्या कथानिर्मितीचा वेग पाहिला की वामनराव हे मंदगती वाटतात. परंतु, आरंभीच्या तीव्रगतीने प्रेक्षकांचे मन वेधून घेऊन नंतर येणाऱ्या शक्तिहीनत्वामुळे शून्यगती होणाऱ्या खेळाडूपेक्षा, आरंभीपासूनच अंतिम स्थानाकडे दृढनिश्चयाने व खंबीर गतीने पावले टाकून यशस्वी 'धाव' घेणाऱ्या खेळाडूचे श्रेष्ठत्व जसे निर्विवाद असते, तसाच प्रकार वामनरावांच्या बाबतीत झालेला दिसून येतो. पावसाळ्यातील जलधारांनी उन्मत्त होऊन खळाळणारी नदी उन्हाळ्यात सूत्राकार झाली म्हणजे जसे तिचे रूप केविलवाणे दिसते, तसाच प्रकार आपल्या काही प्रतिभावंतांचा दिसतो. चोरघड्यांच्या नंतरच्या पिढीतील काही कथाकारांनी कथावाङ्मयात मोलाची भर घातली, कथेचा अधिक विकास केला हे सर्व खरे !– नवनवीन प्रयोगांनी कथासुंदरीचे कोडकौतुक करताना त्यांनी आपल्या सर्व सामर्थ्याचा उपयोग केला हेहि मान्य !–परंतु, यांच्या कथालेखनाची गती मंदावताच या कथालेखकांच्या अस्तित्वाबद्दलच कुणीहि शंका घ्यावी असा प्रकार घडल्याचा भास झाल्याशिवाय राहत नाही. वामनराव चोरघडे कथालेखक म्हणून 'संपले' असे उद्‌गार मध्यंतरी कानावर पडत. परंतु, कथाक्षेत्रातील हा 'पदयात्री' आपली खंबीर पावले टाकीत मंदगतीने जाणकारांचे लक्ष वेधून घेत अजूनहि वाटचाल करीतच असल्याचे दृश्य दिसून येते. एखादा नंदादीप मंदिराच्या गाभाऱ्यात शांतपणे तेवत राहावा, त्याच शांतपणे वामनरावांची लेखनतपश्चर्या अडीच तपांपासून अखंड चालू आहे.

वामनरावांच्या कथालेखनाला नकळत दिलेली नंदादीपाची उपमा यथार्थहि आहे. त्यांच्या 'सुषमा' या पहिल्या कथासंग्रहापासून 'मजल' या गतवर्षी प्रकाशित झालेल्या संग्रहापर्यंत एकूण अकराहि कथासंग्रहांचे वाचन केले तर त्या कथांतून एका प्रसन्न व सुसंस्कारित अशाच व्यक्तित्वाचा आविष्कार झालेला दिसून येईल. कलाकार हा त्याच्या कलाकृतीतून अभिव्यक्त होत असतो, हे विधान वामनरावांच्या बाबतीत शंभर टक्के खरे वाटते. आणि संपन्न व्यक्तित्वाच्या रसायनात मुरलेल्या त्यांच्या कथाहि आरंभापासून आजपर्यंत तशाच प्रांजळ, सद्भावपोषक आणि मानवी जीवनमूल्यांचे दर्शन घडविणाऱ्या असल्याचा प्रत्यय येतो.

रौप्यमहोत्सवी वि. सा. सम्मेलन पुसद



संमेलनाध्यक्ष

श्री. वामन कृष्ण चोरघडे

अनुक्रमणिका

याचे कारण आहे. वामनरावांच्या लेखनावर त्यांच्या ज्या व्यक्तित्वाचा ठसा उमटला आहे त्या व्यक्तित्वाची घडण करणारे वातावरण त्यांच्या कथालेखनाचे स्वरूप निश्चित करण्यास कारणीभूत ठरले आहे. आपल्या कथालेखनाविषयी लिहिताना स्वत: वामनरावांनीच हे प्रगट केले आहे. महात्मा गांधीजींच्या वास्तव्याने व कार्याने ज्या नगराला विश्वविख्यात केले त्या वर्धा नगरीत वामनरावांचा बराच काळ गेला. महात्माजींच्या प्रत्यक्ष सहवासाने त्यांच्या मनाला आकार मिळाला. मानवी मूल्यांवरील प्रबळ श्रद्धा त्यांच्या मनात दृढमूल झाल्या. दुर्गुणांपेक्षा सद्गुणांकडे धाव घेताना त्यांच्या मनाला बरे वाटू लागले.—ह्या भाववृत्तीमुळे त्यांच्या कथांतील पात्रे सद्गुणानुरागी झाली आहेत. मानवी वासना प्रबल असल्या आणि स्त्री—पुरुषातील शारीरिक आकर्षण बलवत्तर असले तरी अशा आकर्षणात व अशा वासनांच्या मिठीत सापडलेली वामनरावांची पात्रे आपला तोल मोठ्या निग्रहाने सांभाळताना दिसून येतात.—असे त्यांच्या आरंभीच्याच कथांतून आढळते असे नाही. तर 'मजल' या नव्या कथासंग्रहातूनहि हाच प्रत्यय येतो. या दृष्टीने ह्या संग्रहातील **'योगिनी', 'सुमती'** ह्या गोष्टी वाचाव्यात. जिथं हा तोल सांभाळणे स्त्री—पुरुषांपैकी एखाद्याला जमत नाही, तिथं दुसरी व्यक्ति स्वत:ला सांभाळताना दुसरीलाहि नकळत सांभाळत असलेली दिसून येते !—स्त्री पुरुषांच्या संबंधाचे उघडेवाघडे चित्रण करण्याच्या, मानवी वासना चवीष्टपणे कुरवाळण्याच्या आजच्या काळातहि वामनरावांची ही 'तोलरक्षी' व्यक्तिचित्रे वावरतात...इतकेच नाही तर ढळू पाहणाऱ्या मूल्यांना सावरतात...आधार देतात !—वामनरावांच्या श्रद्धाळू व्यक्तित्वाचाच हा परिणाम आहे. वामनरावांचे साहित्य वाचताना म्हणूनच बरेचदा साने गुरुजींची आठवण होते.

याचा असा अर्थ नव्हे की जीवनमूल्यांची व श्रद्धांची जोपासना करताना ते कलात्मकतेकडे पाठ फिरवतात !—कथा हा एक कलाप्रकार आहे व त्याची कलात्मकता राखण्यातच त्या प्रकाराचे श्रेष्ठपण आहे हे ते जाणतात. आणि यातच त्यांचे मोठेपण आहे !—कथाकार या नात्याने वामनरावांना जे अग्रपद मिळाले, ते त्यांच्या साहित्यातील कलागुणामुळे ! आशय सांभाळताना अभिव्यक्तीकडे दुर्लक्ष ते कधीच करीत नाहीत किंबहुना आपल्या आशयाची परिणामकारकता साधण्यासाठी त्याचा कलात्मक आविष्कार करताना ते अत्यंत दक्षता बाळगतात. कथेच्या कलारूपाची हानी होणार नाही याची इतक्या डोळसपणे दक्षता घेणारा कथाकार, मला वाटते, दुसरा नसावा !—प्रत्येक शब्द, प्रत्येक वाक्य आणि कथेतील प्रत्येक पात्र योजताना ते कधीच उघळेपणा करीत नाहीत.—त्यांची ही सावधता कधी कधी इतकी वाढते की कथेला एकप्रकारची अस्पष्टता...गूढता येते !—कवितेचा स्पष्टार्थ लावताना जसा अध्याहृत शब्दांचा आधार घ्यावा

लागतो, तसे वामनरावांच्या कथा वाचतानाहि करावे लागते. त्यांच्या कथा आटोपशीर आणि काव्यात्मक वाटतात त्या याचमुळे !—त्या खरोखरीच 'लघुकथा' वाटतात. 'जीवनमूल्ये' व 'कलामूल्ये' यांचा वाद त्यांच्या लिखाणात जाणवत नाही तर या दोन्ही मूल्यांची हातमिळवणी कुशलतेने करण्यात आल्याचेच प्रत्ययास येते. 'पाथेय' या संग्रहातील 'अतिथि देवो भव' या त्यांच्या प्रसिद्ध कथेचे उदाहरण या संदर्भात द्यावेसे वाटते. पैकू पोळ्याच्या दिवशी बैलांना सजवून डॉक्टरांकडे नेतो. डॉक्टरांची पत्नी घरी असते. पैकू तिला म्हणतो,

"बाई, दारी देव आणले आहेत. पूजा करा."

त्यावर **'देवांना'** पाहताच डॉक्टरीणबाईंनी काढलेल्या उद्गारांनी पाश्चात्य-शिक्षणपद्धतीने परंपरागत रूढ भारतीय जीवनमूल्यांना कसा तडा गेला आहे याचे विदारक दर्शन घडते. त्या म्हणतात, "कशाला रे ही पूजा ? त्या जनावरांना त्यात काही कळते तरी ? अशिक्षितांचे हे खेळ आणि ह्या समजुती. आम्हाला यात विश्वास नाही..."

—कोणत्याहि प्रकारची कलात्मकतेला बाधक ठरेल अशी व्याख्यानबाजी न करताहि वामनरावांनी स्वतःला बुद्धिवादी समजणाऱ्या सुशिक्षित समाजातील ढासळणाऱ्या मूल्यांचे सुस्पष्ट दर्शन घडविले आहे. आणि त्यामुळेच ते अधिक प्रभावी ठरले आहे.

भारतीय मन हे तत्त्वज्ञानाच्या पाण्यावर पोसले आहे. जीवनाकडे पाहताना भारतीय माणूस—आधुनिकतेच्या आहारी न गेलेला भारतीय माणूस—तत्त्वचिंतकाच्या भूमिकेवरूनच पाहात असतो. वामनरावांच्या ठिकाणीहि ही तत्त्वचिंतन करण्याची वृत्ती भरपूर आहे. आणि ह्या वृत्तीला वाव मिळेल अशीच प्रथमपुरुषी निवेदनपद्धती त्यांनी स्वीकारलेली आहे. त्यांच्या अनेक कथांतून 'मी' हेच प्रमुख पात्र असते. 'मी' चा अनुभव सांगणे हाच त्यांच्या कथांचाहि हेतू असतो. प्रभाकर पाध्यांनी 'आपल्या अनुभवाला अर्थदर्शनाचे अस्तर जोडण्याची' सवय चोरघड्यांना आहे व त्यामुळेच अनेक अथांतून त्यांनी निवेदकाची भूमिका स्वीकारलेली आहे.' असे विधान केले आहे. ह्या विधानात पाध्यांच्या प्रांजळ वृत्तीचे दर्शन घडते असे मानले तर हे विधान स्वीकारायला हरकत नाही !—मात्र ते स्वीकारताना अधिक डोळस होणे आवश्यक आहे. अनुभव आणि अर्थदर्शन हे मूळ वस्त्र आणि अस्तर यांच्या इतके भिन्न असल्याचे चोरघड्यांच्या कथा वाचताना वाटत नाही. तर त्यांचे अभिन्नत्व असल्याचाच प्रत्यय येतो. 'जीवनशुद्धि' ही ४१ साली लिहिलेली त्यांची कथा उदाहरणार्थ पहावी. तेलंखेडीच्या तलावाच्या काठावर राहून कपडे धुणारी स्त्री हा अनुभव चित्रित करताना सहजच त्यांना वाटून जाते—

> "कसे विचित्र ! 'कपडे' स्वच्छ व्हावेत म्हणून ते 'जीवनांत बुडवायचे. पुनः त्यातले 'जीवन' घासून, पिळून, सुकवून घडी घालून नाहीसे करावयाचे—अशाने 'वस्त्र' स्वच्छ होते.
>
> आणि हा मनाचा मळ धुवायला काढला तर ? पण तो बुडवायचा कशात ? आणि सुकवायचा कशाने ?"

मला वाटते, वामनरावांना झालेले 'अर्थदर्शन' आणि त्यांचा 'अनुभव' हे या ठिकाणी अविभाज्य वाटतात व यामुळेच वाचकांच्या हृदयाची तार आपल्या कलात्मकतेने छेडूनहि त्यांच्या कथा वाचकांच्या अंतर्मनाला जागृत करतात—त्याला चालना देतात. मनुष्याला अंतर्मुख करणे हे कलेचे उद्दिष्ट असेल तर ते उद्दिष्ट वामनरावांच्या कथांनी साध्य केले आहे !

त्यांच्या कथेचे आणखी एक वैशिष्टच म्हणजे ती केवळ पांढरपेशांच्या सुखदुःखाच्या रिंगणातच फिरत नाही. दुःखी आणि दुर्दैवी जीवांबद्दलचा अयांग कळवळा त्यांच्या कथातून दिसतो. तद्वतच ग्रामीण जीवनाचेहि चित्रण करताना ती दिसते—ग्रामीण कथा ही आज एक टूम झालेली आहे. या कथातून ग्रामीण 'जीवना'पेक्षा ग्रामजीवनात आढळणारा (तसा तो कोणत्या जीवनात आढळत नाही ?) तऱ्हेवाईकपणा रंगविण्याचीच धडपड उघडपणे आढळून येते. 'जीवन-दर्शना'पेक्षा 'किस्से'कथनाचेच स्वरूप या तथाकथित कथांना प्राप्त होते.—ग्रामीण जीवनाचे सुरक्षित अंतरावरून प्रेक्षकाच्या भूमिकेतून दर्शन घेऊन केलेले—कधीकधी स्वप्नरंजनात्मकहि—चित्रण म्हणून 'ओले' न वाटता 'कोरडे'च वाटते. वामन-रावांच्या ग्रामीण कथा ह्या अशा नकली नसून असली आहेत. यापूर्वी उल्लेखि-लेली 'अतिथि देवो भव' ही कथा किंवा 'मजल' संग्रहातील 'लागेबांधे' किंवा 'बह्याड' ह्या कथा वाचताना ग्रामजीवन जिवंतपणे दृष्टीपुढे उभे ठाकते ! 'अतिथि देवो भव' मध्ये तर ग्रामीण (खेडवळ) भाषेचाहि वापर केलेला नाही. आणि तरीहि पैंकू—वायजेच्या माध्यमातून कास्तकारी संसाराचे, त्यांच्या आशा आकांक्षेचे, त्यांच्या भावभावनांचे रेखाटलेले चित्रण जितके वास्तव वाटते, तितके वास्तव मुद्दाम 'ग्रामीण' भाषेत भिजवून काढलेल्या अन्य लेखकांच्या कथातूनहि आढळत नाही. ग्रामीण कथेचे मोल हे त्या कथेच्या भाषेवर नसून तिच्याद्वारे प्रगट होणाऱ्या ग्रामजीवनाच्या जिवंतपणावर असते ही गोष्ट वामनरावांच्या कथा वाचताच स्पष्ट होते. 'लागेबांधे' आणि 'बह्याड' ह्या कथातून निवेदनाला फाटाच दिला आहे व केवळ संवादातून कथा फुलविली आहे. विशेषतः 'बह्याड' ह्या कथेत तर निवेदन मुळीच नाही. तरीहि त्या कथेतील संवादाने ग्रामजीवना-तील पतिपत्नीच्या मुग्ध प्रीतीचे जे दर्शन घडते ते मोठे मनोज्ञ वाटते—निरागस वाटते. कथानायक सरावन अन् त्याची पत्नी सगुना यांच्या जीवनातील निकोप प्रीतीचे क्षण त्यांनी रंगविले आहेत आणि ते रंगविताना त्यांनी कुठेहि शृंगाराचो

मर्यादा ओलांडली नाही.. आजच्या एखाद्या 'प्रथितयश' कथाकाराने तरुण पति-पत्नीच्या एकांत समयाचे हेच चित्र रंगविण्याचे ठरविले तर ?—

संयम हा चोरघडयांच्या अनेक पात्रांचा स्थायीभाव आहे. सूचकतेचा आश्रय घेऊन अर्थाची वलये निर्माण करण्याची हातोटी त्यांना साधलेली आहे. हा संसार जगताना सतत 'तोल' सांभाळण्याचे कौशल्य मनुष्याला अवगत असले पाहिजे, असेच जणू त्यांची पात्रे सुचवितात. आणि जिथे क्वचित हा तोल ढळतो, तिथे त्या ढळण्याचे शल्य त्यांच्या पात्रांना सतत बोचत राहते. 'मजल' संग्रहातील 'लाथ' ही अशीच एक 'बोच' चित्रित करणारी कथा—स्त्री आणि पुरुष याचे सान्निध्य हा वामनरावांच्या अनेक कथांचा विषय. पण ह्या सान्निध्याची परिणती 'विपरीता'त झाल्याचे कुठेच दिसत नाही ! ह्या सान्निध्यातहि कधीकधी 'नको' ते घडते—म्हणजे, पुरुषाच्या मनात सन्निध स्त्रीविषयी वासना निर्माण होते. आणि अशा वेळी त्याला सावध करण्याचे, स्वतःच त्या पुरुषालाहि सावरण्याचे कार्य स्त्रीला करावे लागते. किळस, सुमती, योगिनी इत्यादि कथांतून हेच आढळते. मूल्य रक्षणाची दक्षता वामनरावांच्या सर्वच स्त्री चित्रांनी दाखावली आहे. आपल्या दमेकरी पतीच्या सोयीस्कर संरक्षणाखाली परपुरुषाशी सबध राखणारी 'सुभी' (हिशेब चुकता) या कथाविश्वात नाही, असे नाही: पण हा अपसवध केवळ 'गरिबी'च्या आपद्धर्मातून निर्माण झालेला आहे—तो तिचा मनोधर्म नव्हे !—सुमीच्या तोंडून तिचा मुलगा हा तिच्या नवऱ्याच्या बीजाचा नसून दुसऱ्याच्या बीजाचा आहे हे ऐकूनहि तिच्याबद्दल घृणा वाटत नाही: उलट, तिच्याशी, तिच्या नवऱ्याच्या हयातीत नवऱ्याच्या थुंकीठशे भरलेल्या गोधडीवर रमणाऱ्या रावजीला, नवरा मरताच तिने उघडपणे स्वतःला घरी घेण्याची सूचना केली असता त्याने ती 'वायल्यासारखी' नाकारली हे वाचून त्याचीच चीड येते जबाबदारीला टाळून फक्त "मौज' लुटू इच्छिणाऱ्या रावजीच्या रूपाने वामनरावानी 'पुरुषी' मनोवृत्तीचे भेदक चित्रण केले आहे. सुभीच्याच भाषेत बोलावयाचे तर, 'जेव्हा मर्दासारखं वागण्याची पाळी येते तेव्हा माणूस लुगडयाच्या आड दडतो' हे त्यांनी इथे दाखवून दिले आहे. 'सुभी' म्हणूनच प्रामाणिक वाटते. सच्छील वाटते. मनाचा मोठेपणा आकर्षक वाटल्यामुळेच बाह्यतः कुरूप वाटणाऱ्या भीमाकाकीच्या एकनिष्ठ पतिप्रेमाचे (रंजन) आणि काळ्या—गावरानी खरजुल्या कुत्र्यासारखे ध्यान असणाऱ्या भैरवाच्या (डाग) जगावेगळ्या वागण्याचे वर्णन करताना त्यांच्या प्रतिभेला फुलोर येतो.

वामनरावांच्या कथेचे स्थूल स्वरूप शोधण्याचा हा प्रयत्न आहे. सविस्तर विश्लेषण करण्याचे हे स्थळ नव्हे व ही वेळहि नव्हे !—मराठी कथेला कथानकाच्या काचातून मुक्त करण्याचे मुख्य श्रेय वामनरावांना आधुनिक मराठी वाङ्मयाच्या इतिहासकाराने दिले आहे, ते अगदी योग्यच आहे. त्याच्या आरंभीच्या

कथांतून उदात्त...भव्य...दिव्य अशा ध्येयाला कवटाळणाऱ्या कांही व्यक्तींची चित्रे उमटली होती. आज वामनरावांची कथा अधिक वास्तववादी झाली आहे. म्हणूनच अधिक व्यापक झाली आहे. जीवनस्पर्शी झाली आहे. सखी, क्र्याद, संस्कार, घार इत्यादि त्यांच्या कथा मराठी कथासाहित्यात चिरंजीव ठरतील अशा योग्यतेच्या आहेत!–हिंदु-मुसलमानांच्या प्रश्नाचा सूचक उपयोग करून मानवातील विषमतेचे जे प्रत्ययकारी चित्र त्यांनी 'हादरा' या कथेतून रंगविले आहे, ते अप्रतिम आहे. आणि विशेष म्हणजे मानव्यावरील...श्रेष्ठ जीवनमूल्यां-वरील आपली अविचल श्रद्धा ढळू न देताहि कलात्मकतेची बूज राखण्याची अवघड कामगिरी त्यांनी मोठ्या कुशलतेने पार पाडली आहे! वि. स. खांडेकरांच्या जीवनवादी दृष्टीने त्यांच्यातील कलावंतावर मात केली असल्याचा आरोप काही टीकाकार करतात. वामनरावांवर असा आरोप करताना टीकाकाराला विचारच करावा लागेल. कारण जीवन आणि कला यांचा मनोहर समन्वय करण्यात त्यांनी पूर्णतः यश मिळविलेले आहे.

वामनरावांच्या भाषेबद्दलहि थोडेसे लिहिले पाहिजे. ते कमालीचे संयमी आहेत, हे यापूर्वी लिहिलेच. भाषेच्या संबंधात देखील त्यांचा हा संयम दिसून येतो. पूर्ण क्रियापदांचा उपयोग करून भाषेचा पसारा मांडण्यापेक्षा आवश्यक तेवढ्या शब्दांचाच उपयोग ते करतात. कमीतकमी शब्दात जास्तीत जास्त आशय पकडण्याची त्यांची धडपड असते. लोककथांच्या अध्ययनाने साधी व प्रवाही भाषा लिहिण्याचे कसब त्यांना अवगत झाले आहे. ग्रामीण कथांतून अनेक अर्थ-वाही ग्रामीण शब्द त्यांनी साहित्यिक मराठीच्या ओटीत टाकले आहेत. 'चांदण्यात कवड्या चमकाव्या तसा भैरव भकास हसला',–'ताकात मीठ घालावे तसे जीवनात सहज रीतीने चिमुटभर जिव्हाळा ओतून त्याची चव घ्यायची;'–प्रेम कधी, कुठं, कुणावर कसं जडतं हे कळत नाही. ही प्रेमाची गोजिरवाणी पाखरं आपल्या पाचूच्या चोचीत अमृतबिंदू घेऊन उडतात. या स्निग्ध मधुर बिंदूंचा अवसेक ज्या कुणावर होईल त्यांचं प्रेम जमतं.'–या सारखी अनेक चमकदार वाक्यं सहज लिहून जातात.–'त्या दिवशीहि असाच एका फुलझाडाचे पंख कापीत होतो'–अशा सारख्या वाक्यांनी सभ्यतेच्या विकृत कल्पनापायी निसर्गरमणीयतेला आपण कसे मुकत आहोत हे टीकाटिप्पणी न करता, ते सांगून टाकतात.

चोरघड्यांची कथा ही अशी आहे. सहज-सुंदर निकोप वृत्तीची. मानवी जीवनमूल्यांवर श्रद्धा ठेवताना कलात्मकतेलाहि वंचित न होणारी...प्रांजळ आणि रोखठोक. जीवनातील दंभाला झिडकारून मानवी जीवनाचे वास्तव स्वरूप चित्रित करणारी कथा वामनरावांनी आजवर लिहिली व आजहि ते लिहीत आहेत!–अशाच कथांची निर्मिती त्यांनी यापुढेहि करावी यापेक्षा माझ्यासारखा त्यांच्या कथांचा रसिक वाचक दुसरी कशाची अपेक्षा करणार?

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संमेलन–रौप्य महोत्सवी अधिवेशन पुसद

[संमेलनाच्या उद्‌घाटन प्रसंगी म्हटले जाणारे गीत]

"पुसद–महिमा"

विदर्भातली वैभवशाली पुसद ही नगरी
सम्मेलनी ह्या प्रस्तुत करतो कथा तिची न्यारी–
माहुर गढ तो कठिण भयंकर करि तिचे रक्षण,
दत्त स्वयंभू आणि रेणुका त्यावरि देवस्थान–
माहुर क्षेत्री परम पवित्री यात्रा वार्षिक भरते,
महानुभावी संत महात्मे दर्शन त्यांचे घडते–
कुलस्वामिनी दैवत ज्यांचे अनसूया बैसली,
भावुक सेवक म्हणती त्यांच्या नवसा ती पावली–
पूस नदीची धरण योजना समृद्धि साधन,
पावन होतिल गांवे किति तरी घेउनि तोय घन–
धरती ज्यांची असे अन्नदा कापुस ज्वारी देई
वन्य जमाती आल्या पुढती दैन्य गांवचे जाई–
शेतकऱ्यांची कळकळ येथे प्रगतीची मनी आस,
सदा रहावा भाग आपुला अग्रेसर हा ध्यास–
मधुर रसाळ द्राक्षे असती द्रव्य संपदा नगरीची
यत्न नवे अन् प्रयोग अविरत दाविति किमया धरतीची
या नगरीची पुण्याई की लोकमान्य आले,
'स्वराज्याची पंढरी' म्हणुनी संबोधन तिज केले–
महाराष्ट्राच्या परंपरेला शोभे जे भूषण
ते मंत्री मंडळी असती अग्रणी ह्या धरतीचे धन
नीति निष्ठा न्याय प्रीतिचे धडे जिथे घेतले,
त्या भूमीचे ऋण फेडाया अहोरात्र झिजले–
हा 'वसंत' फुलवी बहार इथल्या सकलांच्या जीवनी
अन कीर्ति परिमल देशविदेशी जाई दरवळुनी
दीड तपाने पुन्हा एकदा सम्मेलन भरले,
साहित्यिक अन् रसिक जनांचे दर्शन सकला घडले–
यशोमंदिरी 'यशवंता'चे दिव्य तेज तळपते,
असे धुरंधर वीर पुरंदर स्वागत त्यांचे येथे–
आगमनाच्या उत्साहाने स्फुरण पावली नगरी
कृपा लोभ हा असा असू द्या इच्छा अन्य न दुसरी

–सौ. इन्दुमती गन्धे
एम्. ए; बी. टी; विशारद

अनुक्रमणिका

पुसद संमेलनाचे अध्यक्ष–

प्रा. वामन कृष्ण चोरघडे

ले. श्रीकृष्ण विठ्ठल गंधे
एम्. ए; एस्. टी. सी; डी. पी. एड्; डी. जे.

कोणत्याहि साहित्यिक गटबाजीच्या आधीन न होता व कुठल्याही प्रकारचे डावे–उजवे मार्ग न अवलंबिता विदर्भ साहित्य संमेलनाच्या रौप्य महोत्सवी अधिवेशनाची रौप्य–माला महाराष्ट्राचे ख्यातनाम कथाकार आणि लोकसाहित्याचे निष्ठावंत पुरस्कर्ते प्रा. वामनराव चोरघडे यांच्या गळयात पडली यात त्यांच्या साहित्य–सेवेचा गुणगौरव होऊन योग्य व्यक्तीला, उशीराने का होईना, योग्य स्थान मिळाले याबद्दल सर्वांना आनंद वाटत आहे. प्रा. चोरघडयांचा हा बहुमान म्हणजे त्यांनी गेली तीस वर्षे एकनिष्ठेने जी साहित्य–सेवा केली तिचा हा गौरव होय.

प्रा. चोरघडे हे विदर्भाच्या मातीतले. त्यांचा जन्म नरखेडचा १६ जुलै १९१४ रोजी त्यांचा जन्म झालेला. शरीराने लालकिल्ला, उंचीने कुतुबमीनार, वृत्तीने आणि विचाराने सेवाग्राम आणि बुद्धीने वाराणसी ! असे जर त्यांचे वर्णन केले तर ते यथायोग्यच होईल. विदर्भात जन्म घेऊन त्यांनी मध्यप्रदेशाच्या छिंदवाडयाच्या जंगलात पहिली सात आठ वर्षे उनाडकीत घालविली. त्या जंगलातील गोंड–गोवारी या वन्यजातीबरोबर हे हिंडू–फिरू लागले; वाढू लागले. त्यामुळे मराठी बरोबरच गोंडी ही सुद्धा त्यांची जन्मभाषा झाली. वडील मालगुजारी करीत होते आणि त्याच जोरावर प्रा. वामनराव नरखेड–छिंदवाडा या भागात मुजोरी करण्यात दंग होते. आणि त्यांचा हा बालपणापासूनच जडलेला स्वभाव आजही कायम आहे. मात्र त्या मुजोरीत सत्याकरिता अट्टाहास असतो, शंभर टक्के तत्त्वनिष्ठा असते आणि प्रेमळ मनाचा ओलावा असतो हे विसरून चालणार नाही.

चांदा व काटोल या ठिकाणी "बालपणीचा काल सुखाचा" घालवून हायस्कूल शिक्षणाकरिता त्यांना नागपूरच्या पटवर्धन विद्यालयात प्रवेश घ्यावा लागला. त्यावेळी काही जिल्हयाची ठिकाणेच फक्त हायस्कूल शिक्षणासाठी होती.

प्रा. चोरघडे हे खऱ्या अर्थाने बुद्धिवान होते. आपल्या बालपणी त्यांनी बुद्धीची चमक अनेकवेळा दाखविली होती. मराठी चवथ्या वर्गाची आणि इंग्रजी चौथ्या वर्गाची परीक्षा उतीर्ण झाल्याबद्दल त्यांना शिष्यवृत्तीही मिळाली होती. मॅट्रिकला जरी त्यांनी मराठी हा आपल्या आवडीचा विषय घेतला होता तरी महाविद्यालयात मात्र त्यांना इच्छा असूनही मराठी विषय घेता आला नाही. उच्च शिक्षणाकरिता त्यांनी नागपूरच्या मॉरिस कॉलेजात (नागपूर महाविद्यालय) प्रवेश मिळविला. त्यावेळी मॉरिस आणि हिस्लॉप कॉलेजमधे मराठीचा तास हा बहुधा शेवटचा तास असे (त्यावेळी मराठीची आबाळ होत असे.) आणि अर्थशास्त्र, नागरिकशास्त्र, इतिहास, तर्कशास्त्र हे विषय घेणारे विद्यार्थी 'मराठी'चा तास अगदी शेवटचा असल्यामुळे तो विषय सहसा घेत नसत. हा शेवटच्या तासाचा कंटाळवाणा त्रास थांबविण्यासाठी वामनरावांनी आपल्या आवडत्या 'मराठी' विषयाला चाट दिली.

मॉरिस कॉलेजमधेच असताना ते शारदा मंडळाचे चिटणीस होते. त्यावेळी फडके, खांडेकर यांच्या कथा—कादंबऱ्यांचा काळ होता. नामवंत मराठी लेखक म्हणून त्यांची गणना होऊ लागली होती. महाविद्यालयीन जीवनातच ते साहित्याच्या भराऱ्या मारू लागले होते. त्यांनी पहिली लघुकथा त्याच काळात लिहिली. वक्तृत्वाचे धडेही त्यांनी त्याच जीवनात गिरविले. शारदामंडळामधे "फुलोर" नावाचा लेखसंग्रह त्यांनी प्रकाशित केला आणि प्रा. ना. सी. फडके यांच्या हस्ते तो प्रकाशित करून त्यावेळी नागपूरात त्यांनी मोठी धमाल उडवून दिली होती. प्रा. वामनरावांच्या साहित्यिक जीवनाचा पाया महाविद्यालयीन जीवनात भरला गेला.

१९३६ साली बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर प्रा. वामनरावांनी, मनात आणले असते तर त्यांना कुठलीही सरकारी नोकरी एका पायावर मिळाली असती. आणि इतर सरकारी अधिकारी पायरी पायरीने चढत चढत जसे वर जातात त्याप्रमाणे ते पण चढत चढत फार मोठ्या पदावर विराजमान झाले असते. पण सरकारी नोकरी करणे हा वामनरावांचा पिंडच नव्हता; ते खऱ्या अर्थाने तळमळीचे राष्ट्रभक्त, राष्ट्रसेवक होते; ते गांधीवादी होते, मानवतावादी होते; आणि पदवी प्राप्त केल्यानंतर ते तडक वर्धा येथील नवभारत विद्यालयात अध्यापक झाले आणि वर्धा ही त्यांनी आपली कर्मभूमि केली.

विद्यार्थी जीवनापासूनच त्यांचा ओढा काँग्रेसकडे आणि गांधीवादी राजकीय विचारसरणीकडे होता. १९३६ साली फैजपूर येथे पं. जवाहरलाल नेहरू यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या अधिवेशनास ते उपस्थित राहिले होते. १९३६ आणि

१९६४ ! पहिला स्वातंत्र्यपूर्वकाळ आणि दुसरा स्वातंत्र्योत्तर काळ ! त्यावेळी आजच्यासारखे कॉंग्रेस अधिवेशनास उपस्थित राहणे सोपे नव्हते ! ती सुळावरची पोळी होती; एका अर्थाने कॉलेज–जीवनाची होळी होती.

प्रा. वामनराव चोरघडे यांनी शिक्षकाचा पेशा पत्करला आणि तेच आपले जीवितध्येय निवडले. Be teachers; but don't look like teachers हे तत्त्व त्यांनी तंतोतंत अंगिकारले. शालेय जीवनात तर ते आदर्श, आवडते आणि आपुलकी निर्माण करणारे अध्यापक म्हणून प्रसिद्ध होते. वर्गात कित्येकवेळा ते राष्ट्रवीरांच्या आणि क्रांतिकारकांच्या कथा सांगत असत. "मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास, कठीण वज्रास भेदू ऐसे" अशी त्यांची असलेली वृत्ती अजूनही तशीच आहे.

अध्यापकाचे जीवन पत्करल्यानंतर त्याला प्रशिक्षण घेणे आवश्यक ठरते जवलपूरच्या स्पेन्स ट्रेनिंग कॉलेजमधून श्री. वामनराव १९४० साली बी. टी. परीक्षा उत्तीर्ण झाले. पुन्हा त्यांनी आपल्या आवडत्या नवभारत विद्यालयात अध्यापनाचे कार्य सुरू केले. मराठी हा त्यांचा अत्यंत आवडीचा विषय ! त्या विषयात ते १९४१ साली एम्. ए. झाले. त्यानंतर १९४२ च्या राष्ट्रीय आंदोलनात प्रा. चोरघडे हिरीरीने उतरले. त्यावेळी पेटलेल्या यज्ञकुंडात त्यांनी उडी टाकली. इतर अनेक देशभक्तांबरोबर त्यांना तुरुंगात जावे लागले. तुरुंगात गेल्यानंतर श्री. वामनरावांना नवीन दृष्टि मिळाली, तुरुंगात जाण्यापूर्वी ते बराच काळ भूमिगत होते; या काळात त्यांनी खरे जीवन उपभोगिले, अनेक हालअपेष्टांना तोंड दिले. तुरुंगातून १९४४ साली सुटल्यानतर जनतेला नवीन वामनराव दिसले, आपले अनुभव त्यांनी सर्वांना सांगितले; ते ऐकण्यासारखे होते. त्यात गर्व नव्हता पण एक प्रकारचा निश्चय होता; आत्मप्रौढी नव्हती पण सत्य सांगण्याची तळमळ होती.

१९४४ सालानंतर शिक्षक वामनराव हे प्राध्यापक झाले. वास्तविक ते अध्यापनाचेच कार्य करीत होते; पण महाविद्यालयीन वातावरणात त्यांच्या प्रतिभेला भरारी मारण्यासाठी मोठा वाव मिळाला; क्षेत्र मोठे झाले; कार्याचा परिसर वाढला; बौद्धिक उंची जास्त असलेले विद्यार्थी जवळ आले. वर्धेच्या कॉमर्स कॉलेजात ते प्राध्यापक झाले. आणि त्याचवेळी मराठी बरोबरच ते अर्थशास्त्रातही एम्. ए. झाले.

वर्धा हे जरी गांधीजीमुळे आणि सेवाग्राममुळे मोठे गाव झाले असले तरी प्रा. वामनरावांच्या बहुरंगी नि बहुढंगी कर्तृत्वाला ते तोटकेच होते. साहित्य, राजकारण आणि सांस्कृतिक कार्यक्रम हे प्रा. वापूसाहेबांचे अत्यंत आवडीचे विषय.

त्यासाठी नागपूरला प्रस्थान ठेवणे आवश्यक होते. १९४९ साली नागपूर येथील कॉमर्स कॉलेजात त्यांची उपप्राचार्य म्हणून नेमणूक झाली आणि आजतागायत ते त्याच जागेवर विराजमान आहेत.

प्रा. चोरघडे यांचे जीवन अष्टपैलू आहे. साहित्य क्षेत्रात जसे ते आघाडी-वरचे सैनिक आहेत तसेच इतर क्षेत्रातही त्यांनी अनेकवार आघाडी मारली आहे. ते एक कुशल संघटकही आहेत. नागपूर विद्यापीठ क्षेत्रातही त्यांनी बहु-मोल अशी कामगिरी केली आहे. विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळापासून तो एका लहानश्या Board of Studies च्या सभासदापर्यंत ते नागपूर विद्यापीठात संचार करीत होते. एका विशिष्ट ध्येयवादाने प्रेरित झाल्यानंतर कोणत्याही तत्त्वाकरिता झगडण्यास ते कधीही कोणलाही हार जाणार नाहीत.

प्रा. चोरघडे हे राष्ट्रीय वृत्तीचे साहित्यसेवक असल्यामुळे स्वराज्यात त्यांना अनेक मानाची स्थाने मिळाली आहेत. अनेक सरकारी समित्यावर त्यांची नेमणूक झाल्यामुळे त्यांना त्या ठिकाणी स्वतःचे कर्तृत्व दाखविण्याची खरी संधी मिळाली आहे. त्यांच्या सर्वांगीण प्रतिभेचा फुलोरा यामुळे चांगलाच फुलला आहे. महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक समिति, लोकसाहित्य समिति, नाट्य-परीक्षण समिति, युद्धप्रयत्न प्रचार समिति, वाचनालयासाठी पुस्तक निवड समिती इत्यादि अनेक साहित्यिक आणि सांस्कृतिक समित्यावर ते असल्यामुळे त्यांचे यथायोग्य मार्गदर्शन सर्वांना उपयोगी पडते. तसेच दिल्ली येथील National Book Trust या संघटनेच्या मराठीच्या सल्लागार समितीवर ते आहेत. त्याच प्रमाणे नागपूर आकाशवाणीच्या ग्रामीण कार्यक्रम सल्लागार समितीचे ते एक सदस्य आहेत.

प्रा. चोरघडे हे एक आदर्श मित्र आहेत. त्यांचा मित्रपरिवार फार मोठा आहे. मंत्र्यापासून तो एखाद्या साध्या कारकुनापर्यंत त्यांचे जीवश्चकंठ मित्र आहेत. त्यांच्या मित्रमंडळीत नानाप्रकारचे, नानाविध लोक आहेत. त्यांत कवि आहेत, खेळाडू आहेत, उदीम करणारे आहेत, नाटककार आहेत, चित्रकार आहेत, संगीतज्ञ आहेत, पहेलवान आहेत तसे काडी पहेलवानही आहेत. त्या सर्वांवर त्यांचा सारखाच लोभ आहे.

वामनरावांना गप्पागोष्टीचे आणि पानतंबाखूचे व्यसन आहे. वामनराव गप्पागोष्टीत फार रंगतात. गप्पागोष्टी करतांना रात्र केव्हा संपते हे सुद्धा पुष्कळ वेळा समजत नाही. किमान घातलेले मीठा पान म्हणजे वामनरावांची स्फूर्ति होय. त्या पानाची लज्जत चघळत चघळत वामनरावांच्या तोंडून जी गप्पांची मैफल रंगते ती खरोखरीच अद्वितीय असते.

वामनरावांची साहित्य सेवा फार मोलाची आहे. १९४६ साली पुसद येथे झालेल्या विदर्भ साहित्य संमेलनाचे वेळी त्यांच्या 'प्रस्थान' व 'पाथेय' या दोन कथा संग्रहांना 'सरस्वती पारितोषिक" मिळाले होते. तसेच मध्यप्रदेश शासनाने सुद्धा १९५५ साली "प्रदीप" या कथा संग्रहाला राज्यपुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला होता.

प्रा. वामनराव हा मानवतावादी माणूस आहे. गरीबीतून आणि हाल-अपेष्टांतून त्यानी आजचे जीवन उभे केले आहे. त्यांचा हा मानवतावाद त्यांच्या साहित्यकृतीतून वारंवार उचळलेला आपणास पहावयास मिळतो. वामनरावांची साहित्यसंपदा फार मोठी आहे. त्यांनी आतापर्यंत जवळ जवळ अठ्ठावन पुस्तके तरी लिहिली आहेत. त्यांत कथासंग्रह, लोककथा, प्रबंध, चरित्रे व इतर अनेक प्रकार समाविष्ट आहेत. प्रा. वामनराव हे जीवनाचे उपासक आहेत. पण ते जीवनासाठी कला न मानताना कलेसाठीच कला मोठ्या निष्ठेने मानतात.

सत्य, शिव आणि सुंदर हे ते अभिन्न मानतात. या महान तत्त्वांचे अधिष्ठान कोणत्याही लेखकाला आवश्यक आहे असा त्यांचा निश्चय आहे. प्रा. वामनराव जेव्हा जेव्हा स्वाक्षरी देतात तेव्हा तेव्हा ते मागणाऱ्याना उपदेश करायलाही कमी करीत नाहीत. "गीताई पाठ करा", "सत्यं, शिवं, सुंदरम्" "हे जीवनाचे ध्येय माना," "मानवतेच्या दृष्टिकोनातून समाजाकडे पाहा" इत्यादि त्यांची वाक्ये अनेकांना मार्गदर्शन करीत असतात. आणि म्हणून त्यांच्या लिखाणाचे ध्येय श्री ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटल्याप्रमाणे,

दुरिताचे तिमिर जावो । विश्वा स्वधर्म सूर्यो पाहो ।
जो जें वांछिल तो तें लाहो । प्राणि जात ।

हे आहे आणि यातच त्यांच्या साऱ्या लिखाणाचे सार आहे.

पुष्पावती नव्हे पूषासद

—ले: ज. रा. कस्तुरे, दिग्रस

लो टिळकांनी "स्वराज्याची पंढरी" या नावाने गौरविलेल्या पुसद नगरीत १९४६ नतर १९६४ साली दिवर्भ साहित्य संघाचे यंदाचें रौप्यमहोत्सवी अधिवेशन भरत आहे ही गोष्ट अत्यंत महत्वाची असून पुसदवासियांच्या दृष्टीने तर चिरस्मरणीय राहील यात संशय नाही.

पुसद नगराचा उल्लेख अनेक लोक पुष्पावती या प्राचीन. नावाने करीत असतात. परंतु पुष्पावती ह्या नावाला प्रत्यक्षपणे पौराणिक किंवा ऐतिहासिक स्वरुपाचा आधार उपलब्ध नाही. केवळ उच्चार साम्यतेसाठीच पुसदचे पुष्पावती असे रुप करण्याची पद्धति रूढ झाली असावी व तीच आज चालू असावी असे वाटते. त्यामुळे पुसद नगरीचे प्राचीन कालात अस्तित्व होते काय ? असल्यास तिचे त्यावेळचे नाव कोणत असणे शक्य आहे. या संबंधी विचार करीत असताना सुचलेली एक कल्पना योग्य त्या आधारासह मांडण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

पुसद जवळून वाहणाऱ्या नदीचे नाव पूस असे आहे. किंवहुना या नदीच्या नावावरूनच गांवाला/ पुसद असे नांव मिळाले ही वस्तुस्थिति आहे. पूस नदी पुराणप्रसिद्ध आहे. पद्मपुराणांतर्गत "वत्सगुल्म महात्म्य" या ग्रंथाच्या ३६ व्या अध्यायात पूस नदीच्या उत्पत्ति विषयी सविस्तर माहिती सापडते; ती अशी—

प्राचीन वत्सगुल्म (आजचे वाशीम) नगराच्या जवळ साधारणत: २ मैल (गव्यूति:) अंतरावर वसिष्ठाश्रम होता. महर्षि वसिष्ठ तेथे तपश्चर्या करीत होते. वसिष्ठांच्या उग्र व तीव्र तपश्चर्येमुळे इंद्राला अशी भीति पडली की शंभर यज्ञाच्या पुण्याने मी मिळविलेले ते पद नष्ट होईल. म्हणून महर्षि वसिष्ठांच्या तप:साधनेत विघ्न उत्पन्न करण्याचे ठरवून त्यांचा तेजोभंग करण्यासाठी उर्वशी, मेनका रंभा घृताची (व. म. ३६।४७) इत्यादि अप्सरांना त्याने पाचारण केले. इंद्राची आज्ञा ऐकून जमलेल्या पैकी एकाहि अप्सरेला ते काम स्वीकारण्याचे धैर्य झाले नाही. अखेर पूषा नांवाची एक अप्सरा हे काम स्वीकारण्यास तयार झाली. इंद्राने अनेक प्रकारची सामुग्री सिद्ध करून तिची वसिष्ठाश्रमाकडे रवानगी केली. तेथे आल्यावर पूषेने आपल्या लावण्याने, नृत्यगीताने आणि श्रृंगारिक हावभावांनी महर्षि वसिष्ठांचे मन विचलित करण्याचे अनेक प्रयत्न केले. तथापि हृदये तस्य विकारो न मनागभूत् (व. म. ३६।८१)

अनुक्रमणिका

या प्रमाणे वशिष्ठांच्या मनात कामविकार उत्पन्न करून तपश्चर्येपासून परावृत्त करण्याच्या कामी पूपेला थोडेहि यश मिळू शकले नाली. उलट आपल्या तपश्चर्येत एक अप्सरा विघ्न उत्पन्न करीत आहे अशी वशिष्ठांना अंतर्ज्ञानाने जाणीव झाली व त्यांनी त्या अप्सरेला शाप दिला "तूं नदी होऊन वाहत जाशील" (व. म. ३६।१०१). पण पूपेने वशिष्ठांचे पाय धरले व याबाबत सर्व जबाबदारी इंद्राची आहे म्हणून उःशाप मिळावा अशी तिने त्याची अत्यंत दीनवाणीने प्रार्थना केली. त्यावरुन पूपा अप्सरेवर दया करून वशिष्ठांनी तिला उःशाप दिला. "येथून ८ योजने नदी रूपाने वाहत गेल्यावर तुझा प्राणहितेशी संगम होईल तेव्हां तू शापमुक्त होऊन पूर्वस्वरूप व पूर्वस्थान प्राप्त करशील" (व. म. ३६।१०८)

वशिष्ठांनी शापिलेली ही पूपा अप्सरा म्हणजे पुसदजवळून वाहणारी पूपा किंवा पूस नदी होय. हिच्या ८ योजन प्रवाहाच्या कांठावर अनेक लहान मोठी गांवे वसलेली असून त्यापैकी पुसद हे सर्वात मोठे गांव आहे. पुसदच्या आसपास या नदीच्या कांठावर ११ महादेवाची मंदिरे होती अशी आख्यायिका आहे यापैकी पंचलिंगेश्वर, हाटकेश्वर, खोलेश्वर, जागेश्वर इत्यादि प्रसिद्ध असून कांही अज्ञात आहेत. यावनी आक्रमणाच्या कालात कदाचित् ही मंदिरे जमीनीत गाडली गेली असतील. कालांतराने प्रगटहि होतील असा संशय घ्यावयास जागा आहे कारण कांही वर्षापूर्वीच खोलेश्वराच्या जवळच भूगर्भात एक पिंड सापडलेली असून एक लहानसे मंदिरहि उभारण्यात आलेले आहे. असो.

पूपा नदीच्या कांठावर असलेल्या आजच्या पुसदला प्राचीन काळी पूपासद (पूपेवर वसलेले) असे पौराणिक नांव असावे असे म्हणता येते. कालांतराने गुरे+राखी=गुराखी या नियमानुसार पूषा+सद तील मधल्या पा चा लोप होऊन आजचे पुसद हे नांव बनले असावे असे मानावयास आधार आहे त्यामुळे पुसद नगराचे प्राचीन पौराणिक नांव **पुष्पावती** नसून **पूषासद** असावे असे निश्चयपूर्वक म्हणता येते.

पुष्पावतीच्या परिसरात

—ज. व्यं. पल्लेवार, अॅडव्होकेट

पर्वतराजींच्या कुशीत दडलेले, पूस नदीने कवटाळलेले आणि लोहमार्गाने १०० मैल दूर फेकलेले शहर पुसद (पुष्पद) म्हणजेच पुष्पावती. हे पुसद तालुक्याचे प्रमुख ठिकाण असून याचा परिसर पूस नदीच्या उभय तीरावर पसरलेला, १२८० चौरस मैलाचे क्षेत्र व्यापणारा आहे. यात ३२६ खेडी असून २,६५,०९९ लोकसंख्येचा परिवार आहे.

पुसद तालुक्याला वैनगंगेने सुमारे १५० मैलाचा वेढा दिलेला आहे. असे सांगतात की पैनगंगेचा प्रवाह थेट पूर्वेकडे जात असतांना परशुरामाने (जमदग्नि-पुत्र) आपल्या बाण संधानाने हा प्रवाह उत्तरेकडे वळविला. ज्या ठिकाणी हा बाण शिरला होता त्यालाच 'सहस्रकुंड' म्हणतात. हे प्रेक्षणीय स्थळ जेवली गावाजवळ असून तेथे एक धबधबा व कुंड आहे. या ठिकाणी आता जलविद्युत केन्द्र व जलसिंचन योजना आखण्यात आली आहे.

अयोध्येचा राजा राम नंदीग्राम (नांदेड) येथे जात असताना पुसद तालुक्यातील औदुम्बर क्षेत्री (आताचे उमरखेड) आल्याचे सांगतात. या तालुक्याच्या दक्षिणपूर्व भागातील किनवट जंगल हा दंडकारण्याचा भाग असावा असे कांहींचे मत आहे. भारताचा महाकवि भवभूति हा याच तालुक्यातील 'उमरखेड' येथील मूळचा असावा व तेथून तो पद्मपुरास गेला असावा असे वऱ्हाडचे इतिहासकार कै. श्री. यादव माधव काळे यांचे मत आहे.

सुप्रसिद्ध परमार राजा भोज यांच्या भावाचे राज्य पुसद भागावर असावे असे डोंगरगाव येथे सापडलेल्या शिलालेखावरून वाटते. उमरखेड येथे मशिदीच्या प्रवेशद्वारापाशी नागरी लिपीत लिहिलेला एक शिलालेख आहे त्यातील कांही अक्षरे दिसतात ती अशी "शके १५२८ कुजवा"

पुसद तालुका प्रथम पश्चिम वऱ्हाड जिल्ह्यात होता. पण १८६४ मध्ये वणी जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आला व त्यानंतर १८७० ते १९०५ पर्यंत वाशीम जिल्ह्यात राहून पुन्हा वणी म्हणजे यवतमाळ जिल्ह्यात आला. ऐतिहासिक परंपरेबरोबरच या विभागाला कांही साहित्य परंपरा आहे. इ. स. १८६८ मध्ये प्राकृत सप्तशति हा ग्रंथ संतकवि उत्तमश्लोक याने लिहिला. त्याचे प्रकाशन उमरखेड येथील उत्तमश्लोक प्रकाशन मंडळाने केले. इंग्रजी राजवटीत रसिक-वृंदांना मोहून टाकणारे विष्णुकवि यांनी रचिलेल्या काव्याचे दोन खंड यवत-माळच्या शारदाश्रमाने प्रसिद्ध केले आहेत. ओवीबद्ध रामायण व गीतेची

अनुक्रमणिका

समश्लोकी लिहिणारे अष्टभवमृताचे लेखक श्री. निवास बाबा १०८ संताचे ओवीबद्ध चरित्र लिहिणारे अनंत कवि तसेच कवि गुडाकेश आणि गोपिका स्वयंवराचे लेखक महानुभाव कवि शिवराम किंकर यांनीहि साहित्य परंपरेत भर टाकली आहे. विशेष उल्लेखनीय म्हणजे कवि शिवराम हे हरकर वंशातले होते. त्यांचे वंशज आजही आहेत. पुसद तालुक्यातील वेणी या गावी कवि शिवराम याची समाधी आहे.

पुष्पावतीच्या परिसराचे प्राचीनत्व पटविणारी अनेक देवस्थाने या तालुक्यात विखुरलेली आहेत. उदा. शेंबाळेश्वर (शेंबाळपिंप्री) मच्छिन्द्रनाथ (बोरी मच्छिन्द्र) साचालदेव (धानोरा) केदारलिंग (पांढुर्णा) पुष्पेश्वर (कुलसावंगी) संगमेश्वर (हिवरा) कान्हेवर (कान्हा) विभाडकेश्वर (भंडारी) तसेच उमरखेड येथील चिन्मयानंदाचा मठ व ऐकनाथ मंदिर व पुसद येथील बुवांची समाधी व तेथे असलेले हेमाडपंती देउळ तसेच आखाडा वार्डातील भग्नावस्थेत असलेले हेमाडपंती देवालय, नदीकिनारी असलेले हरकेश्वर, करूणेश्वर व खोलेश्वर वगैरे देवालये याची साक्ष पटवतील. खोलेश्वर हा बालाजी मंदिरात असून या मंदिरात कोरलेल्या अनेक मूर्ति उत्कृष्ट शिल्पकलेची कल्पना देण्यास समर्थ आहेत. याहीपेक्षा महत्वाचे देवस्थान म्हणजे पुसद येथील धनकेश्वराचे मंदिर होय. हा या गावातील धनिकांचा ईश्वर बरेच दिवस भूमिगत होता. व तो आता आपल्या प्राचीन व अर्वाचीन शिल्पकलेचा सांधा बनला आहे.

पुष्पावतीच्या परिसरात लक्ष्मीचे वरदान आहे असे म्हणतात. तसा तिचा लौकिकही आहे. परंतु लोकांच्या राहणीत व वागणुकीत लक्ष्मीचे प्रतिबिंब दिसत नाही, कारण येथील लोक साधी राहणी अधिक पसंत करतात. येथील लोक भाविक असल्याने धार्मिक क्षेत्रात आघाडीवर आहेत. जनता जनार्दनाच्या हृदय कोंदणात शोभणारे गाडगे महाराज, मुंगसाजी महाराज, ,कैकाडी महाराज, किसन महाराज, गौमकाचौंडी महाराज, शंकराचार्य व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज या सर्वांनी या भूमीला भेट देऊन पावन केले आहे. त्या त्या वेळी धनिकाचे दानशूरत्व प्रकर्षाने प्रकट झाले आहे. साहित्य क्षेत्रात यवतमाळ जिल्ह्यातील कांही व्यक्तींनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सर्वांचाच नामनिर्देश करणे अशक्य असल्याने त्यांचा मान राखून पुढील नामावली देता येईल. सर्वश्री डॉ. य. खु. देशपांडे, डॉ. मा. गो. देशमुख यवतमाळ जिल्ह्यातील मराठीचे पहिले पीएच्. डी, श्री. बालशंकर देशपांडे, द. वा. महाजन, वा. ना. देशपांडे, द. चिं. सोमण. रामजोशी, कवि नाना हूड, पां. श्रा. गोरे, आप्पासाहेब पारवेकर, भाऊसाहेब पाटणकर, दत्तोपंत व्यवहारे, कथालेखक श्री. शरच्चंद्र टोंगो, व बाळ देशपांडे हे उल्लेखनीय आहेत. पत्रकार म्हणून सर्वश्री जवाहरलालजी दर्डा, टी. जी. देशमुख, विश्वनाथ सारस्वत, ब. न. एकबोटे, सुधाकर नाईक, शरद आकोलकर,

हरीभाऊ जामुनकर, मायादेवी भालचंद्र यांची नावे सर्वतोमुखी झालेली आहेत. सन १९४६ साली पुसद येथे विदर्भ साहित्य संमेलनाचे दहावे अधिवेशन श्री. पु. य. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. पुसद तालुक्यातील विडूळचे डॉ. माधव गोपाळ देशमुख हल्ली नागपूर महाविद्यालयाचे प्राचार्य हे संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते. या सम्मेलनाला विदर्भातील त्यावेळचे बहुतेक प्रथितयश साहित्यिक तर उपस्थित होतेच, पण त्याशिवाय प्रा. ना. सी. फडके हेहि संमेलनासाठी मुद्दाम आले होते. हे संमेलन त्यावेळी फारच गाजले.

राजकीय क्षेत्रात या तालुक्याने बरीच आघाडी मारली आहे. सन १९३४ चा जंगल सत्याग्रहाचा ओनामा याच गावी झाला. त्यामुळे पुसदला अद्वितीय स्थान मिळाले. भागानगर सत्याग्रहाचे केंद्र या ठिकाणी उघडण्यात आले होते. त्यामुळे ते स्थान अधिकच उंचावले. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे" हा मूलमंत्र देण्यासाठी लोकमान्य टिळक येथे आले होते. त्याच प्रमाणे स्वातंत्र्य-वीर सावरकर यांनी येथे वीरगर्जना करून नवचैतन्य निर्माण केले. भारताचे सध्याचे संरक्षण मंत्री व महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनीहि दोन वेळा भेट देऊन कॉंग्रेस संघटनेला बळकटी आणली. राज-कारणातील उज्वल परंपरा चालू ठेवण्याचा अग्रमान सध्याचे महाराष्ट्राचे मुख्य-मंत्री श्री. वसंतराव नाईक यांना मिळाला आहे. त्यामुळे पुसदला भारतीय इतिहासात मानाचे स्थान प्राप्त झाले आहे.

शैक्षणिक क्षेत्रात या तालुक्याला बरेच महत्व प्राप्त झाले आहे. पुसद येथे सन १९३९ मध्ये कोषटवार विद्यालय स्थापनेने शैक्षणिक क्षेत्रातील पहिले प्रगतीचे पाउल पडले त्यानंतर सन १९५५ मध्ये लोकहित विद्यालय व सन १९५६ मध्ये शिवाजी विद्यालय व सन १९५७ मध्ये शासकीय कन्याशाळा निघाल्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात झपाट्याने प्रगती झाली आहे. शैक्षणिक क्षेत्रातील ही प्रगती लक्षात घेऊन श्री. वसतराव नाईक यांच्या परमपूज्य पिताजींच्या प्रेरणेने सन १९६१ मध्ये फूलसिंग नाईक महाविद्यालय स्थापन झाले आहे तेथे आर्टस् व कॉमर्स विभागाचे पदवीपर्यंतचे शिक्षण मिळण्याची सोय झाली आहे. १९६४ मध्ये तेथे ६०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

सर्वसामान्य विकासाच्या दृष्टीनेही पुष्पावतीचा परिसर बराच विकसित झाला आहे. वाहतुकीची साधने, विद्युत्तीकरण, कृषि उत्पादन योजना, व सहकारी संस्था, पंचायत समिती व ग्रामपचायती या सर्व विकासाला कारणीभूत आहेत. व एकेकाळी पुसत पुसत यावे लागत असलेल्या या पुसद शहराला आता आगळे स्वरूप प्राप्त झाले आहे.

विदर्भ साहित्य संघ

स्थापना : परिषदा : आणि अधिवेशने

—गु. ना. काटकर

प्राचीन विदर्भ

राजशेखर विरचित बालरामायणात एका प्रसंगी राम सीतेसह खालील प्रदेश पाहात पाहात आकाशमार्गे लंकेहून अयोध्येस जात असताना सीतेस म्हणतात—

"यत्क्षेम त्रिदिवायवर्त्म निगमस्याङ्गंच यत्सप्तमम्
स्वादिष्टं च यदेक्षवादपि रसाश्चक्षुश्च यद्वाङ्मयम्
तद्यस्मिन्मधुरं प्रसादि रसवत् कान्तंच काव्यामृतम्
सोऽयंसुभ्रू पुरो विदर्भविषय: सारस्वती जन्मभू :"

म्हणजे—

"हे सीते, स्वर्गाचा सुखकर मार्ग, वेदाचे सातवे अंग, उसाच्या रसापेक्षाही मधुर व शद्बरूपी नेत्रच की काय असे सुमधुर प्रासादिक सुरस व मनोहर काव्यमृत ज्या देशात आहे व जो देश विद्येचे माहेरघर आहे, असा हा विदर्भ देश पुढे पाहा."

यावरून विदर्भ हा अति प्राचीन प्रदेश, प्राचीन काळापासून सरस्वतीचे माहेरघर म्हणून ओळखला जातो. यांचा इतिहास अति उज्वल आहे. विदर्भालाच पूर्वी ऋथकौशिक, भोजकट, वर्घातट, महाराष्ट्र अशा संज्ञा दिलेल्या आढळतात. त्याचा विस्तार उत्तरेस अमरावतीपासून दक्षिणेस प्रतिष्ठान पर्यंत होता.

विदर्भ साहित्य संघ—जन्मकथा

इ. स. १९०५–०६ मध्ये पुणे येथे महाराष्ट्र साहित्य परिषद् नावाची संस्था सर्व मराठी भाषिक साहित्याच्या अभिवृद्धीसाठी उदयास आली. "महाराष्ट्र साहित्य संमेलने" या नावाने तिची वार्षिक अधिवेशने पुण्याच्या आसमंतात होत. इ. स. १९२० पर्यंत तिचे हात अमरावती, नागपूर, मराठवाडा, खानदेश, मुंबई या भागात पोहचले नव्हते. म्हणून मराठी प्रदेशात विविध साहित्य संस्था हळूहळू उदयास आल्या. राजकीय अलगता हेही एक कारण त्या मागे होते.

अनुक्रमणिका

विदर्भात राहणाऱ्या मराठी भाषिकांकरिता एका साहित्य संस्थेची अपरिहार्यता आहे हे ओळखून कविभूण बळवंत गणेश खापर्डे यांनी विदर्भ साहित्य संघाची स्थापना केली. त्या संबंधात ते सांगतात–

"इ. स. १९२२ सालची गोष्ट. पुण्याला एक कविसंमेलन झाले. त्या संमेलनाला मी अमरावतीहून मोठ्या जिज्ञासेने गेलो होतो. संमेलन उत्कृष्ट झाले. एकापेक्षा एक सरस कविता ऐकताना स्वर्गीय सौख्य उपभोगावयास मिळाल्यासारखे वाटले. त्याचा माझ्या मनावर मोठा परिणाम झाला. असे वाङ्मयाचे आनंदोत्सव (मेळावे) आपल्या वऱ्हाडातही का होऊ नयेत असे तीव्रतेने जाणवू आगले. ह्या दिव्य आनंदाकरिता मला पुण्यापर्यंत धाव घ्यावी लागली. वऱ्हाडचे किती लोक इतक्या दूरवर येणार ? पुण्या मुंबईची साहित्यिक मंडळीही दूरवर कितीसे कार्य करणार ! तेव्हा विचार केला की वऱ्हाडातही वाङ्मयीन सोहाळे व्हावेत. अमरावतीला परत आल्यावरोबर त्या प्रयत्नाला मी लागलो."

अमरावतीस परत आल्यावर श्री. अण्णासाहेव खापर्डे यांनी (१) सर्वश्री दादासाहेव खापर्डे, नानासाहेव बामणगावकर, वीर वामनराव जोशी, प्रि. दा. के. ओक, मीमांसाभूषण पु. वा. साठे, वा. सं. गडकरी, ना. प्र. हिरूरकर यांच्याशी विचार विनिमय करून प्रोत्साहन व सहकार्य मिळविले. नंतर यवतमाळहून लो. ना. मा. श्री. उर्फ बापूजी अणे, डॉ. य. खु. देशपांडे, स. हृ. वल्लाळ, पृथ्वीगीर हरिगीर, वा. ना. देशपांडे, वुलढाण्याहून या. मा. काळे, खामगावहून श्री. कृ. तथा अण्णासाहेव कोल्हटकर (२) नागपूर विभागातून प्रि. केशवराव ताम्हणे, म. म. कृष्णशास्त्री घुले, डॉ. के. ल. दप्तरी, श्री. गो. स. देव, कविवर्य आनंदराव टेकाडे, श्री. रा. वोवडे, ज. के. उपाध्ये, डॉ. वा. वि. मिराशी, श्री. विश्वनाथराव केळकर, श्री. गोपाळ अनंतराव ओगले, चंद्रपूरचे लोकाग्रणी बळवंतराधव तथा बाबासाहेब देशमुख, वर्ध्याचे श्री. ना. के. वेहरे व मनोहरपंत देशपांडे, (३) खानदेश विभागातून काव्यरत्नावलीकार नारायण नरसिंह फडणीस कविवर्य दु. आ. तिवारी, श्री. सोनाळकर, कवि वलवन्त, व (४) मराठवाडा विभागातून न्यायमूर्ति श्री. केशवराव कोरटकर, न्या. मू. पळणिटकर, श्रीमंत वामनराव नाईक व दिगंवर गोविंद विंदू, औरंगावादचे श्री. दत्तवुवा पद्माकर व कवि कोरेवल, नांदेडचे श्री. दे. ल. महाजन, प्रभृतीशी पत्रव्यवहार केला. सर्वांनी त्या कल्पनेचे आनंदाने व उत्साहाने स्वागत केले.

विदर्भातील साहित्य प्रेमी व्यक्तींचे पहिले संमेलन

कविभूपण व. ग. उर्फ अण्णासाहेव खापर्डे यांच्या प्रेरणेने विदर्भाच्या कक्षेत येणाऱ्या चारही विभागांतील साहित्य प्रेमी व्यक्तींचे व साहित्यिकांचे पहिले

अनुक्रमणिका

संमेलन अमरावती येथे दि. १३ व १४ जानेवारी १९२३ रोजी भरले. दि. १४ जानेवारी १९२३ रोजी "विदर्भ साहित्य संघ" या नावाने संस्था स्थापन करावी असा खुल्या अधिवेशनात ठराव झाला. व संघाची पहिली कार्यकारिणी निवडण्यात आली. अध्यक्ष न्यायमूर्ति केशवराव कोरटकर, उपाध्यक्ष लो. ना. मा. श्री-अणे, श्री. कृ. कोल्हटकर, या. मा. काळे व वा. ग. खापर्डे, बापूसाहेब भवाळकर, ना. न. फडणीस, सरचिटणीस कविभूषण व. ग. खापर्डे व उरलेल्या तीन विभागाकरिता तीन चिटणीस नागपूर–विश्वनाथराव केळकर, खानदेश–दुर्गाप्रसाद तिवारी, मराठवाडा–गणपतराव मोलेकर असे निवडण्यात आले. श्री. शेवडे वकील यांची कोषाध्यक्ष म्हणून निवड झाली. मुख्य कार्यालय अमारावतीला ठेवण्यात आले.

परिषदांचे युग–

विदर्भ साहित्य संघाच्या निर्मिती नंतर पहिली सहावर्षे म्हणजे १९२९ पर्यंत जी अधिवेशने झाली त्यांना "परिषदा" असे नामाभिधान देण्यांत आले होतें. या सहाही परिषदांना असामान्य प्रतिभेचे साहित्याचार्य लाभले होते. तरी पण संघाध्यक्ष श्री. न्यायमूर्ति कोरटकर व सरचिटणीस श्री. कविभूषण खापर्डे हेच होते. या परिषदामुळे विदर्भात साहित्य, संस्कृति विषयक जागृतीचे कार्य त्या अगोदरच्या पन्नास वर्षात जे झाले नव्हते ते केवळ पाच सहा वर्षात केले.

मध्यतंर–

पुढे कविभूषण ब. ग. खापर्डे बनारस विद्यापीठात मराठीचे प्राध्यापक म्हणून गेले व सन १९२९ ते सन १९३६ पर्यंत ही वार्षिक अधिवेषने बंद पडली. केंद्रीय कचेरी मात्र अमरावतीसच होती. १९३६–३७ च्या सुमारास प्रा. वि. भि. कोलते तेथे नोकरी निमित्त आले आणि विदर्भ साहित्य संघाच्या कार्याला पुन्हा चालना मिळाली.

सातवे अधिवेशन–

प्रा. बनहट्टी, श्री. ना. कृ. दिवाणजी यांनी पुढाकार घेऊन सातवे अधिवेशन अमरावती येथे भरविले. या अधिवेशनापासून अधिवेशनास उद्घाटक म्हणून नामवंत व्यक्तीला बोलावण्यात येऊ लागले. या अधिवेशना नंतर नवे कार्यकारी मंडळ निवडण्यात आले. संघाध्यक्ष–लो. ना. मा. श्री. अणे, सरचिटणीस–अ. तु. वाळे, चिटणीस–र. वि. कुळकर्णी, प्रा. या. मु. पाठक, प्रा. श्री. ना. बनहट्टी, प्रा. कोलते, प्रा. मा. गो. देशमुख, सौ. मथुराबाई द्रविड व श्री. बा. सं. गडकरी वगैरे.

अनुक्रमणिका

पुनरूज्जीवन–

सातव्या अधिवेशनानंतर थोड्याच दिवसात श्री. अ. तु. वागळे यांना विदर्भाबाहेर जावे लागले. पुढे सन. १९३९ मध्ये दुसरे जागतिक महायुद्ध सुरू झाल्याने अधिवेशनाचे सोहाळे स्थगित झाले. पुन्हा सन १९४४ मध्ये प्रा. श्री. ना. बनहट्टी यांची नागपूरहून अमरावतीस बदली झाली त्यावेळी लो. ना. बापूजी अणे हे सीलोन येथे भारत सरकारचे हायकमिश्नर म्हणून काम करीत होते. संघाध्यक्षांचे सर्व अधिकार त्यांनी प्रा. श्री. ना. बनहट्टी यांचे स्वाधीन केले. व अकोट येथे आठवे अधिवेशन मार्च १९४५ मध्ये भरले. १ जानेवारी १९४५ मध्ये घटना समिति नेमून विदर्भ साहित्य संघाची नवी घटना तयार करण्यात आली. संघाध्यक्ष म्हणून प्रा. श्री. ना. बनहट्टी, सरचिटणीस प्रा. ना. कृ. दिवाणजी, सदस्य प्रा. ब. ग. खापर्डे, प्रा. वि. भि. कोलते, शं. ना. सहस्रबुद्धे व अ. तु. वागळे. आधी कार्यकारिणी निवडण्यात आली. प्रा. बनहट्टी यांनी एक छोटासा पुनरूज्जीवनाचा समारंभ अचलपूरचे श्रीमंत नारायण व्यंकटेश उर्फ नानासाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली ३० मार्च १९४५ रोजी अकोट येथे साजरा केला. संघाचे मुखपत्र म्हणून "युगवाणी" व संघाच्या मराठी साहित्य विषयक परीक्षा घेण्याचे ठरविण्यात आले.

उत्तरार्ध–विदर्भ सायित्य मंदिराची मुहूर्तमेढ–

आठव्या अधिवेशनात नवीन संघाध्यक्ष म्हणून डॉ. य. खु. देशपांडे यांची निवड झाली. कार्याध्यक्ष प्रा. श्री. ना. बनहट्टी व सरचिटणीस प्रा. ना. कृ. दिवाणजी यांची निवड झाली. दि. २ ऑगस्ट १९४५ रोजी विदर्भ साहित्य संघ ही संस्था रजिष्टर करण्यात आली. "युगवाणी" हे संघाचे मुखपत्र १९४६ पासून सुरू करण्यात आले. पुढे अकरावे संमेलन गोंदिया येथे भरले असता विदर्भ साहित्य संघ स्थापनेचा रजतमहोत्सव समारंभ बिहारचे त्या वेळचे राज्यपाल लो. ना. डॉ. मा. श्री. उर्फ बापूजी अणे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. बाराव्या संमेलनात श्री. ग. त्र्यं. तथा भाऊसाहेब माडखोलकर यांनी विदर्भ साहित्य संघासाठी "साहित्य मंदिर" उभारण्याचे घोषित केले. व १ मार्च १९५० रोजी संघाच्या "मंदिराच्या" जागेस त्यांनी स्वीकृती मिळविली. अमरावतीची केंद्रीय कचेरी नागपूरास आणण्यात आली. संघाध्यक्ष भाऊसाहेब माडखोलकर, सरचिटणीस शकुंतलाबाई दिवाणजी आणि चिटणीस श्री. रा. पु. सगदेव आणि सल्लागार न्यायमूर्ति के. तु. मंगळमुर्ति, श्री. पु. य. देशपांडे, बाळासाहेब ढवळे, ना. रा. शेंडे, ए. श्री. पटवर्धन प्रभृतीच्या कार्यदक्षतेने "मंदिर" साकार झाले. त्याचवेळी "विश्वस्तांची" निवड करण्यात आली. लो.

ना. मा. श्री. अणे, न्यायमूर्ति के. तु. तथा अण्णासाहेब मंगळमूर्ति हे आजीव विश्वस्त व वेळोवेळचे संघाध्यक्ष हे पदसिद्ध विश्वस्त अशी निवड करण्यात आली. दि. १५ एप्रिल १९५१ रोजी "मंदिराची" कोनशिला त्यावेळचे गृहमंत्री पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांच्या हस्ते बसविण्यांत आली. संघाचे बोधचिन्ह ठरविण्यात आले. संघाचे कार्य दिवसेंदिवस वाढत होते. १९५१ नंतर श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांनी स्वतः सरचिटणीसाची जबाबदारी स्वीकारली, स्वतंत्र कार्यालय निर्माण झाले. तेथे कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली.

विदर्भ साहित्य संघाच्या कार्याचा प्रभाव सर्वत्र पडू लागला. अमरावती, खामगाव, गोंदिया, भंडारा, आकोला, रामटेक, चंद्रपूर, यवतमाळ, वर्धा, बुलढाणा, पुसद वगैरे भागांत संघाचे कार्य तळमळीने सुरू झाले. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, संशोधन वगैरे क्षेत्रात विदर्भ साहित्य संघाने अभिमानास्पद कामगिरी सुरू केली. मंदिर निधीचा संकल्प एक लाखाचा होता. चोहोबाजूंनी त्यांना साह्य होऊ लागले. नाट्य संस्था, साहित्य मंडळे, संशोधनसंस्था यांचे संघाशी संलग्नीकरण करण्यात आले. त्यावेळचे मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री पं. रविशंकरशुक्ल यांचे हस्ते दि. १९ ऑक्टोबर १९५२ रोजी मंदिराचा पाया समारंभाने भरण्यात आला. मंदिरात कै. राम गणेश गडकरी यांचे स्मारक करण्याचे ठरले. पाहता पाहता मंदिराचा दर्शनी भाग उभा झाला. दि. २७ एप्रिल १९५४ रोजी भारताचे पहिले राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या शुभहस्ते विदर्भ साहित्य मंदिराचे उद्‌घाटन प्रसन्न वातावरणात झाले. मंदिरात "राबादामोदर हॉल", गडकरी सभागृह शिवाजी ग्रंथालय, लो. टिळक सभागृह व बुटी हॉल आणि विदर्भ साहित्य संघ धनवटे रंगमंदिर आदि विभाग साकार होत गेले. १९५५ नंतर घटनेत थोडीफार दुरुस्ती होऊन कार्यकारिणीच्या निवडणुका त्रैवार्षिक होऊ लागल्या. सन. १९५५ मध्ये श्री. बाळासाहेब ढवळे हे संघाध्यक्ष होते. उपाध्यक्ष ना. रा. शेंडे व सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर निवडले गेले. सन १९५६ मध्ये लोकमान्य टिळक व प्रि. गोपाळराव आगरकर यांचे शतसांवत्सरिक वर्ष विदर्भ साहित्य संघाने दुर्दम्य उत्साहाने साजरे केले. संघाने नाट्योत्सव आयोजित केला त्याचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब अण्णेगिरी व सरचिटणीस श्री. द. रा. गोमकाळे होते. दि. १८ ऑक्टोबर १९५६ रोजी श्री. चिंतामणराव देशमुख यांच्या हस्ते रंगमंदिराची कोनशिला बसविण्यात आली. ७ डिसेंबर १९५६ रोजी नाट्य महोत्सवास प्रारंभ झाला. मुंबई राज्याचे मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण हे समारोप प्रसंगी उपस्थित होते. रंगमंदिराच्या संकल्पित इमारतीला श्रीमंत दादासाहेब धनवटे आणि त्यांच्या पुत्रांनी ५१ हजार

(पृष्ठ ७४ वर)

विदर्भविषयः जयजयकार !

विदर्भविषयः सारस्वतभू
निदर्भवीणा धारीणीची
विदर्भ–साहित्य–संघ–द्वारी
वीणा झंकार नित्यवाची !...१

तुझ्या मंदिरी नऊ रसांचा
प्रतिक्षण होई साक्षात्कार
काव्य, नाट्य, संगीतकलांचा
विश्वचीया भारोभार ! २

तव दरबारी किति मानकरी ?
कवि भवभूती, कालीदास !
संस्कृत–हिन्दी–मराठी सकल–
भाषी, मुकुंदराज ज्ञानेश !...३

वैण्यतिराकर चैतन्येश्वर,
मृत्युंजय मार्कंडेयऋषी !
माय मराठी अम्बानगरी
सगुणरूप घे अम्बा साक्षी !...४

विवेकसिंधू, परमामृत ते
"अमृतातेहि पैजा जिंके !"
विश्ववाङ्मयि पुनः न होई
"ज्ञानेश्वरि"सम काव्य आणिके !...५

तुकयाची ती अभंगवाणी,
मुक्त–मयूरी महाभारत,
दर्शन घडवी सकल प्रकारे
भूपाळी, लावणी धी–भक्त !...६

पूर्व सुरींचा घेउन आशिस
मम महाराष्ट्र–मयूरासनी
विदर्भविषयः जयजयकार !
नित पडो कर्णि, हीच मागणी !!...७

—तु. ना. काटकर

अनुक्रमणिका

कविभूषण अण्णासाहेब खापर्डे यांचे विदर्भ साहित्य संघातील सत्काराच्या वेळीचे

दिनांक २९–१०–६४ रोजीचे भाषण

विदर्भ साहित्य संघातर्फे माझ्या "पंचाहत्तरीच्या" समारंभ प्रसंगी नागपूर धनवटे रंगमंदिर दि. २९–१०–६४ सायंकाळी ५–३० वाजता माझे शेवटचे भाषण.

मला आज ७५ वे वर्ष लागले म्हणून विदर्भ साहित्य संघाला आनंद होणं स्वाभाविकच आहे. आपलं नातंच तसं जवळंच आहे.

आपण आज व्यक्त केलेल्या माझ्याविषयीच्या सदिच्छांचा मला उरलेल्या आयुष्यात फार उपयोग होईल. त्या विषयी मला शंका नाही.

मी आज आपल्या हवाली जतन करून ठेवण्याकरिता कांही बहुमोल ठेवा केला आहे. आपण तो जतन करून ठेवाल ह्या विषयी मला शंका नाही. ती असती तर मी हा ठेवा आपल्या हवाली करण्यास खास कचरलो असतो. मी तर पूर्ण विश्वासानेच आपल्या स्वाधीन केला आहे. आणि म्हणून मी त्या ठेवण्याबाबत निश्चित आहे.

हा जगद्व्याप्त विश्वव्यापार अफाट आहे. पण सर्व माणसांचे अनुभवाचे जग मात्र हे एकच आहे. ह्यातून ज्याला जे पाहिजे ते तो घेतो. तत्वज्ञ श्रीशंकराचार्यांचं जग कांही निराळं नव्हतं. गणिती भास्कराचार्य ह्यांचं जग कांही निराळं नव्हतं. कविकुलगुरू कालिदासाचं जग कांही निर.ळं नव्हतं. ह्याच सृष्टीकडे पाहून त्या तिघांनी किती भिन्न भिन्न प्रकारची वाङमयनिर्मिति केली ह्याचं कारण ज्याची त्याची सृष्टी. माणसाची ही दृष्टी पूर्वजन्म संस्कारांनी आणि ह्या जन्मीच्या सर्व संस्कारानी मिळून बनते. त्याप्रमाणे मला जसं काय हे विश्व दिसले कळले आणि जाणवले आणि व्यक्त करता आले तसे आणि तितकं ते मी माझ्या दीर्घकाव्यात आणि लहान कवितात उतरले आहे. आपण आज भाषणात माझा कवि या नात्यानेहि गौरव केला हे आपल्या सौजन्याला उचितच आहे. मी काहीहि कृत्रिम लिहिलं नाही. जे जेव्हा जसं आतून भरून आलं तसं ते तेव्हां आपणापुढे ठेवलं. ते लेखन आपल्याला काही मोलाचं वाटलं त्यात अर्थात मला धन्यता वाटते. ह्याखेरीजहि माझं बरंच लेखन अप्रकाशित आहे. ४० वर्षापासून लिहिलेल्या माझ्या काव्यकान्तार काव्यांत आणि "साहित्याचा संसार" ह्या अलिकडेस प्रकाशित झालेल्या माझ्या पुस्तकात मी विवेचन करून ठेविले आहे. हे सर्व लेखन आणि त्या विषयीच्या आपणा वाचकांच्या भावना हीच माझी जन्म भराची कमाई. या लेखनाची माझी हस्तलिखितेहि मी जतन करून ठेवल्यासाठी विदर्भ साहित्य संघाच्याच स्व.धीन केलेली आहेत.

आपण हा समारंभ घडवून आणल्याबद्दल आणि माझ्या विषयी आणि माझ्या लेखनाविषयी आज येथे काढलेल्या,प्रशंसोद्गाराबद्दल आपले पुन: एकदा मन:पूर्वक आभार मानतो. प्रकृति असावी तशी नसल्यामुळे हे भाषण आखुडतंच घेणं भाग आहे.

सारस्वतीजन्मभूचा आणि तिच्या साहित्याचा विजय असो.

अनुक्रमणिका

संघ वार्ता

प्रा. श्री. गो. काशीकर
सरचिटणीस
वि. सा. संघ

(१) नाट्यसमिती--

कै. कृ. प्र. खाडिलकर स्मृतिदिन

दरवर्षाप्रमाणे यंदाही कै. कृ. प्र. खाडिलकर स्मृतिदिन दिनांक २६–८–६४ रोजी प्रा. श्री. मा. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. ह्याप्रसंगी सुनील सुभेदार, श्री. र. वि. कुलकर्णी यांची भाषणे झाली. उपस्थितांपैकी कांही सदस्यांनीही स्वयम्स्फूर्तीने श्रद्धांजली वाहिली.

श्री. नाना जोगळेकर यांचे व्याख्यान

मुंबईचे सुप्रसिद्ध रंगभूषातज्ज्ञ श्री. नानासाहेब जोगळेकर यांचे दिनांक १३–९–६४ रोजी गडकरीसभागृहात अत्यंत मनोरंजक व्याख्यान झाले. आधुनिक प्रकाश योजना व त्यामुळे रंगभूषेत होणारे बदल याबद्दल त्यांनी विशेष विवेचन केले व काही प्रात्यक्षिकेही करून दाखविली. विशेषत: अवघ्या तीन मिनिटात त्यांनी पू. विनोबाजींचा मेकअप करून उपस्थितांना थक्क करून सोडले. अध्यक्षस्थानी संघोपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे हे होते.

(२) सांस्कृतिक कार्यक्रम समिति

कवि बी यांची पुण्यतिथी

कविवर्य 'बी' उर्फ नारायण मुरलीधर गुप्ते यांची १८ वी पुण्यतिथि गडकरी सभागृहात दिनांक ३० ऑगस्ट रोजी साजरी करण्यात आली. याप्रसंगी सुप्रसिद्ध कवी व आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. या. मु. पाठक यांचे व्याख्यान झाले.

कवि कै. बोबडे यांची पुण्यतिथी

दिनांक १–१०–६४ रोजी कै. बोबडे स्मृतिदिन साजरा करण्यात येऊन त्यांच्या प्रतिमेस हार समर्पण करण्यात आला.

शारदोत्सव

यंदाही संघातर्फे शारदोत्सव दिनांक १३–१०–६४ पासून साजरा करण्यात आला. शारदोत्सवात खालील कार्यक्रम झाले. त्यादिवशी सकाळी सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांनी सरस्वतीचे पूजन केले.

अनुक्रमणिका

दिनांक १८–१०–६४ रोजी सायंकाळी विश्व हिंदु परिषदेचे संघटन मंत्री श्री. दादासाहेब आपटे यांचे 'बाहेरील जग व हिंदू विश्व' या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्षपद श्री. ना. रा. शेंडे यांनी स्वीकारले.

शारदोत्सवाच्या समारोपादाखल गुरुवार ता. २२–१०–६४ रोजी म. म. बाळशास्त्री हरदास यांचे 'कै. शि. म. परांजपे व्यक्ति व वाङमय' ह्या विषयावर भाषण झाले. अध्यक्षस्थानी लो. ना. डॉ. बापूजी अणे होते.

(३) कै. रानडे वादस्पर्धा

दरवर्षाप्रमाणे यंदाही कै. न्या. मू. रानडे वाद स्पर्धा दिनांक २५, २६ २७ सप्टेंबर या तीन दिवस घेण्यात आली. यावर्षी एकूण २२ महाविद्यालयांनी यात भाग घेतला. स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे लागला. स्पर्धेचा विषय "भ्रष्टाचार ही शासनाच्या अधिकार क्षेत्रांच्या विस्ताराची अंगभूत समस्या आहे" असा होता. संचलन श्री. ना. रा. शेंडे यांनी केले.

फिरती ढाल या वर्षी सी. पी. अँड बेरार एज्युकेशन सोसायटीचे महाविद्यालयाने पटकाविली.

१. वैय्यक्तिक पारितोषिक रु. १००–/ व ६० टक्के गूण मिळविल्याबद्दल प्रपाण पत्र	श्री. एस्. एन्. देशपांडे सी. पी. अँड बेरार एज्युकेशयुन सोसायटी महाविद्यालय.
२. वैय्यक्तिक पारितोषिक रु. ७५ व ६० टक्के गूण मिळविल्याबद्दल प्रमाण पत्र	श्री. पांडुरंग उद्धवराव देशपांडे विश्वेश्वरैय्या इंजि. कॉलेज, नागपूर.

याशिवाय ६० टक्के गूण मिळविल्याबद्दल श्री. राजस्थान आर्यन महाविद्यालयाचे श्री. एस. के जाधव यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

नागपूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मा. गो. देशमुख यांचे हस्ते बक्षिस-वितरणाचा कार्यक्रम दिनांक २७–९–६४ रोजी झाला. वरील स्पर्धेचे परीक्षक म्हणून सर्वश्री श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी, श्री. दि. ब. पंडित व श्री. मा. गो. गलगलीकर हे होते.

भेटी व सत्कार

महाराष्ट्र राज्याचे अॅड्मिनिस्ट्रेशन डिपार्टमेण्टचे अंडर सेक्रेटरी श्री. आर्. पी. उमरजी यांनी माहिती केन्द्र नागपूरच्या संचालिका सौ. ताराबाई धर्माधिकारी यांचे समवेत दिनांक १३–८–६४ रोजी वि. सा. संघाला भेट दिली व संघाचे कार्याबद्दल समाधान व्यक्त केले.

लो. ना. श्री. बापुजी अणे यांचा सत्कार

विदर्भ साहित्य संघाचे विश्वस्त लो. ना. डॉ. मा. श्री. उर्फ बापूजी अणे यांना ८५ व्या वाढदिवसानिमित्त संघातर्फे त्यांचा दिनांक २२–१०–६४ ला

सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी संघाचे उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे हे होते. ह्याप्रसंगी म. म. डॉ. मिराशी, डॉ. च. ध. देशमुख व म. म. श्री. बाळशास्त्री हरदास यांची भाषणे झाली. लो. ना. बापुजी अणे यांना ह्यावेळी हार, शाल व श्रीफळ अर्पण करण्यात आले.

कविभूषण ब. ग. खापर्डे यांचा सत्कार

वि. सा. संघाचे संस्थापक क. भू. अण्णासाहेब खापर्डे यांचा त्यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त संघातर्फे सत्कार करण्यात आला. त्या प्रसंगी श्री. माडखोलकर, प्रा. या. मु. पाठक, डॉ. य. खु. देशपांडे आदींची भाषणे झाली.

सभा

वि. सा. संघाच्या कार्यकारिणीची तातडीची सभा दिनांक १३–९–६४ ला घेण्यात आली.

आजीव सभासद

प्रा. पु. ग. अडावदकर, कृषिमहाविद्यालय नागपूर हे रु. १००/ देऊन आजीव सभासद झाल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

विदर्भ साहित्य संघ (पृष्ठ ६९ वरून)

रुपयांची उदार देणगी दिली. कै. नानासाहेब जोग यांनी रंगमंदिराच्या उभारणीस रात्रीचा दिवस करून लक्ष घातले. त्यांचे स्मरणार्थ रंगमंदिरासमोर त्यांचा पुतळा उभा करण्यात आला आहे.

विदर्भ साहित्य संघाच्या कार्याचा पसारा सन १९५७ नंतर खूपच वाढला. शताब्दी महोत्सव, नाट्योत्सव, व्याख्यानमाला, दीक्षान्त समारंभ अशा कितीतरी कार्यांनी विदर्भ साहित्य मंदिराचा परिसर सदा गजबजलेला असतो. नागपूर प्रांताच्या सुविख्यात देशसेविका सौ. अनुसयाबाई काळे यांच्या पवित्र स्मृतिप्रीत्यर्थ त्यांचे यजमान श्रीमान पु. वा. काळे व कुटुंबीयांनी रुपये पंचवीस हजाराची देणगी श्री शिवाजी ग्रंथालयासाठी दिली. आता ते ग्रंथालय समृद्ध झाले आहे.

१४ जानेवारी १९२३ रोजी उगम पावलेला हा विदर्भ साहित्य संघाच्या मंदाकिनीचा प्रवाह फोफावत मराठी भाषिकांना कृतार्थ करीत आहे. तिच्या तीरावर अनेक वाङ्मय तीर्थस्थाने निर्माण झाली आहेत. अनेक निर्माण होत आहेत.

साभार पोच

१. डॉ. सहस्त्रबुद्धे–व्यक्तिदर्शन आणि साहित्य विवेचन–डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे सत्कार समिति तर्फे, कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे, पृ. २५१, मू. १० रु.

२. लोकसाहित्य संपदा–लेखक व संपादक–श्री. ना. रा. शेंडे, विदर्भ साहित्य संघ, नागपूर. पृ. ३३६, मू. ६ रु.

३. आनंदयात्री रवीन्द्रनाथ–बा. भ. बोरकर, प्रा. प्रसिद्धी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई मू. २–५० पै.

४. मराठीतील स्त्रीधन–डॉ. सरोजिनी बाबर, मू. ३–५० पै.

५. एक होता राजा–डॉ. सरोजिनी बाबर, महाराष्ट्र राज्य लोक साहित्य समिति मू. ५ रु.

६. भाषा, इतिहास आणि भूगोल–ना. गो. कालेलकर, मौज प्रकाशन गृह, मुंबई ४, पृ. ११५, मू. ६.५० पैसे

७. माझ्या आठवणी–पां. चि. पाटिल पृ. ३६८ मू. १५ रु.

८. रंगबावरी–इंदिरा मू. ४–५० पै.

९. राजे मास्तर–श्री. ना. पेंडसे मू. ३ रु.

१०. पालखी–दि. बा. मोकाशी „ मू. ५ रु.

११. रणगर्जना–प्रसिद्धी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई मू. ५० पै.

१२. अमेरिकन साहित्याचा इतिहास–अनु. मंगेश पाडगांवकर, वोरा एण्ड कंपनी, मुंबई २, मू. ६ रु.

१३. बाल साहित्याची रूपरेखा–सौ. मालतीबाई दांडेकर, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई मू. १२ रु.

१४. ग्रंथालय गौरव ग्रंथ, भाग १ ला, मू. ३ रु.

१५. सुलभ नाट्य शिक्षण–डॉ. न. अ. वरवे, मू. ५ रु.

१६. यादवकालीन महाराष्ट्र–मु. ग. पानसे मू. १२ रु.

१७. प्रवास–डॉ. शं. गो. तुळपुळे, सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर. मू. ७ रु.

१८. मराठी निबंध–डॉ. म. मा. आळतेकर „ मू. ७ रु.

१९. पद्यसर्वस्व–सं. रामदास डांगे, भारतीय ग्रंथ भवन, मू. ३ रु.

२०. नागरिकशास्त्र व भारतीय राज्य घटना–प्रा. र. शं. गुप्ते,
मू. ४ रु.

२१. कहाणी कुणा मानवाची–सुधा साठे मू. ६ रु.

२२. बन्सी भैय्या–गो. गं. पारखी ,, मू. ६ रु.

२३. ग्रंथपालनाचे आप्त–वा. पु. कोल्हटकर, महाराष्ट्र ग्रंथालय संघ, पुणें, मू २ रु.

२४. संदर्भ साह्य–वा. पु. कोल्हटकर, मू. २–५० पै.

२५. ग्रंथपालनाची तोंडओळख–र. शं. पारखी ,, मू. २–५० पै.

२६. शेती व ग्रामीण जीवन विषयक कायदे–रा. स. ढवळे, पुणें विद्यापीठ प्रकाशन, मू. १ रु.

२७. बुद्ध : संप्रदाय आणि शिकवण–चिं. वि. जोशी, मू. १ रु.

२८. पुत्र व्हावा ऐसा गुंडा–आकाशानन्द नागपूर प्रकाशन, नागपूर. मूल्य ७५ पै.

२९. असे होते– मूल्य १ रू.

३०. उपाशी राक्षस– मूल्य ७५ पै.

३१. कवि समेलन– मूल्य ७५ पै.

३२. झिम्-झिम्– मूल्य ६२ पै.

३३. कोरा कागद– मूल्य ५० पै.

३४. नवा चष्मा– ,, मूल्य ७५ पै.

३५. स्वराज्याचं तोरण–सी. म. वापट ना. प्र. नागपूर मूल्य ६२ पै.

३६. कांही निबंध– श. मा. मुक्तिबोध मूल्य ३ रु.

३७. स्मृति वैचित्र्य– र. द. सरंजामे मूल्य ३ रु.

३८. महात्मा गांधी यांचे संकलित वाङमय– महात्मा गांधी वाङमय प्रकाशन समिति, प्रसिद्धि विभाग, महाराष्ट्र राज्य, मू. ७ रु.

३९. नाटय संकीर्तन– व्यं. न. कुलकर्णी, रोमांच प्रकाशन, सातारा, मू. ४ रु.

४०. एक असतो राजा–शं. ना. नवरे, जयहिंद प्रकाशन, मुंबई मू. २ रु.

४१. आपले डोळे–डॉ. द. गो. पटवर्धन, पुणे विद्यापीठ प्रकाशन मू. १ रु.

४२. देवनागरीचा कळफलक, भाषा संचालनालय, महाराष्ट्र शासन

४३. शासन व्यवहारात मराठी,

४४. पुनर्जन्म– शिरीष, जयश्री प्रकाशन, नागपूर, मू. ४ रु.
४५. व्यापारासंबंधी व्याख्याने– गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे मू. रु. २–५०
४६. किशोरी–दा. गो. बोरसे, गिरजा साहित्य भांडार, मालेगाव मू. ३ रु.
४७. स्वप्नगंधा–सुधीर देव, निर्मल साहित्य प्रकाशन, नागपूर. मू. ३ रु.
४८. अक्षरा–डॉ. रामचंद्र विळतकर, प्र. गो. ना. विळतकर,
जठार गल्ली, लष्कर, ग्वाल्हेर. मू. २ रु.
४९. सिंहगर्जना–दिनेश मिश्र, साहित्य मंडळ, गोंदिया, मू. रु. १–५०
५०. चीन व हिमालयीन संघराज्य– नागरिक संरक्षण समिति, महाराष्ट्र, मुंबई.
५१. लोकशाहीची फसवी चिनी घोषणा–
५२. Sino Indian Border– „
५३. रूपमती–रा. अ. काळेले, कॉंटिनेन्टल प्रकाशन, पुणे, रु. २–५०

पुसद येथील

रौप्यमहोत्सवी साहित्य संमेलनाचे उद्‌घाटक-



माननीय श्री. यशवंतराव चव्हाण

भारताचे संरक्षण मंत्री

अनुक्रमणिका

पुसद येथील

रौप्यमहोत्सवी संमेलन प्रसंगीच्या प्रदर्शनाचे उद्घाटक–



माननीय श्री. वसंतराव नाईक

महाराष्ट्राचे मुख्य मंत्री

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संमेलन

पंचविसावे रौप्य महोत्सवी अधिवेशन, पुसद

श्री. वामन कृष्ण चोरघडे

यांचे

अध्यक्षीय भाषण

ता. २६-१२-६४

मा. श्री. यशवंतरावजी, मा. श्री. वसंतरावजी, संमेलनाच्या सांगतेसाठी जीवाचे रान करणारी थोर मंडळी, विदर्भ साहित्य संघाचे उपस्थित सदस्य, मराठीची मानकरी मंडळी आणि वाङ्मय प्रेमी उपस्थित बंधू आणि भगिनींनो !

विदर्भ साहित्य संमेलनाच्या या रौप्यमहोत्सवी अधिवेशनात आपल्या समोर माझे विचार व्यक्त करण्याचा मान आपण मला दिला. या सन्मानाला मी पात्र आहे की नाही हे मला न विचारता आपणच ठरविले. आपले मजवरील प्रेम आणि मजबद्दलची आपुलकी यातून मला प्रतीत होते. माझ्यावर आपण हा कृपेचा पाऊस पाडला. मी पुनीत झालो, पावन झालो. मला आपण मोठेपण दिले, माझी लाज राखण्याची प्रार्थना देखील मी आपणालाच करणार ! आपले मजवरील ऋण शब्दातीत आहे. मी आभाराचे कोरडे शब्द वापरून आपला अपमान करू इच्छित नाही, ते मी पाप समजतो.

मायबोली मराठीचा महिमा गायला आपण ज्या गावी जमलो आहोत त्या गावच्या पाठीशी जगन्माता भगवती रेणुकादेवी सगुण रूपाने आशीर्वाद देत उभी आहे. स्वराज्याच्या मंत्राचे द्रष्टे लो. टिळक यांनी या पुष्पवती नगरीला स्वराज्याची पंढरी म्हणून गौरविले आहे. देवाने, दैवाने, विद्येने, वीराने या नगरीचा महिमा मान्य केला. अशा नगरीत आपणासारख्या साहित्य रसिकांचा मेळावा जमला. स्वातंत्र्यानंतर ही नगरी साहित्याची पंढरी होण्याचा योग जणू आज येथे जमून आला आहे. या शुभ योगाबद्दल मी परमेश्वराला, आपल्या हृदयी स्थित सरस्वती मातेला वंदन करतो.

व्यास पीठाच्या परंपरा !

साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून बोलताना काही परंपरा पाळावयाच्या असतात. साहित्याचा भूतकाळ, वर्तमानकाळ, भविष्यकाळ कसा याचे दिग्दर्शन

अनुक्रमणिका

करावयाचे असते; ज्यांनी वाङ्मयाच्या अभिवृद्धीस हातभार लावला त्यांचे स्मरण, संकीर्तन करावयाचे असते; साहित्याचा मौलिक ऊहापोह करावा लागतो. नवे सिद्धान्त रसिकांसमोर मांडावयाचे असतात. अधिकारी वाणीने हे मार्गदर्शन होत असताना सर्वांनी स्तिमित व्हावयाचे असते. पण या परंपरा मला पाळता येणार नाहीत. माझी शक्ती सीमित आहे. साहित्याचा सखोल व्यासंग मी केला नाही, प्रयत्न करूनही मला तो साधला नाही. मी एक कथालेखक आहे; 'भाषण कर', असे सांगण्याऐवजी आपण मला 'कथा सांग' असे आज्ञापिले असते तर ते मला जमण्याजोगे होते. मी कथा सांगितली असती. तिची निर्मिती होत असताना जो अनिर्वचनीय आनंद होतो त्याचा प्रत्यय आणून देण्याचा मी प्रयत्न केला असता. मराठी कथा आज कशी श्रेष्ठ आहे, केवळ भारतीय भाषा-तील नव्हे तर सुधारलेल्या देशातील कथांपेक्षाही ती किती सुंदर, सौष्ठवी, साजुक, सुबक आहे हे मी आपणांस पटवून दिले असते, आपण मला दिलेला हा सन्मान हा माझ्या मराठी कथासुंदरीचा गौरव आहे अशा श्रद्धेने मी आपल्या चरणी नतमस्तक झालो असतो. पण पूर्वसूरींच्या अनुभवी मान्यवरांनी मला असे सांगितले की मी जर असे केले तर त्यांचा आणि सर्वांचा अपेक्षाभंग होईल. आपल्या अपेक्षांना साजेसे मला काही बोलले पाहिजे !

काय बोलू ? कसे बोलू ? जे साहित्यात चालू आहे ते आलबेल आहे, साहित्याचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे असे आपल्याला खोटेच पटवून देऊ काय ? आत्मवंचना, परप्रतारणा मी केली तर आपल्याला ती रुचेल का ?

आपणांस राजी राखून, माझी जबाबदारी, आपणांला कळू न देता, पार पाडण्याचा दुसरा एक मार्ग आहे. तो मार्ग म्हणजे गोवा, बेळगाव, कारवार, सौसर, भैंसदेही, गोदावरीचा जलविवाद असे प्रश्न घ्यावयाचे. मराठीचे संमेलन म्हणून मराठीत त्याबद्दल हाकाटी करावयाची, हाती गवसतील किंवा गवसू देतील त्यांचे कान धरावयाचे—भाषणात आवेश येतो, टाळ्या मिळतात आणि जबाबदारी कशी साफ पार पडते. पण असे करायला थोडी विटाई वापरावी लागते ती माझ्याजवळ नाही. अप्रयोजक बोलणे कटाक्षाने मी टाळतो. ज्याचे काम त्याने केले म्हणजे ते उत्तम होते अशी माझी श्रद्धा आहे. परवा गोव्याबद्दल आमचे संरक्षण मंत्री, आमचे मुख्यमंत्री, आमचे प्रांताध्यक्ष बोलले; उत्तम झाले. ते शोभले, त्या बोलाला वजन आले. वीराचा आव आणून माझ्यासारख्याने उगीच खंव ठोकण्याचा अभिनय केला तर नुसते हसेच होणार नाही तर कार्यही बिघडेल. साहित्यातले साहित्यपण ही आपली अवकात ! तेवढी आपण ओळखावी.

जीवन : कला

या साहित्यपणातही एक सुटकेचा मार्ग आहे. तो असा की कलेचा व जीवनाचा वाद निर्माण करावयाचा. कला श्रेष्ठ की जीवन श्रेष्ठ, असा सवाल

टाकताना शीर ताणावयाची, यापैकी कोणाला तरी श्रेष्ठ ठरवावयाचे आणि आपण निरूपायाने वाजविलेल्या टाळ्यांचा निमूटपणे स्वीकार करून धन्य व्हाव. याचे. देशी परदेशी मोठमोठ्या साहित्यकारांचा निर्वाळा दिला तर आपोआपच वक्त्याची विद्वता, प्रगाढ की काय म्हणतात, तो व्यासंग दिसून येतो. वक्ता जेवढे गूढ बोलेल तेवढे त्याचे वक्तृत्व प्रभावी ठरते आणि श्रोत्यांना त्यातील अक्षर आपल्याला कळले नाही हे कबूल करावयास प्रतिष्ठा आड येत असल्याने कार्यभाग उत्तम साधतो. माझ्या दुर्दैवाने, जीवन आणि कलेचा हा अन्योन्य संबंध मला महत्त्वाचा वाटत नाही आणि तो का वाटत नाही हे सिद्ध करून फड जिंकण्याची उभारी मला नाही. मी कथालेखक, एका आगळ्या सृष्टीची स्वप्ने शब्दात पकडण्याचा माझा प्रयत्न. जीवनातून कला काढून घेतली (ते शक्य नाही हे सुदैव !) तर जीवनाला जीवनच म्हणता येणार नाही; इतकी माझी कलेच्या ठिकाणी निष्ठा. नुसते जगणे आणि जीवन यातील फरक कलेमुळे शोभला आहे. जीवनाला जीवनपण देते ती कला ! जे जीवनाचा पुरस्कार करतात, त्यांची बाजू मला समजत नाही; समजून घेण्याची इच्छा नाही. आयुष्यात कलेची मातब्बरी ज्यांना पटत वाटत नाही, त्यांच्या जगण्याला रूप, रंग, काही काही नसते. ते फार मोठ्या आनंदाला आचवतात. त्यांच्याबद्दल सहानुभूतीचा उद्गारच काढायला हवा ! फार तर, उत्कृष्ट कलेचा आविष्कार त्यांना दाखवून या आनंदाचा प्रत्यय त्यांना आणून द्यावयाचा आणि कला श्रेष्ठ की जीवन श्रेष्ठ असा काथ्याकूट त्यांनी करू नये अशी त्यांना शपथ घालावयाची.

साहित्यात श्लील–अश्लील

साहित्यपणात सुटकेचा दुसरा मार्ग म्हणजे साहित्याच्या श्लील-अश्लीलतेची चर्चा करून आजूबाजूच्या गरीब बिचाऱ्या श्रोत्यांना, वाचकांना, दहशत बसवावयाची. 'लांडगा आला रे आला' असा आक्रोश केला की साहाजिकच ध्यानी मनी आणि स्वप्नी देखील लांडगाच दिसतो; साहित्य श्लील–अश्लील असे काही नसते याचा विसर पडतो. मराठी साहित्यातील अश्लीलतेसंबंधीची हाकाटी माझ्या लहानपणापासून मी ऐकली आहे. बघावी जरा अश्लीलता अशी जिज्ञासा वाटण्याइतपत मी या हाकाटीने भारला गेलो आहे. मला लांडगा काही दिसला नाही. एक मात्र अनुभव आला. तो असा, की या अश्लीलतेचा आणि वयाचा काहीतरी संबंध नक्कीच असला पाहिजे. निरोगीपण जसजसे क्षीण होते, तसतशी चव जाऊन चवना सुटू लागते. केवळ अश्लील असे साहित्य शोधण्याची दिवटी मला अजून सापडली नाही. ज्याला अश्लील साहित्य म्हणतात ते मी वाचले आणि ज्याच्या लेखणीतून उतरले तो, तिथेच का थांबला, असा प्रश्न माझ्यासमोर निर्माण झाला. कुणी अडविले त्याला ? कोणता संकोच त्याला मनाई करू

अनुक्रमणिका

घजला ? कायदा, परंपरा मोडून तोडून टाकणे हा तर आज मोठा पराक्रम मानला जातो. अश्लील वाङ्मयाचा हा लेखक पराक्रमी नाही काय ? शिवाय अश्लील असू नये असे कितीही वाटले तरी ते वाचावेसे वाटते, हे नाकबूल करण्यात अर्थ नाही. ते वाचले जाते म्हणून निदान ते लिहिले तरी जाऊ नये असा काहीसा, अश्लीलतेची हाकाटी करणांऱ्याचा हेतू असतो, किंवा असावा. जे जे अश्लील आहे, ते ते बोट ठेवून दाखविण्याच्या खटाटोपामुळे अश्लील कसे चक्क दिसू लागते. अश्लील, अनैतिक हे शब्द समानार्थीच वापरण्यात येतात.

पण अशा वाङ्मयाचा लेखक अश्लील लिहिण्याच्या उद्देशाने लिहीत नाही हे कोणाच्या ध्यानी येत नाही. तो जे लिहितो त्यात अद्‌भुताचा हव्यास व रुचिवैचित्र्याचा उद्देश असतो. कथालेखकाच्या भूमिकेवरून माझे म्हणणे मला स्पष्ट करता येते की काय ते बघतो. कथेच्या धुंदीत एक स्त्री–अर्थात् सुंदर, अप्रतीम इ. इ. मनासमोर आकार घेते. एक पुरुष–तोही कोंडामांडा खाऊन देखील बेछूट, भरदार असा असतो–आकार घेतो. त्या दोघांना /एकत्र आणावयाचे–अर्थात् त्यांना परस्परांच्या प्रेमात अडकविले पाहिजेच. काहीवेळ त्यांना वेगळे ठेवायचे; रडू द्यायचे मग त्यांचे मीलन घडवून आणावयाचे. ते मीलन होत असताना चंद्र, तारका, पशु पाखरे, वेठीला धरावयाची, ती हासत होती, नाचत होती, असे ठासून सांगावयाचे. ती स्त्री व तो पुरुष सतत सर्वांच्याच कथात येऊ लागले तर ते मीलन अळणी, नित्याचे, कंटाळवाणे वाटू लागते. तरुण–तरुणीवर पुष्कळ लिहिले गेले की लेखक व वाचक कंटाळतात. तो कंटाळा नाहीसा करण्याच्या उद्देशाने मग तरुण तरुणींना सख्खे बहीण भाऊ बनवावयाचे. त्यांच्या मनात परस्परांबद्दल जे जे काय वाटते ते आपल्या पदरचा हिंग लसूण मिसळून रंगवावयाचे. चंद्र, पाखरे, नेहमीचीच. तारका फुले गेली हजार दोन हजार वर्षे साहित्यात आहेतच. त्यांना विश्रांती द्यायची आणि साप, गांडूळ, बेडूक, विंचू, ढेकूण यांची मदत घ्यायची. झकासपैकी मनोविश्लेपणात्मक उत्तम गोष्ट तयार होते, नाव मिळते. वाचक स्तिमित होतो. "अरेच्या ! हे असे असते काय ? आपले तर हे असे कधी झालेच नाही." असा उद्‌गार तो काढतो. हा उद्‌गार समाजात चरत जातो. काही दिवसांनी हे अद्‌भुत देखील शिळे होते. मग लेखक आणखी जुळणी, विभागणी, गुणाकार, भागाकार करून, अधिकाधिक चेकाळतो. तो स्वतः मग एक गोष्ट विसरतो आणि वाचकालाही विसरायला लावतो. ती गोष्ट म्हणजे त्याने आरंभी रंगविलेले तरुण तरुणींचे प्रेम हीच अत्यंत अद्‌भुत, नित्य–नूतन अशी बाब आहे. हजारो वर्षांपासून हे प्रेम चालू आहे. त्याचा कोणाला कंटाळा आला नाही, येणार देखील नाही. ही प्रेमी युगुले साहित्यात चिरंतन झाली आहेत, आणि जीवन आहे तोपर्यंत ती चिरंतन रहावयाची आहेत. त्यातील अद्‌भुत

शोधण्या इतके निरोगी मन व शरीर असले पाहिजे. मग ज्याला अश्लील साहित्य म्हणतो त्याची निर्मिती व्हावयाची नाही. अश्लील साहित्यावर बंधने घातली पाहिजेत असे जे म्हणतात व ज्यांना म्हणतात त्यांना माझी विनंती अशी की साहित्यावर बंधन घालण्या ऐवजी ते साहित्य निर्माण करणाऱ्याचा शोध घ्यावा. चांगल्या डॉक्टराकडून त्या बिचाऱ्याची प्रकृती तपासून घ्यावी. तो खातो काय ? पितो काय ? बसतो कसा ? कसा राहे, फिरे कसा, हे बघावे आणि शक्य असेल तर पौष्टिक अन्न आणि शुद्ध हवा त्याला मिळेल अशी व्यवस्था करावी. साहित्यसंस्था आणि सरकार यांना एवढे करता आले तर तथाकथित अश्लील वाङ्मयाचा प्रश्न कायमचा सुटून जाईल !

वाचक वर्ग वाढला, अभिरुची वाढली नाही

माझ्या मनात जीवन, कला, श्लील, अश्लील यांचा गोंधळ नाही. मला जे सलते ते वेगळे आहे. ते मी आपणासमोर मांडण्याचा प्रयत्न करतो. स्वातंत्र्यपूर्व काळातले व स्वातंत्र्यानंतर निर्माण झालेले मराठी साहित्य नजरेखालून घातले की एक विलक्षण तफावत नजरेत भरते, काळजी वाटू लागते. पूर्वीचे साहित्य सकस होते आणि आताचे निकस आहे असे ढोवळ विधान करण्याइतका मी अजून म्हातारा झालो नाही. माझी प्रकृती उत्तम आहे. पण स्वातंत्र्योत्तर काळात मराठीपुरते बोलावयाचे झाले तर, साक्षरता वाढली, साहित्य निर्मितीही उदंड झाली पण साक्षेपी, चोखंदळ असा वाचकवर्गच निर्माण झाला नाही. मराठी लिहिता वाचता येते, म्हणून काहीतरी लिहिले पाहिजे आणि काही तरी वाचले पाहिजे. लहान मूल जसे, दिसेल ती वस्तू तोंडात टाकते तसा आजचा वाचक दिसेल ते, मिळेल ते वाचतो हे खरे आहे. वाचकांची संख्या वाढली, पुस्तकांची मागणी वाढली, हे कदाचित खरे असेल पण वाचनाची अभिरुची वाढलेली नाही. मी 'कदाचित्' हा शब्द वापरला याचे कारण पुस्तकांची मागणी वाढली हे प्रकाशकांना कबूल नाही. आम्ही पुस्तके विकत घेऊन वाचतो असे प्रामाणिकपणे सांगणाऱ्यांची संख्या कमी होत आहे. वाचनालयांना पुस्तके घ्यावयास आम्ही मदत करतो असा सरकारजवळ पुरावा आहे. आणि खरी वस्तुस्थिती कुणाला विचारावी हे मला ठाऊक नाही. पण नवी नवी मासिके निघतात, नवी नवी पुस्तके प्रकाशित होतात, अर्थात् ती वाचली जात असतील असे अनुमान काढून वाचकांची संख्या वाढली असे विधान मी करतो.

ते दिवस !

तथापि संख्या वाढली तरी वाचनाची हौस आवड, आस्था वाढलेली नाही. मला माझ्या विद्यार्थी दशेतील दिवस आठवतात. नागपूरच्या मॉरिस कॉलेजातले ते दिवस मलाच काय, इथे असलेल्या कित्येक मंडळींना आठवत असतील. त्यावेळचे

विद्यार्थी आतापेक्षा चांगले होते, सोज्ज्वळ होते, अभ्यासू होते हे सगळे खोटे आहे. विद्यार्थी जसेच्या तसेच होते. आजचा विद्यार्थी जे काय इष्ट अनिष्ट करतो तेच तेव्हाही केले जात होते. पण त्या करणीत आणखी एक गोष्ट होती. त्यावेळी 'प्रतिभा' नावाचे पाक्षिक निघत असे, सत्यकथा, ज्योत्स्ना, ही मासिके होती. एखाद्या विद्यार्थ्याने गॉल्सवर्दी, टॉलस्टॉय, आपटे, खांडेकर, फडके वाचले नसले तर त्याला कमीपणा वाटत असे. नुसतेच मराठी वाचून त्याचे पोट भरत नसे. बंगालीतून, हिंदीतून, इंग्रजीतून वाचण्याची हौस त्यावेळी होती. नवे पुस्तक जो वाचील त्याच्या मुखावर आनंद दिसत असे आणि ते पुस्तक वाचून काढलेच पाहिजे अशी उमेद इतरांना असे. लेखक आणि त्याची कलाकृती हा कौतुकाचा, श्रद्धेचा, दर्शनाचा विषय असे. चांगले वाचले पाहिजे, खूप वाचले पाहिजे असे वाटायचे. आमच्या बरोबर काही खेळाडू असत. त्यांचे विश्व सर्वस्वी भिन्न. पण ते देखील वाचणाऱ्या लिहिणाऱ्या मंडळीबद्दल आदर बाळगून असत, अती आपुलकीने वागत, "तुम्ही काय बाबा रसिक लोक!" असे कौतुक करीत.

आणि आता !

आज दृश्य काय दिसते? हे दृश्य माझ्यापेक्षाही ज्यांना मुले आहेत ते अधिक चांगले रंगवू शकतील! आज प्रौढ विद्यार्थ्यात साहित्यापेक्षा, कलेपेक्षा ज्या गोष्टींची आवड आहे त्याची चर्चा येथे कर्तव्य नाही. ते सिनेमाच्या नट-नटींची चर्चा करतात, त्यांच्या जीवनाबद्दल आतली आतली माहिती मिळवितात. मला स्वतःला यात गैर काही वाटत नाही हे अगोदरच सांगून टाकतो. कशाबद्दल तरी त्यांना आस्था वाटते हे मी बरेच मानतो. तीही वाटली नसती तर आपण काय केले असते? त्यांच्यावर टीका केली तर उरली सुरली आस्थाही नष्ट होईल. हाच विद्यार्थी आजचा आणि उद्याचा वाचक. त्याला तुमच्या साहित्याची, संस्कृतीची, तज्जन्य सौंदर्याची, तमा कशी वाटणार? आज ज्याच्या आस्थेने साहित्याची बूज राखली जाते, साहित्याचा संसार चालतो तो वाचक तिशीच्या पुढचा आहे. मी ज्या पिढीचा आहे ती आणि माझ्यानंतरची एक पिढी गेली किंवा (तसे होऊ नये) आपल्या जुनाटपणाचे हसे तर होणार नाही ना? या भीतीने ग्रासली गेली तर साहित्याची अब्रू संभाळणारा वाचक गेलाच असे समजायला काही हरकत नाही.

हे असे का झाले ?

हे असे का झाले? आज साक्षेपी वाचक निर्माण झाला नाही याला जबाबदार कोण? त्याला आवडेल, रुचेल असे साहित्य निर्माण झाले नाही असे म्हणता येईल काय? पण ते खरे कसे मानावयाचे? त्याच्या अभिरुचीप्रमाणे इतर वस्तू तयार झाल्या, साहित्यही निर्माण झाले असलेच पाहिजे. पण त्या

अनुक्रमणिका

साहित्याच्या वाचनाने आजच्या वाचकाची आस्था व अभिरुची वाढीला लागत नाही याचे कारण काय ?

अप्रायोजक प्रोत्साहन

याचे पहिले कारण मला वाटते ते असे. साहित्यनिर्मितीला कसलेही प्रयोजन नसताना प्रोत्साहन देणारा व घेणारा साहित्यिक याला कारणीभूत आहे. सध्याचे लोकशाहीचे युग हे प्रोत्साहनाचे युग आहे. एवढेसे कोणी काही केले तर त्याला प्रोत्साहन देणे हे कर्तव्य झाले आहे, चांगली गोष्ट आहे. पन्नास लेखकांना प्रोत्साहन दिले तर त्यातून एखादा तरी चांगला लेखक निर्माण होईल अशी या प्रोत्साहनापोटी दृष्टी आहे. गेल्या पंचवीस वर्षात मराठीत जी पुस्तके निघाली त्यापैकी शक्य तेवढी मी वाचली. अप्रसिद्ध लेखकांची तर मुद्दाम वाचली. कुणाचे तरी मत कुणाची तरी प्रस्तावना वाचावी लागते. वाचायला मिळते की 'प्रस्तुत लेखकाची भाषा ओघवती आहे, चित्रण अभिनव आहे. लेखकाच्या हातून उत्तरोत्तर असेच साहित्य निर्माण होवो, हीच प्रभूच्या चरणी प्रार्थना !' हे प्रोत्साहन विचारा लेखक खरे मानतो. तसेच पुन्हा लिहितो. साक्षरतेमुळे वाचकही मिळतात. पण लेखनगुण जोपासले जातील असे काहीच घडत नाही. उत्तेजन देणाऱ्याचा अधिकार कुणी विचारीत नाही. नाव मोठे असले पाहिजे एवढीच अट! ते मोठेपण कुठल्याही क्षेत्रातले का असेना ? उत्तेजनाच्या पोटी लेखक अधिकाधिक लिहितो, हस्ते परहस्ते छापून काढतो आणि विचारा वाचक अधिकाधिक अश्रद्ध होत जातो. भोजन समारंभात वाढणाऱ्याच्या गलथानपणामुळे कधीकधी मुख्य पदार्थ यायला वेळ लागतो. तोवर भुकेला माणूस चटण्या पंचामृत फस्त करतो. भूक तापते पण तृप्ती होत नाही. मुख्य पदार्थ आला तर इकडे जागा उरत नाही, मुख्य वस्तूवरची श्रद्धा उडते. प्रोत्साहन देणारा आणि घेणारा ह्यांची किमत तो ओळखतो. उमेद देणाऱ्या शब्दातील अर्थ निघून जातो. "आम्ही लिहीत नाही म्हणून, नाहीतर आम्ही सहज लेखक झालो असतो." इतके उथळपण त्याच्यामध्ये भिनते. चांगल्याला चांगले का म्हणावे असा संभ्रम त्याच्या ठायी निर्माण होतो व वाईटाला वाईट म्हणण्याची त्याची कुवत नष्ट होते.

आजच्या पिढीतील लेखकांना प्रतिष्ठा मिळालेली नाही ही वस्तुस्थिती आहे. ह्यात मी त्या लेखकांना अन्याय करीत नाही उलट त्यांचीच बाजू मी मांडतो. काही उत्तम लेखक आजच्या वाचकांपर्यंत पोचले नाहीत. त्यांच्या साहित्यिक गुणांची कसोटी ठरविणारा वाचक आज देखील जुन्या पिढीतलाच आहे. त्याला नव्या लेखकाचे प्रकटीकरण नीटसे समजत नाही आणि ते समजत नाही असे म्हणून आपली अप्रतिष्ठा करून घ्यायला तो तयार नाही. त्यामुळे नवा लेखक खचतो आणि आपण का खचलो हे त्याला समजत नाही. प्राध्यापक

फडके, श्री. खांडेकर यांच्या ग्रंथांना आजही मागणी आहे हे त्या लेखकांचे भाग्य ! परंतु ही मागणी साहित्याच्या प्रगतीचे लक्षण नव्हे असे म्हणणारा एक वर्ग निर्माण झाला आहे. तो आजच्या वाचकाला जुनाट बुरसटलेला असे म्हणतो. खरोखरच तो वाचक जुनाच आहे हे त्याच्या लक्षात येत नाही.

एक उदाहरण देतो. जयवंत दळवी यांच्या 'चक्र' कादंबरीला महाराष्ट्र सरकारने तज्ज्ञ मंडळींच्या सल्ल्याने पहिले बक्षीस दिले. त्याबद्दल जयवंत दळवींचे आणि महाराष्ट्र सरकारचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. पण ती कादंबरी वाचून जे अभिप्राय मी ऐकले ते इतके विलक्षण आहेत की ती कादंबरी वाचणाऱ्या माणसाची गत 'त्रयाणाम् धूर्तानाम्' या गोष्टीतल्या ब्राह्मणासारखी होते. काही म्हणतात 'चक्र अश्लील आहे, सरकारने कसे बक्षीस दिले?' काही म्हणतात 'आम्हाला तिच्यात बक्षीस देण्याजोगे काहीच दिसले नाही.' काही असे ठासून सांगतात, की 'अहो ही कादंबरीच नव्हे. तिच्यात कला तर सोडाच, घड कळा देखील नाही.' अशी परिस्थिती का निर्माण व्हावी ? जुन्या श्रद्धा, जुन्या कल्पना गेल्या; आपली इच्छा नसताना गेल्या आणि नव्या जीवनाचे दर्शन झेपण्याची कुवत, संस्कारिता आलेली नाही. अशा स्थितीत साहित्यकृतीची बूज राखली जाईल अशी अपेक्षा पूर्ण होऊ शकेल काय ? फडके, खांडेकरांची पुस्तके वाचणे म्हणजे आपले जुनाटपण सिद्ध करणे, आणि चक्र वाचून न समजणे अशी एक विलक्षण कोंडी आज निर्माण झाली आहे.

आजची क्रमिक पुस्तके

दुसरे कारण माझ्या मते आजच्या पिढीवर भाषेचे व साहित्याचे संस्कार करणारी क्रमिक पुस्तके ही होत. या क्षेत्रात अत्यंत मनोरंजक प्रकार दृष्टीस पडतात. साहित्याची अभिरुची वाढावी, भाषेचे आकलन व्हावे हा या क्रमिक पुस्तकांचा उद्देश असतो. तो सफल होईल अशी प्रत्येक क्रमिक पुस्तककाराला उमेद असते. 'विद्यार्थ्यांची आजची प्रवृत्ती आणि अभिरुची लक्षात घेऊन मी हे पुस्तक तयार केले आहे" असा तो ठासून निर्वाळा देतो. पण गंमत अशी की पुस्तकातील मजकुरापेक्षा ते पुस्तक रचणाऱ्याच्या एकूण महत्त्वावर आणि भल्या-बुऱ्या कर्तबगारीवर त्या क्रमिक पुस्तकाचे भवितव्य अवलंबून असते. नवीन शिक्षण-शास्त्राप्रमाणे भाषादर्शन हे मुळी महत्त्वाचेच नसते. आरंभीची मराठी पुस्तके, 'होय–नाही, चूक–बरोबर आणि रिकाम्या जागा भरा' एवढेच सांगतात. शिक्षण-शास्त्र असे गृहीत धरते की मराठी ही बालकांची मातृभाषा, तिचे संस्कार बालकांवर घरी दारी होतच असतील. पण एका गोष्टीचा त्या शिक्षणशास्त्राला विसर पडतो. (ते ही बिचारे परकेच आहे). ती गोष्ट म्हणजे जो विद्यार्थी आज भाषा शिकतो त्याच्यावर त्या भाषेचे घरीदारी संस्कारच होत नाहीत. आजची

प्रकटीकरणाची मराठी भाषा जी व्याकरणबद्ध झाली आहे ती बहुजन समाजाची मराठी नव्हे, आणि शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे या बहुजनसमाजातील मुलेच अधिकाधिक संख्येत शिक्षण घेतात.

मुलगा जरा वरच्या वर्गात गेला की त्याच्या साहित्य अभिरुचीसाठी जी पुस्तके रचली जातात त्यातील मजकुराचे आकलन त्याला होत नाही. अभिरुचीच्या संवर्धनासाठी जुन्याच पद्धतींनी या पुस्तकांचे संपादन होते. मराठी भाषेची उत्क्रांती विद्यार्थ्यांना समजली पाहिजे म्हणून चिपळूणकरांपासून आजतागायत लेखकांचे लेख त्यात आलेच पाहिजेत असा कटाक्ष बाळगला जातो. चिपळूणकर, आगरकर यांचे ऋण मराठी भाषा आहे तोवर अमान्य होणार नाही, त्यांच्या बळावर मराठी उभी आहे हे देखील मान्य करायला हरकत नाही. पण त्यांनी जे विषय आपल्या प्रभावी लेखणीने सुलभ, सुस्पष्ट केले ते आज जुने झाले आहेत असे म्हटले तर त्यांचा अपमान होईल असे मला वाटत नाही. आगरकरांचा उत्कृष्ट भाषेत लिहिलेला विधवा विवाहावरील किंवा संमतीवयावरील उतारा एखाद्या क्रमिक पुस्तकात घेऊन आजच्या विद्यार्थ्यांवर भाषेचा संस्कार केवढयाही हिरीरीने करावयाचे ठरविले तरी ते अशक्य आहे. आजच्या विद्यार्थ्याला म्हणजेच उद्याच्या वाचकाला विधवेची दुःखे आकलन होणार नाहीत कारण विधवाविवाह रूढ झाला आहे.

एखाद्या साक्षेपी संपादकाने नव्या काळातील नव्या लेखकांचे वेचे घेऊन पुस्तक तयार केले तर जुन्या कसोटीवर ते शास्त्रीय ठरत नाही. आणि ठरले तरी ते विद्यार्थ्यांना आकलन होत नाही. कारण आजच्या लेखकाचे लिखाण सर्वंकष, सर्वस्पर्शी असतेच असे नाही. मराठीत झाला तरी आजच्या साहित्यात प्रादेशिकतेचा बोलवाला आहे. भूगोल शास्त्रीय (?) रीतीने शिकविला जात असल्यामुळे एका प्रांतातील प्रदेशांचे ज्ञानही तितपतच ! हा लेखक काय, तर कोकणची चित्रे रंगवितो; दुसरा वऱ्हाड-नागपूरची भाषा वापरतो, आणि तिसरा सांगली–कोल्हापुरी लिहितो. माणूस सर्वत्र एक, त्याची सुखदुःखे सारखीच हे कबूल केले तरी पुरेशा संस्कारांच्या अभावी ही पुस्तके सर्वसामान्य मुलांच्या डोक्यावरून जातात. आणि भाषेचे व साहित्याचे संस्कार व्हावयाचे ते होत नाहीत. वाचक साहित्याच्या सर्वंकष आकलनाला आचवतो.

आणि इतर पुस्तके

तिसरे कारण आता बघू या. ते सांगण्यापूर्वी मी लेखक आणि लेखन हे शब्द कोणत्या अर्थाने वापरतो ते सांगितले पाहिजे. ललित लेखक आणि ललित लेखन हेच मी नजरेसमोर ठेवले आहे. नवी सृष्टी ललित लेखकच रचतो, त्याच्याच निर्मितीची प्रक्रिया मला ठाऊक आहे. गेली सहा वर्षे मराठीचे मनोरंजक

अनुक्रमणिका

साहित्याचे मोठे दालन म्हणजे कथा, कादंबऱ्या, नाटक, तमाशा—यावरील प्रकाशित अप्रकाशित कमीतकमी हजार पुस्तके मी वाचली आहेत. कादंबऱ्या सुमारे तीनशे, कथा सुमारे सहाशे आणि बाकी इतर ग्रंथ. ते वाचल्यानंतर मला असे प्रामाणिकपणे वाटले की सामान्य कारकून व्हायला एक किमान परीक्षा तरी पास करावी लागते पण लेखक व्हायला तिचीही गरज नसते. त्यामुळे साहित्यात गुणवत्तेऐवजी संख्येची भर अधिक पडून सर्वसामान्य वाचकाचा साहित्यावरचा विश्वासच उडून जातो. कित्येक पुस्तके वाचवली नाहीत. पण मी व्यापारी क्षेत्रातला माणूस. अर्धवट वाचून, माझे समाधान होईना. ती पुस्तके पूर्ण वाचताना माझे जे हाल झाले त्यांची कल्पना मलाच आहे. इतरावर तशी पाळी न येवो असे ईश्वराजवळ माझे मागणे आहे.

इंग्रजीचे स्तोम

चौथे कारण आपणा सर्वांचा रोष पत्करून मला मांडले पाहिजे. ते मी माझे कर्तव्य समजतो आणि ते मांडताना माझा धीर खचू नये म्हणून मी माझ्या कुलदैवताजवळ बळ मागतो. हे कारण, केवळ मराठी भाषेच्या व साहित्याच्या संवर्धनालाच मारक आहे असे नाही तर या विशाल देशातील सर्व भाषांच्या संगोपनाला आणि संवर्धनाला मारक आहे असे मी अत्यंत नम्रपणे पण आग्रहपूर्वक सांगतो. ते कारण म्हणजे इंग्रजी भाषेची पकड आणि तिचे माजविलेले स्तोम हे होय. कोणत्याही भाषेबरोवर तिची संस्कृती येत असते, हे सिद्ध करायला तज्ज्ञांची गरज नाही. स्वातंत्र्यानतर ही संस्कृती गेली पाहिजे असे वातावरण निर्माण झाले. पण इंग्रजी भाषा मात्र राहिली. ती राहिली पाहिजे असे प्रतिपादन करणारी थोर मंडळी वंद्य आहेत, आदरणीय आहेत ही आणखी एक अडचण ! या देशात इंग्रजी राहिली पाहिजे असे प्रतिपादन करणाऱ्यांची जातकुळी एखाद्याने शोधली तर त्याची दृष्टी संकुचित आहे, कोती आहे असे म्हणणाऱ्यांची संख्या मोठी आहे. पण हा आरोप पत्करून देखील धर्म म्हणून मला माझे प्रतिपादन करावयाचे आहे, इंग्रजीशिवाय आपल्याला तरणोपाय नाही कारण ती समृद्ध भाषा आहे. असे प्रतिपादन वरपांगी दिसायला सोज्वळ वाटते, सयुक्तिक वाटते. मी इंग्रजी शिकलो आहे. माझे विचार मला त्या भाषेत मांडता येतात. त्यामुळे त्या भाषेच्या अज्ञानाबद्दलचा आरोप मजवर कोणी करणार नाही. या देशातील ४५ कोटी जनता इंग्रजी आत्मसात करू शकेल हे अशक्य आहे. तेवढी साधने आपल्याजवळ नाहीत. चार दोन टक्के लोक इंग्रजी शिकलेले आणि तिची महती गाणारे. इंग्रजीचे सर्व गुण मला माहीत आहेत. तिची महती मी जाणतो. इंग्रजी आले पाहिजे असा प्रचार देखील मी करतो. पण इंग्रजीचे स्तोम मी माजविले नाही तर माझे पोटच भरू शकणार

अनुक्रमणिका

नाही अशी सुदैवाने माझी स्थिती नाही. इंग्रजीच्या अभ्यासाला पंधरा वर्षे वयाच्या विद्यार्थ्यासाठी आठवडयातून तेरा तास दिले जातात आणि मातृभाषेच्या अभ्यासासाठी तीन चार तास दिले जातात. विद्यार्थ्यांची किती शक्ती क्षीण होते याचा विचार सोडला तरी देखील बहुसंख्य विद्यार्थी इंग्रजीत नापास होतात ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे तिचे महत्त्व आणखी वाढते. मातृभाषेबद्दल अनास्था निर्माण होते. मातृभाषा नीटशी येत नसल्याने दुसरी कोणतीही भाषा आत्मसात करायला विद्यार्थी अक्षम ठरतो. याची जाणीव ठेवणारे आज सत्तेपुढे मूर्ख ठरत आहेत. विद्यार्थी इंग्रजीत नापास होऊ नये म्हणून भलेबुरे प्रयत्न चालू आहेत पण या प्रयत्नांपोटी अधिकाधिक विद्यार्थी नापासच होत राहणार ! कारण तिच्या पोटी येणाऱ्या संस्कृतीशी आजची शिक्षणोत्सुक भारतीय जनता पूर्णपणे अपरिचित आहे. पपा, ममी, सॉरी, थँक्यू, गुड मॉर्निंग, गुड नाईट मधील संस्कृती या देशात पचणे शक्य नाही. सक्ती केली तरी नाही. ज्यांना इंग्रजी येते ते स्वतःला आणि त्यांना इतर, श्रेष्ठ मानतात. ज्याना येत नाही ते मूर्ख ठरतात आणि आपले वेडेपण निमट मान्य करतात. त्यांच्यात न्यूनत्वाची भावना निर्माण होते, वाढते आणि आपण नालायक असे त्यांचे त्यांनाच वाटू लागते. इंग्रजी क्रमिक पुस्तके वाचली म्हणजे त्या संस्कृतीशी अपरिचित असणाऱ्यांना ते ओझे केवढे असह्य होते हे आपणासारख्यांना मी समजावून दिलेच पाहिजे असे नाही. आणि केवळ इंग्रजी येत नाही म्हणून इतर सर्व बाबतीत किती हीनत्व पदरी येते व आयुष्यातील केवढी उमेद खचते याचाही अनुभव आपल्यापैकी पुष्कळांना असावा. इंग्रजीचे स्तोम देशी भाषेच्या, संस्कृतीच्या, साहित्याच्या संवर्धनाला नख लावते याचे प्रत्यंतर येत असून देखील या देशातील सत्तेपुढे ब्र काढण्याची सोय उरली नाही. तिच्याशिवाय आपले निभूच शकणार नाही, आपली प्रगतीच होणार नाही हे खरे आहे काय ? रशियाची प्रगती रशियन भाषेतून होऊ शकली, जपानचे कोणतेही कार्य इंग्रजीवाचून अडून बसले नाही. नव्या ज्ञानाचे आकलन होण्यासाठी पारिभाषिक शब्द जोपर्यंत देशी भाषेमधून निर्माण होत नाहीत तोवर इंग्रजी चालू द्यावी हा युक्तिवाद दिसायला साळसूद असला तरी अत्यंत नपुंसक आहे. भाषा वापरली तरच परिभाषा निर्माण होते, या साध्या गोष्टीचा विसर भूतलावरील ज्या कोणत्या एकाच देशाला पडला किंवा पाडला गेला, तो देश म्हणजे आपला भारत ! या करंटेपणाला गेल्या हजारो वर्षांच्या इतिहासात दुसरा दाखला नाही. मला एक गंमतीचे उदाहरण आठवते. एक सुंदर तरुण, हसतमुख मुलगी; एक गरीब विचारा विवाहित, नाकासमोर चालणारा मुलगा; परिस्थितीपरत्वे ही तरुण सुंदर मुलगी त्याला लाभली. अधिकस्याधिकं फलम्– तो आनंदला. सुंदर मुलीचे वर्चस्व वाढले आणि धर्मपत्नीची अनास्था होऊ लागली. तिचे कोण ऐकतो ? ती

फाकुळतीला येऊन विनवू लागली "अहो, मी तुमची, मजकडे या, माझी अशी हेळसांड करू नका." तिच्याकडे लक्ष देतो कोण ? सवड कोणाला ? इकडे या सुंदर मुलीला दिवस गेले. ती अधिक सुंदर दिसू लागली, अधिक कोवळी अधिक पिवळी, अधिक कमनीय, अधिकाअधिक आकर्षक !—सुफलांच्या आगमी तरुलतिका दिसतात तशी दिसू लागली. तरुण अधिकाधिक आकर्षिला जाऊ लागला. इकडे ही बिचारी विनवीत होतीच. 'अहो, एकदा तरी तुमच्या कृपेचा कटाक्ष मला लाभू द्या.' तरुणाने एक विनतोड युक्तिवाद केला. तो म्हणाला "छे छे. तू सुंदर नाहीस. ती बघ कशी कवळी, पिवळी दिसते, तू तशी दिसायला लाग तरच तुला माझा सहवास लाभेल." कथेचा शेवट असा आहे की त्या बिचाऱ्या पत्नीने पतीच्या चरणावर डोके फोडले आणि अहेवपणी ती स्वर्गाला गेली. कथा मनो-रंजक आहे. भाषा वापरायची नाही आणि तिच्यातून परिभाषा निर्माण होत नाही तोवर तिच्याशी संपर्क ठेवायचा नाही हा युक्तिवाद याच देशात रुचतो, पचतो. कारण सहिष्णुतेबद्दल आपली ख्याती पसरली आहे.

इंग्रजीच्या या स्तोमामुळे परिणाम असा झाला की देशी भाषेबद्दल आस्था राहिली नाही. मराठी साहित्याचे तोंड आणि निकष इंग्रजी वळणाचे झाले. ते साहित्य फार थोड्यांना आकलन होते. इतर त्यापासून अलिप्त असतात. आजचा वाचक वर्ग या बहुसंख्य इतरांमधूनच निर्माण होत असल्यामुळे साहित्याच्या दुर्भाग्याने तो आजच्या साहित्याला पारखा झाला.

अभिनंदनीय !

या संदर्भात एका गोष्टीचा उल्लेख मला अत्यंत अभिमानाने करावयाचा आहे. तो कोणत्या शब्दात करावा हे, शब्दाचा वापर करणाऱ्या मला देखील सुचत नाही. महाराष्ट्राने मराठी भाषेतून राज्यकारभार चालेल असे जाहीर केले आहे. फार मोठी गोष्ट ! ही हिंमत मराठी माणूसच करू जाणे! शिवरायाचे किल्ले काबीज करण्याचे धोरण या राज्याने आत्मसात केले आहे. इतरांकडून धन्यवाद मिळ-तात किंवा नाही हे मी कसे सांगणार ? पण याच मातीत, याच मराठीत वाढलेली आम्ही मुले लेकरे या राज्याचे यश चिंतितो; तुळजापुरच्या भवानीला, माहूरच्या रेणुकेला कौल लावतो की 'हे जगन्माते, या राज्याला कुणाची दृष्ट लागू देऊ नकोस' ! मातेच्या चरणी डोई ठेवून आम्ही हे उद्‌गार काढतो. श्रद्धा आहे आमची की कावळ्या घुबडांची नजर या राज्याला बाधायची नाही.

इंग्रजीचे प्रेम बाधत नाही. प्रेमात दुराग्रह नसतो. बाधक होते ते स्तोम, वर्चस्व. समाज नाउमेद होतो. त्याला जगावेसे वाटत नाही, लाचार जिण्याची खंत त्याला बोचते. कुठले साहित्य, कसली अभिरुची असे वेडेपिसे उद्‌गार त्याच्या मुखातून निघतात !

अनुक्रमणिका

एक इशारा

येथेच एक इशारा मी नम्रपणे देऊ इच्छितो. स्वातंत्र्यानंतर या देशातील जनतेची जिजीविषा वाढत आहे. तितिक्षा कमी होत आहे. थोर लोक म्हणतात म्हणून इंग्रजीचा दुराग्रह यापुढे चालत राहिला तर अनावस्था ओढवेल. थोरांचे थोरपण पाल्यापाचोळ्यासारखे वावटळीत उडून जाईल. सुजाणपणे वकूब ओळखून, वखत जाणून आपण परभाषेचे स्तोम बंद केले नाही तर ते बंद पाडण्याइतकी मनाची तयारी भारतीय जनतेची होत आहे. महाराष्ट्रातला जिल्हा-परिषदांचा प्रयोग काही लोकांच्या अवहेलनेचा विषय आहे. हे लोक कोण हे सांगण्याची गरज नाही. पण लोकशाहीच्या संवर्धनाला, प्रगतीला पोषक असा तो महान प्रयोग आहे, हे काळच पटवून देईल. त्यासाठी अधिक वाट बघायला नको. माझ्यासारख्या सामान्य माणसाचे डोळे ते दिवस बघायला आसावले आहेत. त्या दिवशी इंग्रजी न जाणणारा माणूस सत्ता पेलू शकेल, अनुभवाने शहाणा होईल त्याचे स्वत्व जागे होईल. अभिमान, अहंकार आणि–दुर्दैवाने की सुदैवाने कुणास ठाऊक–पण एक दिवस तो असे म्हणेल की 'ज्या कोणाला इंग्रजी येत असेल तो आमचा नव्हे, आमच्यातला नव्हे.' काही वर्षापूर्वी अमुक एका जातीचा माणूस हा आमचा नव्हे या जाणीवेने त्या जातीवर जसे संकट ओढवले होते तसे संकट आपण सुजाणपणे आज टाळले पाहिजे. आपली मराठी ही आपली आहे. माझे तन, मन, लौकिक अलौकिक, भौतिक, अध्यात्मिक श्रेय, प्रेय, हिच्यातूनच, हिच्या द्वारेच व्यक्त होऊ शकते ही श्रद्धा, ही निष्ठा देवाच्या शपथेने ज्या दिवशी व्यक्त होईल त्या दिवसापासूनच मराठी साहित्य सर्वंकष होऊ लागेल.

भाषेच्या अभिमानाला नख लागल्याने साहित्याची होत असलेली अनास्था विशद करण्यासाठी मी हा मुद्दा जरा विस्ताराने मांडला. तो अधिक विस्ताराने मला मांडता आला नाही ही माझी उणीव आपण क्षम्य समजावी अशी मी आपणास विनंती करतो.

साहित्याला अयुक्त भावनेने मिळालेले प्रोत्साहन, भाषा, साहित्याचे अध्ययन अध्यापन आणि भाषेवरील दडपण यामुळे सुजाण वाचक निर्माण होऊ शकला नाही. लोकशाहीमध्ये ज्ञान सार्वजनिक जेव्हा होऊ लागते तेव्हा अपरिहार्यपणे ज्ञानाच्या आकलनात दोष निर्माण होतो. याला इलाज नाही. हळुहळु तो दोष नाहीसा होतो. वेदांचे अध्ययन अनधिकार माणसांनी करू नये असा पूर्वी दंडक असे. या नियमाचा उद्देश उघड होता. साहित्यशास्त्राच्या अभ्यासाची थोडीशी तीच गत आज झाल्यामुळे खऱ्या खोटयाचा निर्णय अडचणीत सापडला आहे.

मराठी साहित्याचा सीमित संसार

आज मराठी साहित्याचा संसार सीमित असा आहे. काही सुशिक्षित नागरी-समाज हा आजच्या साहित्याचा वाचक. बहुसंख्य जनतेपर्यंत साहित्य गेले नाही. तिला ते फारसे समजत नाही. ललित साहित्यातील सध्याची अभिव्यक्ती ही नागरी थरापर्यंतच आहे. ग्रामीण भाषा वापरली म्हणजे ग्रामीण जनतेला ते साहित्य कळते व तिची अभिरुची वाढते हा समज चुकीचा आहे. "सुलोचनेने एकदा आरशात बघितले. साडीला शोभेल अशी पर्स निवडली. जाताजाता पावडरचा हात चेहऱ्यावरून फिरविला व ड्रायव्हरला गाडी काढायला सांगितले. आज सुधीर बरोबर बोटिंगला जायचे-सुखाच्या संवेदनेतच गाडीबरोबर तिच्या विचारांनी वेग धरला." अशी सुरुवात असलेली कथा गावच्या साक्षरांना नीटशी कळत नाही. गावकी सुधारली तर कळेल अशी आशा धरू या. जिला ग्रामीण कथा आपण म्हणतो तिची सुरुवात कशी असते ती बघा. "विडीचे थोटूक दूर भिरकावून उकिडवा बसलेला पांडू झटक्याने उठला. गोठ्यात शेणपाणी व्हायचेच होते. भराभर त्याने शेण गोळा केले आणि गोवऱ्या थापायला बायजीला हाक मारली. काल संध्याकाळपासून त्याचा तिच्यावर राग होताच." अशा कथेमध्ये ग्रामीण जनतेला वाचण्याजोगे काही आढळत नाही.\ एकदा एका खेड्यात मी एक कथा वाचून दाखविली. श्रोत्यांमध्ये एक सोळा सतरा वर्षांचा मुलगा होता. उत्तम प्रकृतीचा, छान शेती करणारा. घरी संत्र्याची बाग होती. त्याचे मत विचारले. तो चटकन् म्हणाला, "तुम्ही लिहिली का जी कथा? आमचे हात दिवसभर काय शेणामातीतच असतात ? तुम्ही बायकोवर रागावता तर ते नुसता वाद आणि आम्ही रागावलो तर एकदम तिचे टाळकेच फोडतो काय ?" उत्तर सूचक आहे. त्यात आवाहन आहे, आव्हान आहे. सुज्ञांनी त्यापासून बोध घ्यावा.

फावला वेळ

साहित्याचे असो की जीवनाचे असो आज कोठलेही काम व्यक्तिगत, व्यक्तीसाठी असे करता येत नाही. समाज, समष्टी इतका त्या कामाचा व्याप असतो. प्रामाणिकपणे काम करावयाचे म्हटले तर मजुरापासूत मंत्र्यापर्यंत कोणालाही फुरसतीचा वेळ असूच शकत नाही. नुसता पोटाचा उद्योग घेतला तरी वेळ उरत नाही. साहित्याच्या संवर्धनाची काळजी 'फावल्या' वेळात घेतली जाते हे एक अवघड असे कोडे आहे. आपला उद्योग सांभाळून अमुक अमुक गृहस्थ अमुक साहित्य संस्थेचे कार्य पोटतिडिकेने करतात या वाक्याचा अर्थ निदान मला तरी कळत नाही. परिणाम असा होतो की कुणाची जयंती, कुणाची मयंती, कुणाबद्दल शोकसभा, स्वागत, सत्कार यातच साहित्य संस्थांचा बहुतेक कारभार सामावला असतो. मार्गदर्शनासाठी बैठका, ठराव, प्रस्ताव एवढे केले, वास्तु उभी झाली

अनुक्रमणिका

की 'जितं मया' असे होते. साहित्याच्या समृद्धीसाठी भरीव कार्य करण्याची जवाबदारी घेण्याची वेळ आता आली आहे व चोवीस तास याच कामात गुंतविणारी माणसे त्यासाठी हवी आहेत. त्याग, सेवा, यांचे अर्थ सवंग होता कामा नयेत. मोठया संस्था जे करतात त्यांचेच अनुकरण वाङ्मय मंडळे, भाषा-मंडळे करीत असतात. भाषाप्रेमाचा आळ आलेल्या विद्यार्थ्यांचा अर्धा उत्साह निवडणुकीत, पावभर हिशेव–ठिशेवात, अर्धापाव कार्यक्रम शोधण्यात, आणि उरलेले ग्रॅम्स अहवाल व्याख्याने यांच्यापायी खर्च होतो. काही दिवस या चळ-वळी बंद झाल्या तर पुष्कळ शक्ती वाचेल. पण बंद करायच्या तर लोकशाही हक्कावर गदा येते. संप उपोषणे सुरू होतात. विचित्र त्रांगडे होऊन बसले आहे! वक्ता, व्याख्याने, मार्गदर्शन, उपदेश यातील हवा निघून गेली आहे. चहा, चिवडा मिळणार असेल तरच श्रोते जमणार ! आणि व्याख्यात्याने काय सांगितले यापेक्षा कसे सांगितले हेच बघणार ! या सर्व संस्थांना भाषेच्या समृद्धीसाठी काही करायला जमले, मिळाले तर सदिच्छेने भरीव कार्य करू इच्छिणाऱ्या आपल्या सरकारचा वेळ, पैसा व ताप वाचेल असे मला निश्चितपणे वाटते.

एक आशुतोष वृत्ती

एका आशुतोष वृत्तीचाही उल्लेख करून टाकतो. एवढेसे कोणी काही केले तर त्यातल्यात्यात चांगले निवडून त्याचा आवर्जून उल्लेख केला जातो. वृत्ती उत्तम आहे. पण थोडा संयम हवा. एकदा माझ्या कॉलेजची हॉकी टीम मॅचमध्ये हरली. तयारीसाठी पैसा खूपच खर्च झाला होता. मला संताप आला त्यात अस्वाभाविक काही नव्हते. पण मला सांगण्यात आले,–'है मंजूर कि हार गये लेकिन सो (शो) कैसा रहा ?' याच चालीवर भाषा व साहित्याच्या क्षेत्रात वाखाणणी चालू असते. यामुळे खरे काय, खोटे काय काही कळत नाही बघा. शब्दाचे अर्थ, उद्देश पार बदलून गेले. नियोजन म्हणजे भोंगळपणा, सैन्यातील नोकरी म्हणजे करियर 'अस्सल जो जो वीर मराठा, तोचि मज व्हावा, त्याने येउनी देउनी प्राणा मजसह गड घ्यावा'. यापैकी काही उरले नाही. आमच्या साहित्यात इंच इंच भूमी लढविण्याचे मनसुवे तेवढे घरी बसून केले जातात. शब्दातील धार निघून जाते. गेल्या महायुद्धात रशियाने जीवंत साहित्याचा वापर केला. पहिल्या महायुद्धात किपलिंगची कविता सैनिकांच्या बंदुकींनी गाजली. ते साहित्य संकुचित होते. कबूल आहे. पण त्याचा परिणाम व्यापक होता.

बहुमोल संधी

आज साहित्याच्या सर्वंकष पात्याला धार लावण्याची बहुमोल संधी आली आहे. अवघा देश एकत्र आणण्याचा अवसर प्राप्त झाला आहे. वीराची वाणी कोणीही ऐकून घेईल इतकी संवेदना जनतेत जागली आहे.

न देखवे डोळा, ऐसा हा आकांत ।
परपीडे चित्त, दु:खी होते ।।
काय तुम्ही येथे, नसाल्से झाले ।
आम्ही न देखिले, पाहिजे हे ।।
तुका म्हणे माझी, लाजविली सेवा ।

यानंतर विठ्ठल विठ्ठल असा नाम गजर, आणि मग दगडाधोंड्याची माणसे होतात—अशी पेटून निघतात.

का दिहाचि दिन थोकला ।
की प्रलय दीप मालवला ।
जव मी नावेक, ते सकळ वीर-सैनिक
न्याहाळीन अशेख, झुंजते जे ।
येथ आले असती आघवे ।
परि कवणेसी म्या झुंजावे,
हे रणी लागे पहावे,
म्हणवूनिया ।
बहुत करूनी कौरव ।
हे आतुर दु:स्वभाव ।
वाटिवेवीण हाव ।
बांधती झुंजी ।।

'देखना चाहता हूं, सुरत उनकी जो है निकम्मे अनजान औकात, तौहिन कर रहे है लढनेकी—'

धर्मलीन संतांनी वीररस उठविला, आणि आम्ही देवदेवतांना नवस करून कृतकृत्य झालो. या प्रलय प्रसंगी साहित्य व साहित्यिकांचे काही तरी निश्चित कर्तव्य आहे असे मला वाटते. त्याची जाणीव झाली तर नवा वाचक निर्माण होऊ शकेल. विश्वधर्म, राष्ट्रधर्म आवाक्यावाहेरचा वाटला तरी महाराष्ट्र धर्म ओळखण्याची ही वेळ आहे. या पर्वणीत साधा बोल सुभाषित होऊ शकेल, साधा शब्द साहित्य होऊ शकेल. वाचकाची उणीव भासणार नाही.

रसिक जन हो! तुमच्या प्रोत्साहनाने धीर येऊन मी माझे मन उघडे केले. आपल्या अपेक्षेप्रमाणे मला बोलता आले नसेल तर मला क्षमा करा. साहित्यावर माझी नितांत श्रद्धा आहे. त्यातील शिवांचा, सुंदराचा, सत्याचा आविष्कार अपरिमित आहे. माझे श्रेय प्रेय तेच आहे. हे मी देवाशपथ सांगतो. मला वेळ मारून नेण्यासारखे चांगुलपण घेता येत नाही. बोलतो त्यात कडुपण असेल. पण

ते तरी मी कुठे बोलू? भीम धर्म राजाला टाकून बोलला त्यातही कटुता होती. मी उगीच संकोच कशाला करू ? आणि तोही तुमच्या पुढे ? छे! पाप होईल ते ! आपली संस्कृती हिमालयाची संस्कृती आहे. तेथे जे असेल ते सित, शुभ्र, अमित ! माझी लाज तुमच्या नुसत्या दृष्टीने देखील झाकली जाईल; प्रीतीच्या तरुवरांना बहर येईल; निःसंकोचपणे जे मी बोललो तो हा असा इथून आतून बोललो! हे आपण ओळखावे. चवीचे जगणे म्हणजे कला, साहित्य! ती चव ओळखली नाही तर आपण जगलो काय, मेलो काय, आपला हिशेब करायला यमाचा हुजऱ्याही येणार नाही. चवीची चवना होऊ द्यायची नाही, आपण चव घ्यायची. इतर घेऊ शकतील असे प्रयत्न करावयाचे. जीवनाची, साहित्याची समृद्धी यातच आहे. एवढे आपण ओळखावे हेच मागणे मी मागतो. मी एक सामान्य माणूस, दान पात्र; आपण दाते आहात. प्रस्तुतचा दानकाल आहे. आपल्यापुढे उघडी केलेली झोळी आपण भरून द्यावी—

अयं दानकालः त्वहं दानपात्रम् ।
भवानेव दाता त्वदन्यन्न याचे ।
भवद्भक्ति देवस्थिरां देहि मह्यम्
कृपाशील शंभो, कृतार्थोऽस्मि तस्मात् ।

नमस्ते !

अनुक्रमणिका